

# संत चोखामेळा : अश्रूंची कहाणी

निर्मलकुमार फडकुले

# संत चोखामेळा
# अश्रूंची कहाणी

निर्मलकुमार फडकुले

सुविद्या
प्रकाशन

■

संत चोखामेळा : अश्रूंची कहाणी

निर्मलकुमार फडकुले

Sant Chokhamela : Ashrunchi Kahani
Nirmalkumar Phadkule

©

निर्मलकुमार फडकुले

'विवेक'

विद्यानगर, उत्तर सदर बझार,

सोलापूर - ४१३००३.

■

प्रथमावृत्ती

नोव्हेंबर २००३

■

अक्षर जुळणी

जयंती पेपर्स अँड प्रिंटर्स

३७४, उत्तर कसबा, सोलापूर.

■

प्रकाशक

सुविद्या प्रकाशन

३७४, उत्तर कसबा, सोलापूर - ७

■

मुद्रक

विनंद ऑफसेट

टिळक चौक, सोलापूर.

■

मुखपृष्ठ छपाई

समर्थ ऑफसेट, सोलापूर

■

मुखपृष्ठ

शिरीष घाटे

■

मूल्य : रुपये ७०

रसिकहो व मराठी साहित्य प्रेमी स्नेहजनहो ,

माझे वडील प्रा.डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे साहित्य मी ई-साहित्य प्रतिष्ठान तर्फे आपणासाठी प्रकाशित करीत आहे. २८ जुलै २०२० या त्यांच्या चौदाव्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या साहित्याचे प्रकाशन व्हावे व ते जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवावे हा उद्देश आहे.

पेशाने मराठीचे प्राध्यापक,अत्यंत हळवे व जीवनावर मनापासून प्रेम करणारे असे माझे वडील. केवळ साहित्यिकच नव्हे तर ते प्रख्यात वक्ते देखील होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील गावांमध्ये त्यांनी प्रबोधनाचे कार्य केले .संत साहित्याचा त्यांचा गाढा अभ्यास होता. त्यांनी आकाशवाणी पुणे, सांगली, सोलापूर यावरून संतांच्या विविध अभंगांचे निरूपण केले आहे आजही ते आकाशवाणी वरून प्रसारित होत आहे. ते सर्व प्रसारित कार्यक्रम आपल्या भेटीस इ-साहित्य प्रतिष्ठान मार्फत आणणार आहोत. विविध शासकीय व विद्यापीठीय समित्या, अभ्यास मंडळे , बालभारती यांच्या माध्यमातून त्यांनी खूप मोलाचे कार्य केले आहे. अग्रगण्य वृत्तपत्रातून व नियतकालिकांमधून ४०-४५ वर्षांहून अधिक काळ त्यांनी लेखन केले तेही पुस्तक रूपात प्रसिद्ध झाले . त्यांची काही व्याख्याने देखील रसिकांच्या भेटीस आणणार आहोत. त्यांच्या स्वभावाचे विविध पैलू त्यांच्या साहित्यातून उलगडत जातील व खास करून जीवनाविषयक दृष्टिकोन त्यांच्या ललित लेखनातून आपणास समजेल. देश-परदेशातील असंख्य रसिकांनी त्यांच्या सर्व साहित्याची पुनर्प्रकाशनाची मागणी केली व ती आता पूर्ण होत आहे याचा मला आनंद आहे. या प्रकाशनाला ई साहित्यने केलेल्या सहकार्यासाठी त्यांचा मी आभारी आहे.

अजित नि. फडकुले, सोलापूर
ajitphadkule@hotmail.com
९४२२४६३६४२

’ संत चोखामेळा : अश्रूंची कहाणी ’ हे प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक ‘सुविद्या प्रकाशन’ यांनी २००३ साली प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे चिरंजीव व वारस श्री अजित फडकुले यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्या्चे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

ajitphadkule@hotmail.com

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# संत चोखामेळा : अश्रूंची कहाणी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे चिरंजीव व वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.

## पुस्तकं वाचून कोणाला शहाणपण येतं का?

हो! आम्ही म्हणतो हो. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**अनुभव पुस्तक असतात आणि पुस्तक अनुभवच असते.**

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे**.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

समाजमनात समतेचा विचार पेरणाऱ्या
म. जोतिबा फुले
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
पू. साने गुरुजी
यांना कृतज्ञतापूर्वक.

# संत चोखामेळा यांच्या अश्रूंचा अर्थ

साऱ्या जगात संचार करून आलेले एक विज्ञानशास्त्री मला म्हणाले,

'दर दिवशी जगात नवनवीन शोध लागत आहेत. शास्त्रज्ञानाची प्रगती वेगानं होत आहे. कालची स्थिती आज नाही. पण झपाट्यानं बदलणाऱ्या या जगात आपल्या संतांची भावसुंदर आणि समर्थ कविता मात्र स्थिर आहे. कारण ती शाश्वत मूल्यांच्या पायावर उभी आहे. दररोज रात्री झोपण्यापूर्वी संतांचं कोणतंही काव्य पाचदहा मिनिटं वाचतो. ज्ञानेश्वरांची ओवी, नामा तुकयांचे अभंग, चोखामेळा, सावता माळी, जनाबाईचं काव्य जे हाताला येईल ते वाचतो. मनावरचे ताण ओसरून जातात. मानसिक कोलाहल थांबतो. शांत झोपी जातो. मनाला प्रसन्नता देण्याची एक आगळी शक्ती संतांच्या साहित्यात आहे याचा नेहमीच प्रत्यय येतो. शतकं उलटली तरी संतकाव्यातला प्राणवायू अल्पांशानंही कमी झालेला नाही. संतांची कविता ही संजीवनी आहे.'

त्या शास्त्रज्ञाचं बोलणं भाबडेपणाचं नाही. संतसाहित्यात शांती, प्रेम, करुणा, भक्ती, दुःखितांविषयीची सहानुभूती, माणुसकीवरील श्रद्धा हे गुणधर्म आहेत. या बळावरच हे साहित्य शतकानुशतकं माणसाला आधार देत आहे. मराठी साहित्याची शक्ती आणि प्रतिष्ठा वाढवण्याचं कार्य संतवाणीनं केलं यात शंका नाही. हे साहित्य म्हणजे महाराष्ट्राच्या मर्मबंधातली मौलिक ठेव आहे. साहित्याच्या श्रेष्ठपणाचा एक निकष असा आहे की, जे काळाच्या ओघात वाहून जात नाही, आपला प्रभाव हरवून बसत नाही ते साहित्य श्रेष्ठ प्रतीचं असतं. बैलगाडीच्या युगात लिहिलं गेलेलं संतसाहित्य आजच्या वेगवान विमानांच्या युगातही आपल्याला भावनिक आणि तात्त्विक आधार देतं. सोबत करतं. जीवनाच्या चिंतनातून आणि माणसाला वेढून बसलेल्या अटळ दुःखांच्या निरीक्षणातून, अनुभवातून उमटलेले माणुसकीचे शब्द म्हणजे संतसाहित्य. संतांनाही दुःखवेदनांच्या चक्रव्यूहातून जावं लागलं. त्यांच्या वाटेतही नियतीनं आणि समाजव्यवस्थेनं काही काटे पेरले होते. काट्यांची शल्यं सहन करीत फुलांची शेती करीत राहणाऱ्या संतांनी आपल्या विचारातून आणि कृतीतून समाजाला सुगंध दिला. म्हणूनच त्यांना 'संत' म्हणायचं. तेराव्या शतकात चंद्रभागेच्या तीरावर

संतकाव्याचं भरघोस पीक आलं. पंढरीचा विठ्ठल आणि समता-ममता यांचा संदेश देणारा भागवत संप्रदाय यांनी संतांच्या प्रतिभेला बळ दिलं. ज्ञानदेवांनी या काव्यमंदिराचा पाया रचला. तर तुकाराम त्याचे कळस झाले. चार-पाच शतकांच्या या कालप्रवाहात अनेक संतकवी आणि संत कवयित्री यांच्या काव्यधारा मिसळलेल्या आहेत. मराठी भाषा आणि महाराष्ट्र यांच्या विकासाची कहाणी संतांच्या वाणीनं प्रभावित झाली आहे. या संतकाव्याच्या चंद्रभागेत काही संतांचे दुःखाश्रूही मिसळलेले दिसतात. समतेचा ध्वज उंचावणाऱ्या संतसंप्रदायात काहींच्या पदरात विषमतेची विषारी फळं पडली. 'जे जे भेटे भूत, ते ते जाणिजे भगवंत' असा घोष करणाऱ्या संतांच्याही कपाळावर परंपरावादी कर्मठांनी जातीपातींच्या चिठ्ठ्या चिकटवून टाकल्या. त्यामुळं समतावादी संतांनाच विषमतेच्या धगीत होरपळावं लागलं. रूढी आणि परंपरा यांच्याविरुद्ध बंडाचा आवाज उठवण्याचा प्रयत्न काहीजणांनी केला. पण विषमतेची चाकोरी बुजवण्याचे प्रयत्न मध्ययुगात अयशस्वी झाले. आजच्या शास्त्रीय युगातही ओठांत समता आणि पोटात विषमता हे चित्र दिसतं. नवयुगातही फुले-आंबेडकरांना पुराणमतवादी प्रवृत्तींनी छळल्याची नोंद आहे. आमच्या संस्कृतीत समतेचा जयघोष आहे. पण प्रत्यक्ष जीवनात मात्र जात आणि संप्रदाय, उच्चनीचता यावरून नानाप्रकारचे भेद निर्माण झालेले आहेत. एकविसाव्या शतकातही भेदभावनेच्या भिंती अद्यापि भक्कम आहेत. माणसाच्या कर्तृत्वापेक्षा त्याच्या जातीला आणि पंथाला महत्त्व देणारी या देशातली प्रवृत्ती उत्तरोत्तर मजबूत होत असल्याचं दृश्य दिसतं. जातीच्या हरळीचं मूळ उपटून टाकणारे बलिष्ठ हात कित्येक वेळा जन्माला आले पण हरळीची मुळं अधिक चिवट असल्याची खूण पटली आहे. संतांनादेखील विषमतावादी परंपरेनं जात चिकटवली ही आपल्या समाजजीवनाची शोकांतिका आहे.

महात्मा कबीर म्हणाले होते, 'साधूची जात पाहू नये. त्याचं चारित्र्य आणि ज्ञान पाहावं. तरवार खरी मोलाची असते. तिची म्यान पडून राहू द्या.' पण म्यानच महत्त्वाची ठरली तरवार मात्र गंजून गेली. कबीर हिंदू की मुसलमान या प्रश्नावरून त्याचे अनुयायी भांडत राहिले. जणू काही कबीराची जात कोणती हे निश्चित झाल्याशिवाय त्याच्या श्रेष्ठत्वाचा उलगडा होऊ शकणार नाही. महाराष्ट्रातही संत तुकारामांच्या प्रतिभेला महत्त्व न देता त्यांच्या जातीवरच बोट ठेवण्याची करंटी प्रवृत्ती आजही शाबूत आहे. खरं तर संत हा मनानं आणि वृत्तीनं आकाशासारखा निखळ व व्यापक असतो. त्याच्यावर जातीचा शिक्का मारणं हे बौद्धिक

दिवाळखोरीचं लक्षण आहे. पण तुकाराम कुणबी होते म्हणून त्यांना ब्राह्मणाची प्रतिष्ठा मिळू शकत नाही. संत नामदेव शिंपी होते आणि संत चोखामेळा महार होते. हे हलक्या जातीचे संत असं म्हणणाऱ्यांची जात कोणती ? हाच खरं तर संशोधनाचा विषय होऊ शकतो. कनिष्ठ जातीतल्या संतांच्या कवितेत दुःखवेदनेचे सूर आहेत. सामाजिक अन्यायाविरुद्ध त्यांनी गायिलेली गाऱ्हाणी आहेत. जातीमुळं समाजात स्थान नाही. आणि मंदिरातही दर्शन घेण्याचा अधिकार नाही. ही छळणूक मध्ययुगात श्रेष्ठ ईश्वरभक्तालाही सोसावी लागली. आपल्या दुःखदैन्याची आणि शोषणाची करुण कहाणी कनिष्ठ जातीच्या संतांनी आपल्या काव्यातून मांडली आहे. ती वाचताना माणूस माणुसकीला कसा वंचित झाला होता हे लक्षात येतं. माणूस व्हायला शिकवणारा धर्म माणसांना केव्हा कळणार ? या प्रश्नाचं उत्तर सापडत नाही.

भागवत धर्मानं भक्तीच्या क्षेत्रात समता विचाराची मुहूर्तमेढ रोवली. ज्याच्या मनात भक्तीचा उमाळा आहे त्याला परमेश्वरप्राप्ती होऊ शकते. जात आणि संप्रदाय, कुळ आणि वंश यांची कुंपणं भक्तीमुळं गळून पडतात. वर्णव्यवस्थेत भक्ताची पायरी कोणती हा तपशील क्षुद्र आणि निरर्थक ठरतो. भक्तीचा महिमा ज्ञानापेक्षाही अधिक आहे असं भक्तिसंप्रदायानं मानलं. ईश्वराच्या दरबारात प्रामाणिक भक्तीमुळंच स्थान मिळू शकतं हा विचार भागवत धर्मानं लोकमनात रुजवला. आपल्या अकुलीनत्वाचं दुःख भक्तांच्या मनांतून त्यामुळं दूर होऊ लागलं. भगवद्गीतेत हा विचार आलेला आहे.

**मां हि पार्थ व्यपाश्रित्य ये ऽ पि स्युः पापयोनयः।**
**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम्॥**

भक्तीच्या आश्रयानं पापयोनीत जन्मलेल्या सर्वांना, स्त्री, वैश्य आणि शूद्र यांना देखील परमगती प्राप्त होते. पण स्त्री, वैश्य आणि शूद्र हे कनिष्ठ प्रतीचे आहेत किंवा काही लोक पातकी कुळातले आहेत असा जो अर्थ या श्लोकातून निघतो तो मान्य करणं कठीण आहे. माणसांचं हे वर्गीकरण चुकीच्या गृहीतकृत्यांवर आधारलेलं आहे. कुळ, जाती आणि वर्ण हे हलके किंवा भारी, उच्च किंवा नीच हे कशाच्या आधारावर ठरवायचं ? माणूस हा माणूस आहे, जन्माच्या आणि कुळाच्या आधारानं त्याच्यावर श्रेष्ठ कनिष्ठत्वाचे शिक्के मारण्याची कल्पना मुळातच अशास्त्रीय आहे. माणसांचं शूद्रपण किंवा मोठेपण त्यांच्या कर्तृत्वावर अवलंबून आहे. पण जन्माच्या भांडवलावर एखाद्याला प्रतिष्ठेची सनद मिळते आणि

दुसऱ्याला जन्मभर उपेक्षित अवस्थेत जगावं लागतं. हा अन्याय आहे. ईश्वर हे जर सुसंगतीचं, सामर्थ्याचं, न्यायदृष्टीचं आणि प्रेमाचं प्रतीक असेल तर तो ईश्वर असल्या विषमतेला कधीच मान्यता देणं शक्य नाही. विषमतेचा निर्माता ईश्वर नसून माणूसच आहे. पण स्वार्थी धर्मपंडितांनी वर्णव्यवस्थेची निर्मिती परमेश्वरानंच केली असं सांगून सामाजिक विषमतेभोवती धार्मिकतेचं वलय निर्माण केलं. महार संतांनी आपल्या मनाचं दुखणं व्यक्त करताना स्पष्टपणे म्हटलं आहे.

**एकासी कदान्न एकासी मिष्टान्न। एका न मिळे कोरान्न मागतांचि ॥**
**एकासी वैभव राज्याची पदवी। एका गावोगावी भीक मागे ॥**
**हाचि न्याय तुमचे दिसतो की घरी। चोखा म्हणे हरि कर्म माझे ॥**

संत चोखामेळा यांचे हे उद्‌गार आहेत. जातीय विषमता ही जन्मसिद्ध असते आणि ती ईश्वरानं निर्माण केलेली आहे हा विश्वास बहुसंख्य लोकांना वाटावा असा पोथ्यापुराणांनी आणि पुरोहितांनी प्रचार केला होता. याचा परिणाम समाजविघटन होण्यात झाला. जातीपातीचे गट तयार झाले. एकाच धर्माची माणसं शेकडो जातउपजातीत विभागली गेली. त्यांच्यात उच्चनीचभाव प्रबल झाला. अस्पृश्य समजला गेलेला वर्ग आपल्या दैवाला दोष देत शतकानुशतकं गुलामगिरीत पिचत राहिला. दारिद्र्य आणि अज्ञान, शोषण आणि अन्याय यांच्या जात्यात भरडला गेला. संपूर्ण भारतीय समाजजीवनावर त्याचे अत्यंत अनिष्ट परिणाम झाले. आजही त्या परिणामातून आपली सुटका झालेली नाही. जीवनाच्या सर्व क्षेत्रातही जातीय उच्चनीच विचारांचा अजूनही बराच प्रभाव आहे असं विधान करता येतं. बुद्ध- महावीरांनी समतेची चळवळ सव्वीस शतकांपूर्वी सुरू केली. तिला थोडं फार यश येईल अशी चिन्हं दिसत होती. पण विषमतेचा विचार वाढत गेला. आज स्वतंत्र भारतात लोकशाही राज्य अस्तित्वात आलेलं आहे. पण लोकशाहीच्या शुभ्र वस्त्रांवर जातीयतेचे, धर्मांधतेचे, श्रेष्ठ-कनिष्ठ भावाचे अनेकानेक काळे डाग पडून हे वस्त्र मळकट बनलेलं आहे. माणसाला जात आणि वर्ण आवश्यक आहे काय ? या मूलभूत प्रश्नाचं उत्तर मिळत नाही. जातीवर्णांच्या बेड्यांतून ज्या दिवशी भारतीय मनुष्य मुक्त होईल त्याच दिवशी खरा स्वातंत्र्यदिन उगवला असं म्हणता येईल. 'धिक् तुमचा आचार विचार' असं संत चोखामेळा का म्हणाले हे समजून घेतलं पाहिजे.

**संतकवी चोखामेळा**

चोखामेळा हे ज्ञानेश्वर आणि नामदेव यांना समकालीन असलेले भक्त आणि कवी. सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढे हे त्यांचं गाव, पण पंढरपुरातच त्यांचा बराच काळ गेला. त्यांच्या जन्मदिनांकाची नोंद इतिहासात नाही. मृत्यूचा दिनांक मात्र नोंदलेला आहे. वैशाख वद्य पंचमी शके बाराशे साठ म्हणजे सन १३३८. मंगळवेढ्याला गावकुसाचं बांधकाम करीत असताना ते अंगावर कोसळून चोखोबांना मृत्यू आला. या संत कवीची जीवनकहाणी कारुण्यानं अंतर्बाह्य भिजलेली आहे. चोखोबा महार होते. शूद्राला समाजाच्या चौकटीत सर्वात कनिष्ठ स्थान आमच्या शास्त्र-पुराणांनी दिलं होतं. एकच देव सर्व विश्वाची निर्मिती करतो. हे मान्य करूनही काही विषमतावादी शास्त्रांनी परमेश्वरानं चार वर्ण निर्माण केले असं मानलं आहे. त्यांच्या मते ब्राह्मण हा ईश्वराच्या मुखातून, क्षत्रिय बाहूतून, वैश्य मांडीतून तर शूद्र हा पायापासून निर्माण झाला. म्हणजे ब्राह्मण हे मस्तक तर शूद्र म्हणजे पाय किंवा पायाखालचे असा अजब तर्कवाद लढवला गेला. शास्त्र लिहिणारे ब्राह्मणच होते. तेव्हा त्यांनी आपलं स्थान सर्वोच्च महत्त्वाचं आहे हे पुन्हा पुन्हा घोषित करावं यात आश्चर्य नाही. शूद्र आणि अतिशूद्र यांना गावात राहायला बंदी करण्यात आली. त्यांनी गावाबाहेर राहून ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य यांची चाकरी करावी, सगळी हलकी समजली जाणारी कामं त्यांनी करावीत अशी तरतूद करण्यात आली. समाजजीवनात शूद्र वर्गाला जागा नव्हती. उपेक्षा आणि तिरस्कार, उपासमार आणि वेदना, बहिष्कार आणि अन्याय हे शूद्रवर्णाच्या जीवनाचे घटक होते. संत चोखोबांनी आपल्या अभंगात म्हटलं आहे,

**उच्छिष्टाची आशा भुंकतसे श्वान ।**
**तैसा मी एक दीन आहे तुमचा ।।**
**चोखा म्हणे मी एका घासाची भाकरी ।**
**करितो मी द्वारी तुमचिया ।**

हा अभंग उद्धृत करताना आज माझ्या मनाला वेदना होतात. संकोच वाटतो. लाजेनं मान खाली जाते. पण हा अभंग उच्चारताना आणि स्वतःला 'उच्छिष्टाची आशा करणारा श्वान' म्हणवून घेताना संत चोखोबांच्या मनाची काय अवस्था झाली असेल ? चोखोबांना हे उद्गार काढावे लागले हेच धर्म आणि संस्कृती यांचं अधःपतन आहे. माणसासारखा माणूस भाकरीसाठी लाचार बनतो आणि त्याला आमची समाजव्यवस्था लाचार बनवते हे चित्र ओंगळ,

असंस्कृतपणाचं आहे . चोखामेळ्याचा अपराध काय होता ? तो महार होता ? तो शूद्र होता. हाच ना ? ब्राह्मणाचा सद्गुण कोणता ? तो ब्राह्मणाच्या घरी जन्मला हाच ना ? जन्म हा श्रेष्ठ-कनिष्ठत्वाचा निकष मानणं हे किती हास्यास्पद आहे. याचं स्पष्टीकरण करण्याचं कारण नाही. कोणत्या अर्थानं संत चोखामेळा कनिष्ठ होता ? विद्येची परंपरा नसलेल्या झोपडीत जन्म होऊनही तो उत्कट भावकवी झाला. त्याच्या कवितेत जीवनाचं तत्त्वज्ञान आहे भक्तीचा उद्रेक आहे. कवित्वात प्रसाद आणि माधुर्य हे गुणधर्म आहेत. आपल्या दुःखांचा आणि आकांक्षांचा अत्यंत वास्तव आविष्कार त्याच्या काव्यात आहे. ज्ञानेश्वर आणि नामदेव यांच्या इतकीच त्याच्याही मनात भक्तीविचारांची उदात्तता आहे. तीनशेपेक्षा अधिक अभंग लिहून मराठी अभंग काव्याला चोखोबांनी समृद्ध केलं. निढळाच्या घामावर जगणारा हा कष्टकरी कवी आणि संत हे महाराष्ट्र संस्कृतीचं एक लेणं आहे. पण त्याची योग्यता ओळखणारे हाताच्या बोटावर मोजण्याइतके लोक तत्कालीन समाजात होते. तेराव्या शतकातले काही संत त्याचा आदर करीत होते. पण ते देखील अस्पृश्याच्या पदरात न्याय टाकू शकत नव्हते. परंपरेच्या प्रवाहाविरुद्ध जाण्याची राहोच पण बोलण्याचीही शक्ती कोणात नव्हती. त्यामुळं गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, जनाबाई, कान्होपात्रा, भागू, सोयराबाई, निर्मळा, कर्ममेळा आणि बंका आणि अन्य कित्येक खालच्या स्तरातले भक्तकवी उपेक्षेच्या चरकात पिळले जात होते. यांच्या अश्रूंची दखल कोणत्याही शंकराचार्यानं घेतली नाही. उलट त्या काळातले धर्ममार्तंड विषमता ही ईश्वरप्रणीत आहे असं सांगून तिचं समर्थन करीत होते.

संत चोखामेळा यांचं संपूर्ण कुटुंब कवींचंच होतं. चोखोबांची पत्नी सोयराबाई, बहीण निर्मळा, मुलगा कर्ममेळा आणि मेहुणा बंका विठ्ठलाचं नामस्मरण आणि भजन करीत काव्यरचना करीत होते. विठ्ठल हाच त्यांना आधार होता. त्यांच्या नामसंकीर्तनातच त्यांना थोडाफार आशेचा आणि आनंदाचा अनुभव येऊ शकत होता. संत चोखोबांपासून कुटुंबातल्या सर्वांनीच प्रेरणा घेतली होती. चोखोबांना संत नामदेवांची अनेक कीर्तनं ऐकायला मिळाली. चंद्रभागेच्या वाळवंटात शेकडो भक्तांच्या मेळाव्यात एका कोपऱ्यात बसून नामदेवांची रसाळ वाणी त्यांनी कानामनात साठवून ठेवली. ज्ञानेश्वर माऊली (चोखोबांनी ज्ञानेश्वरांचा उल्लेख माऊली असाच केला आहे.) त्यांना पंढरीतच भेटली. अमृतालाही पैजेवर जिंकणारी ज्ञानेश्वरांची मराठी भाषा चोखोबांनी आसुसलेल्या मनानं ग्रहण केली. चंद्रभागेच्या

वाळवंटावर ज्ञानेश्वर आणि चोखामेळा हे ब्राह्मण आणि महार एकमेकांना उराउरी भेटत होते. भक्तीच्या वातावरणात भेदाला जागा नव्हती. सातशे वर्षांपूर्वी समतेची आणि ममतेची सुंदर अक्षरं या दोन संतांनी चंद्रभागेच्या तीरावर लिहून ठेवली. नामदेवांचं कीर्तन हा देखील समत्व विचाराचा वस्तुपाठ होता. अठरापगड जातीजमातीचे लोक कीर्तनाला एकत्र येत होते. तेव्हा कोणालाही जात आठवत नसे. एका अर्थानं ही समतेची अंधुक पहाट उगवायला सुरुवात झाली होती. भक्तीच्या क्षेत्रातली ही क्रांती होती. ही सामाजिक क्रांती मात्र नव्हती. शास्त्र आणि परंपरा यांना वळसा घालण्याचा हा प्रकार होता. ०भक्तीच्या क्षेत्रातली ही समता सामाजिक क्षेत्रात मात्र येऊ शकली नाही. समाजजीवनात ठाण मांडून बसलेली विषमता, कुळ, वंश आणि जात यांचं वर्चस्व कायम राहिलं. संतांचा मार्ग समतेचा होता यापेक्षा अधिक तो ममतेचा होता. भूतदयेचा होता. पण त्यांनासुद्धा विषम सामाजिक व्यवस्था उखडून टाकता आली नाही. तसा प्रयत्नही त्यांनी केला नाही. संत एकनाथांनी नदीच्या वाळवंटावर उन्हात कासावीस झालेल्या एका महाराच्या पोराला कडेवर घेऊन महारवाड्यात पोहोचविल्याची कथा आहे. ही त्यांच्या वत्सल मनाची साक्ष देते. सामाजिक विषमतेला त्यांनीही उत्कटतेनं विरोध केला असं दिसत नाही. संत चोखामेळा आणि संत तुकाराम यांच्या काव्यात विषमतेवर जसे तीव्र प्रहार त्यांनी केले आहेत तसा आवेगपूर्ण विचार अन्य संतकाव्यात आढळत नाही. संत रामदासांनी तर वर्णव्यवस्थेचं समर्थन केलं आहे. पण भक्तीच्या मार्गात जातीयतेला स्थान मिळू नये या दृष्टीनं संतांनी केलेलं कार्य महत्त्वपूर्ण आहे. सामाजिक सुधारणावादाच्या चळवळीला संतांच्या कार्यामुळं वैचारिक बळ मिळत गेलं हा इतिहास आहे. ज्ञानेश्वर आणि एकनाथ हे संत सोडले तर अनेक संत आणि कवी बहुजन समाजातून आणि दलित, उपेक्षित समाजातून उदयाला आलेले आहेत. वारकरी पंथानं सामान्य माणसाला आधार दिला. त्याच्या मनातून यातिहीनत्वाची न्यूनगंडात्मक जाणीव काढून टाकली. भक्तियोग आणि कर्मयोग यांचा त्यानं समन्वय करण्याचा प्रयत्न केला. धार्मिक व सांस्कृतिक मूल्यांविषयी आदर निर्माण केला. याचा परिणाम होऊन सामाजिक दृष्ट्या खालचे समजले गेलेले लोकस्तर जागे झाले. तेही आत्मविश्वासानं लिहू लागले. आपली सुखदुःखं व्यक्त करू लागले. अशिक्षित स्त्रियांदेखील लेखनातून आत्माविष्कार करू लागल्या, वारकरी पंथाचं हे कार्य पुरोगामी स्वरूपाचं आहे यात कसलीही शंका नाही. क्रांती हा शब्द व्यापक अर्थाचा द्योतक आहे. त्या अर्थाला मर्यादा

घातली आणि वारकरी संतांचा काळ व त्यावेळची परिस्थिती लक्षात घेतली तर क्रांतीच्या दिशेनं संतांनी महत्त्वाचं पाऊल टाकलं, असंच विधान करता येईल.

महानुभाव पंथानं यापूर्वी जातिभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. चक्रधर स्वामींनी वर्णरहित समाजाची भूमिका मांडली होती. त्यांचे आचार-विचार क्रांतिकारक होते. पण महानुभाव पंथ सर्वसामान्य माणसाशी समरस होऊ शकला नाही. वारकरी पंथाच्या तुलनेत त्याला लोकाश्रय फार कमी मिळाला. नामदेव, तुकाराम जसे लोकांचं भक्तिमार्गात नेतृत्व करीत होते, तशा उंचीचा लोकाभिमुख संत महानुभाव पंथात आढळत नाही. म्हाईंभंट, नागदेवाचार्य, केशवराजसूरी वगैरे विद्वान पंडित या पंथात झाले. महानुभवीयांनी मराठी भाषेचा ध्वज उंच उचलून धरला. महाराष्ट्रप्रेमाचा घोष केला. पण लोकांत मिसळण्यासाठी जी वृत्ती लागते ती त्यांच्यात कमी पडली. महानुभावीय पंडितांचा विचार पुरोगामी असूनही तो लोकांत पसरू शकला नाही. वारकरी पंथानं मात्र लोकप्रबोधनाचं कार्य ज्ञानेश्वरांपूर्वीपासून अखंड चालू ठेवलं होतं. समाजातल्या कनिष्ठ वर्गाशीही त्यांचा सतत संवाद होत होता. किंबहुना ब्राह्मणांपासून स्त्री-शूद्रांपर्यंत हा पंथ प्रसार पावत गेला. भक्ती, करुणा आणि 'भेदाभेदभ्रम अमंगळ' ही समतेची शिकवण यामुळं महाराष्ट्रातल्या लोकसंस्कृतीला आधार आणि आकार देणारा एक प्रमुख धर्मपंथ म्हणून या भागवत संप्रदायाला विशेष महत्त्व प्राप्त झालं. आजही भक्तिपंथ, पंढरीचा विठ्ठल आणि आषाढी कार्तिकी वारी यांना महाराष्ट्र जीवनात प्राप्त झालेली महती कायम आहे. पंढरपूरच्या वारीत केवळ भोळेभाबडे वारकरी सामील होतात असं नाही. सुशिक्षित, उच्चविद्यासंपन्न भक्तिमार्गी जनतेचाही या वारीत सहभाग असतो. वारकरी कीर्तन ऐकताना नामघोष करीत नाचणारे वैष्णव पाहिले म्हणजे भक्तिभावनेच्या लाटा किती प्रचंड असतात याची कल्पना येते. ईश्वरभक्ती शुद्ध बुद्धीच्या कसोटीवर घासून पाहता येत नाही. ती अंतःकरणाची ओढ आहे. या भक्तीच्या बळावरच तुकोबांसारखा संत म्हणाला, 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास, कठिण वज्रासी भेदू ऐसे' जन्मभर उपेक्षित आणि अपमानित अवस्थेत राहिलेले चोखामेळाही म्हणतात,

**ते नाम सोपे विठ्ठल विठ्ठल। नको काळ वेळ जपे आधी।।**
**चोखा म्हणे मज भरवसा नामाचा। येणे कळिकाळाचा भेव नाही.।।**

भक्तिरसाची एक वादळलाट वारकरी पंथानं महाराष्ट्रात आणली. पण भक्तीबरोबरच समतेचा विचार सर्व जीवनव्यवहारात या पंथानं आणला नाही.

त्यामुळं सामाजिक परिवर्तन झालं नाही. ही या पंथाची एक मर्यादा म्हणून उल्लेखावी लागते. चोखामेळा हे विठ्ठलाचे अत्युत्कट शुद्ध भक्त होते. पण त्यांना उभ्या जन्मात मंदिरात जाता आलं नाही आणि विठ्ठलाला समोर उभं राहून नमस्कारही करता आला नाही. 'विठ्ठल-विठ्ठल' असा त्यांच्या कवितेत जो ध्यास आणि आक्रोश ऐकू येतो तो पाहिला म्हणजे जातीय विषमतेचे भेसूर परिणाम जाणवतात. चोखोबांची कविता ही एका अशा वेदनेची कहाणी आहे की जी वेदना कित्येक शतकं केवळ पूर्वजन्माचं संचित म्हणून लक्षावधी, कोट्यवधी अस्पृश्यांना सहन करावी लागली. धर्माला आणि ईश्वराला विषमता मान्य असावी यापेक्षा माणुसकीची दुसरी विटंबना कोणती ? चोखामेळ्याची कविता त्याच्या जीवनवैफल्याची करुणभीषण कहाणी सांगते. मराठी संतकाव्यात इतकी करुणार्त कविता दुसरी नाही. अनेक अभंगांतून चोखोबांच्या दुःखी मनाचे उष्ण उसासे प्रकट झाले आहेत. ते अनेक ठिकाणी म्हणतात,

**देवा कां हे साकडे घातिले । निवारा हे कोडे माझे तुम्ही ।।**
**समर्थे आपुल्या नामासी पाहावे । मनी उमजावे आपुलिया ।।**
**यातिहीन आम्हां कोण अधिकार । अवघे दूरदूर करिताती ।।**
**चोखा म्हणे ऐसा हीन नरदेह । पडिला संदेह काय करू ।।**

चोखोबा याची कविता एका अटळ सामाजिक दुःखाची किंकाळी आहे. रानात वणवा लागल्यावर सारेच पक्षी ओरडतात. पण ज्याचे पंख जळाले त्याचा चीत्कार सर्वाधिक हृदयभेदक असतो. चोखामेळा आणि त्याचं कुटुंब म्हणजे समाजातली सर्वात खालची पायरी होती. अनेक पिढ्या त्यांनी अंधारात काढल्या. त्याचं दर्शन या कवितेत होतं.

महार जातीत जन्माला येणं हे आपलं दुर्भाग्य आहे. पूर्वजन्मीच्या पातकांमुळं हीन जातीत जन्म होतो असला तर्कशून्य, भोंगळ युक्तिवाद पोथ्यापुराणांत सापडतो. त्यावर बहुसंख्य लोक अज्ञानानं विश्वास ठेवतात. आपल्या हीनत्वाची कारणमीमांसा करताना चोखामेळा देखील हीच अंधःश्रद्धा बोलून दाखवतो. आपण पतित आहोत, अकुलीन आहोत यात आपलाच अपराध आहे. परमेश्वराला दोष देण्यात अर्थ नाही, अशा समजुतीनं हा संत म्हणतो,

**'शुद्ध चोखामेळा । करी नामाचा सोहळा ।**
**मी यातिहीन महार । पूर्वी निळाचा अवतार ।।**
**कृष्णनिंदा घडली होती । म्हणोनि महार जन्मप्राप्ती ।।**
**चोखा म्हणे विटाळ । आम्हां पूर्वीचे हे फळ ।।**

'विटाळ' हे पूर्वकर्माचं फळ आहे. मागील जन्मी कृष्णनिंदा घडली म्हणून आपण अस्पृश्य झालो. अशी भ्रांती त्यांच्या मनात उत्पन्न झाली. अस्पृश्यतेची असह्य धग शतकानुशतकं सहन करणारी आणि त्या धगीतच जळून जाणारी असंख्य माणसं प्रारब्धवादी बनली होती. दैववादी असणं हा अज्ञानाचाच भाग आहे. सात शतकांपूर्वीच्या कालखंडात चोखोबा आणि त्यांचं कुटंब आपल्या पूर्वकर्माला दोष देत वाट्याला आलेली सारी दुःखं सहन करीत राहिलं यात आश्चर्य नाही. पण समाजव्यवस्था ईश्वरावर अवलंबून नाही. तिची निर्मिती आणि तिचा विध्वंस माणूसच करीत असतो. काही कुटिलतबुद्धीची माणसं स्वार्थी वृत्तीनं इतरांवर गुलामगिरी लादत असतात. अस्पृश्यतेची प्रथा माणसाच्या किडलेल्या बुद्धीतूनच जन्माला आली. या विषमतेमुळं आपल्या देशाची चिरफाड झाली. समाजजीवनाचे तुकडे तुकडे झाले. त्यातल्या एका हीनदीन तुकड्याची करुणकिंकाळी चोखामेळ्यांच्या कवितेत प्रभावानं उमटली आहे . त्याची पत्नी सोयराबाई हिच्या काव्यातही याच किंकाळीचे प्रतिध्वनी उमटले आहेत. ती देखील आपल्या अभंगात परमेश्वराला विनवते.

**हीनदीन म्हणोनी का गा मोकलिले ।**
**परि म्यां धरिले पदरी तुमच्या ।।**

असं म्हणून शरण आलेल्याकडं पाठ फिरवू नका अशी विठ्ठलाची विनवणी केली आहे. चोखोबांचा मुलगा कर्ममेळा हा संतप्त तरुण आहे. तो विठ्ठलाला जाब विचारतो. 'जन्म गेला उष्टे खाता । लाज न ये तुमचे चित्ता ।।' आम्हाला मात्र हीनत्व लाभलं आहे. पण हा संताप व्यक्त झाल्यावर देखील आपल्याच कर्माला दोष देतो. चोखियाचा म्हणे कर्ममेळा देवा । हाचि आमुचा ठेवा । निर्मळा आणि बंका यांच्या काव्यातही हेच रात्रंदिवस ठसठसणारं दुःख प्रकट झालं आहे. एका फार मोठ्या लोकसमूहाच्या अंतरीची ही तीव्र वेदना आहे. हे केवळ व्यक्तीच्या वाट्याला आलेलं दुःख नाही. ही अनेक शतकांची काळीकुट्ट कहाणी आहे. चोखामेळ्यांची कविता ही जितकी एका विठ्ठलभक्ताची भावकविता आहे. तितकीच ती अस्पृश्यतेच्या वणव्यात होरपळणाऱ्या व्यक्तींची आणि लोकांची दुःखकविता आहे. या परिस्थितीवर मात करण्यात मध्ययुगात तरी कोणताही मार्ग नव्हता. म. फुले आणि डॉ. आंबेडकर यांनी या अन्यायाविरुद्ध रणशिंग फुंकलं. अटीतटीचा संघर्ष करून विषमतेच्या राक्षसी कल्पनेला त्यांनी भडाग्नी दिला. भारताची राज्यघटना समतेवर उभी राहिली. पंढरीचा पांडुरंग साने गुरुजींच्या

चळवळीमुळं मुक्त झाला. आता कोणताही चोखामेळा विठ्ठलाच्या दाराशी दर्शनाची याचना करीत थांबणार नाही. तो प्रत्यक्ष विठ्ठलाच्या पायांवर आपलं मस्तक टेकू शकतो. क्रांतीचं चक्र फिरलं हे खरं. पण डॉ. आंबेडकरांच्या मते ते अर्धंच फिरलं, ते पूर्णपणानं गतिमान करणं आपल्या हाती आहे.

आज एकविसाव्या शतकात जात, संप्रदाय आणि वर्ण यांच्या भिंती अजूनही उभ्या आहेत. फुले आंबेडकरांनी विषमतेला भडाग्नी दिला असं विधान मी केलं पण हा अग्नी देऊनही या पोलादी भिंती ठामपणानं उभ्या आहेत. सामाजिक सुधारणावादी चळवळ राजकीय पक्षांनी मारून टाकलेली दिसते. कारण जातीपातीच्या शिडीवरूनच सत्तेचं सिंहासन मिळू शकतं हे राजकारण्यांना उमगलेलं आहे. प्रत्येक पक्षात जातिवाद आहेच आहे. म्हणूनच क्रांतीचं चक्र पूर्णपणानं फिरलं पाहिजे. संतांनी सांगितलेली समता आणि क्रांतिकारकांनी समतेसाठी केलेला संघर्ष सफल होण्यासाठी मनुष्याच्या मूलभूत प्रतिष्ठेवर विश्वास ठेवण्याचं वातावरण निर्माण केलं पाहिजे. समता आणि बंधुभाव ही आपली स्वप्नं प्रत्यक्षात येण्यासाठी प्रामाणिक प्रयत्नांची जरूर आहे.

संतकवी चोखामेळा यांचं अभंगकाव्य वेदना आणि अश्रू यांनी ओथंबलेलं असलं तरी काव्याच्या निकषांवर परीक्षा करताना ही कविता रसानुभव देणारी श्रेष्ठ कविता आहे हे लक्षात येतं. काव्यशास्त्रातली एकही ओळ न वाचता चोखामेळा उत्कृष्ट कविता लिहू शकले यात आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. जेव्हा अंतरीचे अनिवार हुंदके शब्दाकार घेऊन समूर्त होतात तेव्हा ती रसात्मक कविता होते. चोखोबांना भावपूर्ण लिहिण्यासाठी प्रयास करावे लागले नाहीत. झाडाच्या फांदीला पानं फुटावीत त्याप्रमाणं चोखोबांची कविता सहजगत्या आकाराला आली. कृत्रिमतेचा तिला कुठंही लेप लागलेला नाही. जे हृदयात होतं ते शब्दांत उतरलं आणि कविता सिद्ध झाली. संतकाव्याच्या इतिहासातलं एक हिरवं पान चोखामेळ्याच्या कवितेचं आहे. त्याची कविता सामाजिक वास्तवाशी निगडित आहे.

**निर्मलकुमार फडकुले**

## मनातले -----

'संत चोखामेळा : अश्रूंची कहाणी ' या पुस्तकात चोखामेळ्यांचे चाळीस निवडक अभंग समोर ठेवून त्यावर मी वैचारिक भाष्य केलं आहे. सोलापूर आकाशवाणी केन्द्रावरून ही माझी छोटी व्याख्यानं प्रसारित झाली आहेत. आकाशवाणी केन्द्राच्या अधिकारी सौ. शैला सरदेशमुख यांच्या सूचनेप्रमाणं ही व्याख्यानं प्रत्येक आठवड्यात एक याप्रमाणं प्रसारित झाली. आता त्यात आणखी काही भर घालून या भाष्याला नीटसं आकार दिला आहे. काही वर्षांपूर्वी कै. पुरुषोत्तम मंगेश लाड या आकाशवाणीच्या व्याख्यानमालेत मी दोन विस्तृत व्याख्यानं दिली होती. सांगलीच्या सभागृहात आयोजित केलेली ही व्याख्यानं एकाचवेळी महाराष्ट्रातल्या सर्व केद्रांवरून ध्वनिक्षेपित झाली. श्रोत्यांनी दिलेला प्रचंड प्रतिसाद मी विसरू शकत नाही. आता निवडक चाळीस अभंगांवर इथं मी रसग्रहणात्मक भाष्य केलं आहे.

संत चोखामेळा यांच्या शापित जीवनातला अंधार आणि त्यांच्या मनाला प्रत्यही होणाऱ्या असह्य वेदना यांची जिवंत कहाणी म्हणजे चोखोबांची अभंगवाणी आहे. प्रत्येक अभंग म्हणजे संतानं दुःखार्त होऊन गाळलेला एकेक उष्ण अश्रू आहे. ही कविता बाह्यतः भक्तीची पण अंतर्यामी ती दुःखविवंचनेनं काजळलेली आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचं एक काळवंडलेलं पान म्हणून या कवितेचा उल्लेख करता येतो. मराठी संतकाव्यात या कवितेला महत्त्वपूर्ण स्थान आहे. वाचकांना अस्वस्थ आणि अंतर्मुख करणाऱ्या या काव्याची वैशिष्ट्यं मी विशद करण्याचा संक्षिप्त प्रयत्न केला आहे. संतसाहित्याच्या अभ्यासकांना आणि वाचकांना माझं विवेचन मान्य होईल असा मला विश्वास वाटतो.

माझे मित्र आणि सुविद्या प्रकाशन संस्थेचे संचालक श्री. बाबूराव मैंदर्गीकर यांनी स्नेहभावानं या पुस्तक प्रकाशनाची जबाबदारी घेतली. आणि आता हे पुस्तक सुबक स्वरूपात वाचकांपुढे येत आहे याचं श्रेय त्यांचं आहे. चित्रकार श्री शिरीष घाटे यांच्या कलात्मक कुंचलीनं या पुस्तकाला जे देखणेपण दिलं ते पुस्तकाच्या सामर्थ्यात भर टाकणारं आहे. या दोन्ही मित्रांचे मनःपूर्वक आभार.

**निर्मलकुमार फडकुले**

**जोहार मायबाप जोहार । तुमच्या महाराचा मी महार ।।**
**बहु भुकेला जाहलो । तुमच्या उष्ट्यासाठी आलो ।।**
**बहु केली आस । तुमच्या दासाचा मी दास ।।**
**चोखा म्हणे पाटी । आणिली तुमच्या उष्ट्यासाठी ।।**

संत चोखामेळा यांचा हा अभंग त्यांच्या अगतिक, आर्त आणि पराभूत मनोवृत्तीवर प्रकाश टाकतो. दुःख, द्रारिद्रय आणि लाचारी यापलीकडं या विठ्ठलभक्ताच्या पदरात काहीच पडलं नाही. समाजानं उपेक्षा केली. पावलोपावली अपमानाच्या ठेचा खात जगत राहिलेल्या या भक्तकवीला एकच समाधान होतं. विठ्ठलाचं नाम आणि त्याचं चिंतन हाच त्याच्या उजाड आयुष्यातला एकमेव आसरा होता. चोखामेळ्याची निःसीम श्रद्धा पंढरीच्या पांडुरंगावर होती. त्या श्रद्धेमुळंच तो कसाबसा जगला. त्या श्रद्धेचा ओलावा त्याच्या अंतःकरणात होता म्हणूनच तो मराठी काव्याला आपल्या भावोत्कट अभंगांची देणगी देऊ शकला. तो शिक्षित नव्हता. पण जीवनाचं स्वरूप समजावून घेणारा जीवनचिंतक होता. तो ज्ञानी नव्हता पण शहाणा होता. ज्ञानवंतापेक्षा त्याच्यापाशी असलेलं समंजसपण अधिक मोलाचं होतं. विठ्ठलाच्या आधारानंच जगावं आणि त्याचं नामसंकीर्तन करीत देह सोडावा हे त्याचं स्वप्न होतं. ते त्यानं खरं करून दाखवलं. चोखामेळ्याची आयुष्यकथा अश्रूंनी भिजलेली आहे. पण या खारट अश्रूंच्या सुगंधानं मराठी काव्यात एक आगळा सुवास दरवळत आहे हे लक्षात घेतलं पाहिजे. विठ्ठलाच्या या अनन्य भक्ताला दीनपणानं लोकांची आळवणी करावी लागते हे पाहून आपलं मन व्याकुळ होतं. तो आर्तपणानं समाजाला साद घालीत आहे.

'जोहार मायबाप जोहार । तुमच्या महाराचा मी महार ।।'
बहु भुकेला जाहलो । तुमच्या उष्ट्यासाठी आलो ।।'

ही हृदयभेदक हाक मारणारा, लाचारीचे शब्द उच्चारणारा एक श्रेष्ठ संत माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो. संतांनाही लाचार बनवणारी आमची समाजव्यवस्था चोखामेळ्याच्या अटळ दुःखाला जबाबदार आहे. ज्याच्या हृदयात भक्ती आहे, ज्याच्या जिभेवर परमेश्वराचं नाव आहे, ज्याच्या वाणीला प्रतिभेचा स्पर्श आहे त्यानं 'तुमच्या महाराचा मी महार, तुमच्या उष्ट्यासाठी आलो' असं काकुळतीनं म्हणावं, त्याला तसं म्हणणं भाग पडावं, यात मानव्याच्या अपमान आहे. संस्कृतीचा अधःपात आहे. माणसाला पशुतुल्य वागणूक देणारी कर्मठ

प्रवृत्ती मध्ययुगात किती चिवट आणि दुराराध्य बनली होती त्याचा हा पुरावा आहे. खरं तर देवाच्या दरबारात कोण ब्राह्मण आणि कोण शूद्र ? देव म्हणजे समतेचं आणि ममतेचं अधिष्ठान. देव म्हणजे मूर्तिमंत वात्सल्य. जिथे दुजाभाव आहे. जिथे उच्चनीचतेची कल्पना आहे तिथं देवाचं अस्तित्व असूच शकणार नाही. पण चोखामेळा इथं हीनदीन झालेला दिसतो. उष्ट्या पत्रावळी एकानं गोळा कराव्यात आणि दुसऱ्यानं चांदीच्या ताटातल्या पंचपक्वान्नांचा आस्वाद घ्यावा ही सामाजिक आणि आर्थिक विषमता मान्य करणं किंवा तिचं समर्थन करणं हा अधर्म आहे. चोखामेळ्यासारख्या संतकवीला हे समजत होतं. पण एखादंदुसऱ्या शहाण्या माणसाचं मत बहुसंख्य अज्ञानी माणसांना मान्य नसेल तर माणसाची कशी दयनीय अवस्था होते याचं चित्रण आपल्या प्रत्यक्ष अनुभवावरून संत चोखोबा यांनी केलं आहे. 'बहु केली आस । तुमच्या दासाचा मी दास' असं ते म्हणतात. चोखामेळ्याच्या जीवनाभोवती आवळलेली दास्याची ही शृंखला कधीच तुटली नाही. ही त्या काळाची मर्यादा होती. चोखामेळ्याच्या हृदयातला एक शक्तिशाली हुंकार म्हणजे त्याचं विठ्ठलावरचं नितांत प्रेम होतं. प्रेम, भक्ती आणि अस्पृश्यतेच्या वेदनांनी भेगाळलेलं मन यांचं दर्शन चोखामेळ्याच्या कवितेतून होतं. मराठीतल्या प्रांजल, भावपूर्ण, प्रभावी अभंगांची रचना या संतानं केली.

माणसाचं माणूसपण नाकारून त्याला पिढ्यान् पिढ्या गुलामगिरीच्या साखळदंडांनी बांधून टाकणारी वर्णव्यवस्था माणसाचा कसा पावलोपावली भयानक छळ करीत होती आणि त्यामुळं 'मी तुमच्या दासाचा दास आहे' असे दीनवाणे शब्द एका महनीय संताला उच्चारावे लागले. हे संस्कृतीचं दिसणारं चित्र केविलवाणं आहे. माणसाला बहिष्कृत ठरवणारी ही धर्मनीती आणि परंपरा स्वातंत्र्यविरोधी आहे. विषमतेला पोषक आहे. संत चोखोबांचे व्याकुळ उद्गार सातशे वर्षांपूर्वी उमटले. पण त्या उद्गारांची प्रत्यक्ष परमेश्वरानंही दखल घेतली नाही असं दुर्दैवानं म्हणणं भाग आहे. संत चोखामेळा यांचे अनेक अभंग असेच दुःख, वेदना आणि अश्रू यांनी चिंब भिजलेले आहेत. सात शतकापूर्वीच्या काळात चोखोबा बंडखोरी करू शकत नव्हते. त्यांच्या कवितेत वेदना आहे पण विद्रोह नाही. भक्ती आहे पण त्या भक्तीनं तृप्तीचे क्षण त्यांच्या पदरात टाकले नाहीत. हा एक भावपूर्ण अभंग. चोखोबांच्या घायाळ अंतःकरणाचं दर्शन घडवतो.

'अंतरीचे धावे । स्वभावे बाहेरी' असा हा आसवांनी लिहिलेला अभंग आहे. वाचताना वाचकाचं मन अस्वस्थ होतं.

●●●

**लावण्याचा गाभा त्रैलोक्याची शोभा । विटेवर उभा पंढरीये ।।**
**पाऊले गोजिरी श्रीमुख शोभले । ध्यान मिरवले भिमातीरी ।।**
**वैजयंती माळा किरीट कुंडले । परिधान केले पीत वस्त्र ।।**
**चोखा म्हणे ऐसा लावण्यपुतळा । तो आम्ही देखिला दृष्टिभरी ।।**

भक्ताच्या भावपूर्ण दृष्टीला विठ्ठल कसा दिसतो याचं सुंदर दर्शन या अभंगात घडतं. भक्ती, वात्सल्य, प्रेम या भावना मनाचा विकास करतात. दृष्टीत प्रेम असलं की कुरुपता देखील सुरूपतेत रुपांतरित होते. हृदयाची शक्ती वाढवणारी भक्तिप्रेमाची भावना हे मनुष्याला मिळालेलं एक वरदान आहे. पंढरीचा पांडुरंग डोळां भरून पाहिला की, अनेक भक्तांच्या डोळ्यांतून आनंदाचे आणि कृतज्ञतेचे अश्रू ओघळू लागतात. पांडुरंगाचं दर्शन हा त्यांच्या आयुष्यातला कृतार्थतेचा क्षण असतो. मनात भाव असला म्हणजे पाषाणातही देव दिसू शकतो. संत चोखामेळ्याला विठ्ठलाचं दर्शन कधीच घडलं नव्हतं. दर्शनासाठी तो रात्रंदिवस तळमळत होता. देवाचं रूप आपल्या चित्तात साठवून घ्यावं. पुन्हा पुन्हा ते आठवून पाहावं. कारण ते रूप जीवनातल्या साऱ्या कुरुपतेला आणि दुःखाला नाहीसं करू शकतं हा या संताचा दृढ विश्वास होता. पण चोखोबांच्या प्रारब्धात विठ्ठलाची मूर्ती पाहण्याचं भाग्य मुळीचं नव्हतं. भक्त आणि परमेश्वर यांची ताटातूट करणारी विषमतेची भिंत मध्ये उभी होती. ही भिंत पाडून टाकण्याचं सामर्थ्य प्रत्यक्ष परमेश्वरातही नव्हतं. उलट जात आणि वर्ण, उच्चनीचत्वाच्या कल्पना ईश्वरानंच निर्माण केल्या आहेत म्हणून माणसानं त्या निमूटपणानं मान्य केल्याच पाहिजेत. ही परंपरा सनातन आहे. तिचं उल्लंघन करणं देव आणि धर्म यांच्या विरुद्ध आहे अशी शिकवण चोखामेळ्याला मिळालेली होती. परंपरेला आव्हान देणं त्याला शक्य नव्हतं. मंदिराचा उंबरा ओलांडून आत प्रवेश करण्याचं पातक अस्पृश्य भक्त करू शकत नव्हते. चोखामेळा हताश मनानं आपल्या दुर्भाग्याचं गाणं जन्मभर गात होता. देव देवळात आणि अनन्य भक्त देवळाबाहेर. हीच परिस्थिती पिढ्यान् पिढ्या चालू होती. मंदिराचे बंद दरवाजे उघडण्याचं सामर्थ्य अश्रूंच्या थेंबात असत नाही.

या अभंगात मात्र संत चोखोबा विठ्ठलाच्या सुंदरतेचं संपूर्ण चित्र उभं करतात. ते म्हणतात, 'हा विठ्ठल लावण्याचा गाभा आणि त्रैलोक्याची शोभा आहे. त्याची पाऊलं गोजिरी आहेत. विटेवर उभ्या असलेल्या विठ्ठलाचं श्रीमुख अतिसुंदर आहे. पितांबर नेसलेल्या त्याच्या गळ्यात वैजयंती माळ आहे. कानात कुंडल, मस्तकावर

किरीट आहे. हा लावण्याचा पुतळा मी दृष्टी भरून पाहिला. तृप्त झालो.' प्रश्न असा आहे की, विठ्ठलाची मूर्ती या संताला आपल्या आयुष्यात कधीही पाहता आली नाही. अस्पृश्यानं दूर उभं राहून मंदिराच्या कळसाचं दर्शन घ्यावं हा संकेत होता. या रूढीविरुद्ध बंड करण्याची हिंमत कुणातच नव्हती. मग विठ्ठलाचं हे वर्णन चोखामेळा कसं करतो ? त्याच्या मनात, ध्यानात व चिंतनात रात्रंदिन विठ्ठल होता. आपल्या हृदयाच्या नेत्रांनी, कल्पनेच्या शक्तीनं तो पांडुरंगाला पाहात होता. त्याचं सारं जीवनच पांडुरंगानं अंतर्बाह्य व्यापलेलं होतं. आपल्या मनाच्या पंढरीत राहिलेल्या विठ्ठलाला चोखामेळा केव्हाही भेटू शकत होता. देवभक्तांच्या या भेटीला कोणतीही परंपरा विरोध करू शकत नव्हती. मन हेच मंदिर झाल्यावर आणि भाव हाच देव बनल्यावर दुसऱ्या मंदिरात प्रवेश करण्याची भक्ताला जरूर नसते. पण एक गोष्ट खरी की चोखामेळ्याच्या चर्मचक्षूंना मात्र विठ्ठल कधीही दिसला नाही. भक्ताला दर्शनसुखापासून जन्मभर वंचित ठेवणारी सनातन परंपरा चोखामेळ्याच्या वाटेत आडवी आली नसती तर त्याचा आनंद गगनात मावला नसता. माणसांना माणसापासून आणि देवापासून विभक्त करणारी विषमतावादी वर्णव्यवस्था जन्मालाच आली नसती तर किती बरं झालं असतं. 'आता ही परंपरा संपली आहे. आता कोणताही चोखामेळा 'तो लावण्याचा गाभा' असलेला पांडुरंग डोळां भरून पाहू शकतो. आणि भक्त आणि देव यांची भेट होऊ शकते.

उत्कट भक्ती करणाऱ्या भक्ताला देवदर्शनासाठी मंदिरात जाण्याची आवश्यकता नसते. खरा भक्त प्रतिक्षणी देवाच्या सहवासातच असतो. तो देवाला आपल्या भौतिक दृष्टीनं पाहात नाही. तो आत्मीयतेनं म्हणजेच आत्मिक दृष्टीनं देव पाहातो. संत चोखोबांना भक्तीमुळं ही दिव्यदृष्टी प्राप्त झाली होती असं म्हणावं लागतं. कारण तो पांडुरंग हा 'लावण्याचा गाभा' आहे, 'लावण्यपुतळा' आहे असं हर्षभरानं म्हणतो. दृष्टीत सौंदर्य असलं की सृष्टीत ते सौंदर्य दिसू लागतं. चोखामेळ्याची ही कविता त्यांच्या कल्पनाविलासाची पांडुरंग काळा की गोरा हे जन्मात पाहायला मिळालं नाही त्या या उपेक्षित भक्ताला पांडुरंगाची पाऊलं कशी गोजिरी आहेत हे देखील दिसलं. 'जे न देखे रवी, ते देखे कवी' या विधानाची यथार्थता पटते. हा 'साजिरा गोजिरा लावण्यपुतळा' विठ्ठल चोखोबांच्या मनात कायमचा उभा होता. पुंडलिकानं फेकलेल्या विटेवरचा विठ्ठल चोखोबांना दिसला नाही. पण त्यांच्या हृदयाच्या विटेवरचा विठ्ठल त्यांना रात्रंदिवस दिसत होता.

●●●

**फुलाचे अंगा सुवास असे । फूल वाळलिया सुवास नासे ।।**
**मृत्तिकेचे घट केले नानापरी । नाव ठेविले रांजण माथण घागरी ।।**
**विराली मृत्तिका फुटले घट । प्राणी का फुकट शोक करी ।।**
**चोखा म्हणे ऐसे मृगजळ पाही । विवेकी तये लायी न गुंतेची ।।**

संतांची कविता ईश्वराच्या भक्तिप्रेमाचा आविष्कार करते त्याप्रमाणं ती जीवनातल्या सुखदुःखात्मक अनुभवांनाही रेखांकित करते. ही केवळ भाबड्या भक्तीची कविता नव्हे. सुखदुःखांकडं पाहण्याची प्रगल्भ जाणीव संतांच्या ठायी होती. संतकाव्य लोकमनात रुजलं ते त्यातल्या भावनिक आणि वैचारिक सौंदर्यामुळे. चोखोबांच्या काव्यात दुःखवेदना आहेत. वर्णविषमतेमुळं त्यांच्या पदरात उपेक्षेचे आणि अपमानाचे असंख्य क्षण पडले. त्यामुळं त्यांच्या कवितेत अनेक ठिकाणी त्यांच्या अंतःकरणाचं आक्रंदन ऐकू येतं. पण म्हणून या कवितेत केवळ आपल्या यातनांची आर्त कहाणीच त्यांनी सांगितली असं मात्र नव्हे. जीवनाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न संत चोखोबा आपल्या काही अभंगांतून करतात. त्यांच्या चिंतनाची कक्षा त्यामुळं स्पष्ट होते. काव्यात जीवनविचारांचे सुसंगत वास्तव सूर उमटले की, ते काव्य वाचकाला अंतर्मुख करतं. एका विशिष्ट विचाराकडं चिंतनशील काव्य ओढून नेतं. जेव्हा तुकाराम 'सुख पाहाता जवापाडे, दुःख पर्वताएवढे' म्हणतात तेव्हा ते जीवनावर आपल्या अनुभवाच्या आधारानं भाष्य करीत असतात. चोखोबांच्या प्रस्तुत अभंगात एक जीवनभाष्य आहे. परिचयाचे दृष्टांत घेऊन त्यांनी ते परिणामकारक रीतीनं मांडलेलं आहे. ते सांगतात, फुलाच्या अंगी सुवास असतो. पण फूल वाळल्यावर तो सुगंध नष्ट होतो. नाना प्रकारची मातीची भांडी तयार होतात. कोणी रांजण म्हणतो, कोणी घागर म्हणतो. पण माती विरून गेली की घट फुटून जातो. माणूस व्यर्थच दुःख करीत बसतो. माझं म्हणणं असं आहे की, हे सारं मृगजळ आहे. हा आभास आहे. त्याच्यामध्ये विचारवंतानं गुंतून पडू नये. कारण ताजं टवटवीत फूल थोड्याच वेळात वाळून जाणार. मातीचे घट फुटून जाणार. जीवनाचं मृगजळ देखील आटून जाणार. हा सृष्टिक्रम विचारी माणसानं लक्षात घ्यावा. मृगजळाबद्दल आसक्ती धरू नये.

हे संत चोखोबांचं जीवनावरचं भाष्य जितकं मार्मिक तितकंच सर्वांच्या अनुभवाला येणारं आहे. पण तरीही मोहानं भारलेला माणूस भ्रमिष्टपणानं मृगजळात गुंतून पडतो. ज्याचं अस्तित्वदेखील शंकास्पद आहे त्यावर तो प्रेम करू लागतो.

फुटलेला घट जोडता येत नाही. सुकलेल्या फुलात सुवास आणता येत नाही. मृत्युनं वेढलेल्या शरीरात पुन्हा चैतन्य आणता येत नाही. घटाचं अस्तित्व, फुलाचा सुगंध आणि शरीरातला प्राण या गोष्टी क्षणभंगुर आहेत. क्षण संपला की, त्या विरून जातात. जे नियमानुसार घडतच असतं त्याचं दुःख कशासाठी करायचं ? विवेकी मनुष्य स्थिर राहतो. तो या मृगजळात उडी घेत नाही.

संत चोखामेळा या अभंगातून गीतेचं तत्त्वज्ञान जणू सांगत आहेत. ज्ञानदेव आणि नामदेव यांच्या संगतीत वावरणाऱ्या या विठ्ठलभक्ताला शरीर नाशवंत आहे पण आत्मतत्त्व अमर आहे याची स्पष्ट जाणीव झालेली होती. गावकूस बांधताना ते अंगावर कोसळल्यामुळं चोखामेळ्याच्या आयुष्याचा घट फुटून गेला. पण तो हाडाचा विठ्ठलभक्त होता. त्याच्या प्रत्येक हाडातून 'विठ्ठल विठ्ठल' हे नामसंकीर्तन ऐकू येत होतं. ज्याच्या हाडी-मासी विठ्ठलाचं अस्तित्व होतं त्याच्या अभंगांतून जीवनविचाराची धार वाहत राहावी यात कसलं आश्चर्य ? चोखामेळ्याच्या काव्यात देवभक्ती आहे त्याप्रमाणं विचारशक्तीही आहे. जीवनाचे रागरंग पाहून आणि अनुभवून त्याचा अभंग अर्थपूर्ण बनला आहे. तात्त्विक विचाराच्या क्षेत्रात वाचकांना घेऊन जाणारा हा अभंग चोखोबांच्या सुदृढ जीवनदृष्टीचाही परिचय करून देतो. असं विचारप्रधान काव्य कवीच्या प्रतिभेचं वलय कसं व्यापक होतं हे दाखवतं. फुलं सुकतात पण अशा कविता सुकत नाहीत.

जीवन हे मृगजळ आहे. तहानेलेली हरिणं मृगजळामागं उरी फुटेपर्यंत धावत जातात. पाणी मात्र मिळत नाही. या अभंगात निराशेची कटुता आहे. पण वस्तुस्थितीही आहे. आशेनं फुलून जावं, मनानं मोहरून जावं असं चोखोबांच्या आयुष्यात काय होतं ? या कवीजवळ फक्त वेदना होती आणि अश्रू होते. त्याच्या फाटक्या पदरात उपेक्षा आणि अपमान याशिवाय काहीच पडत नव्हतं. या संताच्या जीवनाला विठ्ठलभक्तीचा सुगंध होता. त्यानं केवळ विठ्ठलावरच नव्हे तर माणसांवर, सृष्टीवर प्रेम केलं. चोखामेळाच्या जीवनाचं फूल सुकून गेलं. पण त्याचा सुवास मराठी साहित्यात सातशे वर्षानंतरही ताजा टवटवीत आहे. या अभंगातून व्यक्त झालेली तत्त्वदृष्टी समर्थनीय आहे. विवेकी माणसानं मृगजळामागं लागू नये. हा महत्त्वपूर्ण विचार चोखोबा देतात. आपल्या अनुभवातूनच त्यांनी ही कविता लिहिली आहे. कवितेला अनुभवाचं बळ आणि विचाराचा पीळ आहे. त्याप्रमाणंच हृदयाच्या दुःखाची कळही आहे. चोखोबांच्या कवितेतलं हे सौंदर्य समजून घेतलं पाहिजे.

●●●

**विठ्ठल विठ्ठल गजरी । अवघी दुमदुमली पंढरी ।।**
**होतो नामाचा गजर । दिंड्या पताकांचा भार ।।**
**निवृत्ती ज्ञानदेव सोपान । अपार वैष्णव ते जाण ।।**
**हरी कीर्तनाची दाटी । तेथे चोखा घाली मिठी ।।**

नामाचा गजर करण्यात भक्ताला अपूर्व सुखाचा अनुभव येतो. आपल्या आराध्य दैवताचा नामघोष त्याला स्फुरण देतो. उत्तेजित करतो. त्याच्या जीवनशक्तीला उल्हसित करतो. नावात काय आहे ? असा प्रश्न नेहमी विचारला जातो. या प्रश्नाचं उत्तर देताना विठ्ठलभक्त किंवा कोणताही भक्त प्रतिप्रश्न विचारील. तो म्हणेल नावात काय नाही ? परमेश्वराचं नाव हे स्फूर्तीचं आणि आनंदाचं अक्षय भांडार आहे. 'नाम' हा नुसता शब्द असत नाही. राम, कृष्ण, पांडुरंग ही केवळ शब्दावली नव्हे, ही केवळ व्यक्तींची नावं नव्हेत. ईश्वराचं नाव हे शक्तीचं प्रतीक आहे. ते हृदयापासून उच्चारताना भक्ताचं मन मोहरून जातं. त्याच्या साऱ्या विवंचना हरपून जातात. आशा पल्लवित होतात. प्राणशक्तीला चालना मिळते. ज्या दैवताचं तो भजन करीत असतो ते दैवत त्याच्यासमोर सगुण स्वरूपात जणू उभं राहतं. उत्कट भावनेनं केलेला नामघोष ईश्वराजवळ भक्ताला नेऊन सोडतो. त्यामुळंच नावाचा उच्चार करणं ही सामान्य स्वरूपाची शारीरिक क्रिया नव्हे. तिचा संबंध, मन, बुद्धी आणि आत्मा यांच्याशी आहे. 'विठ्ठल, विठ्ठल' म्हणताना नामदेव, चोखोबा, जनाबाई यांच्यासारखे आर्तभक्त विठ्ठलमय होऊन जातात. म्हणूनच नावात काय आहे ? हा प्रश्न निरर्थक ठरतो. संत मीराबाई कृष्णनामाच्या आनंदडोहात सदैव तरंगत राहिली. तिचं सारं व्यक्तित्व कृष्णरूप झालं होतं. तिच्या पायातल्या पैंजणांतून कृष्ण नामाचा झंकार उमटत होता. हीच अनुभूती सर्वच भक्तांना येत असते. संत चोखामेळा विठ्ठलनामाच्या गजरात आपली सर्व दुःखं विसरून जात होते. आपण हीन जातीचे आहोत, उपेक्षित आहोत हे त्यांच्या मनातलं चिरंतन शल्य 'विठ्ठल विठ्ठल' असा गजर सुरू झाला की विसरून जात होते. जणू त्या नामघोषातून विठ्ठलालाच भेटत होते.

या अभंगात त्यांनी आपली विठ्ठल आणि पंढरी या विषयीची तीव्र आसक्ती सहजपणानं वर्णिली आहे. त्यांच्या प्रसादपूर्ण मधुर भाषेतून या अभंगाची रचना झाली आहे. 'विठ्ठल' हा त्यांचा प्राणविसावा होता. नामानं दुमदुमलेल्या पंढरीतल्या दिंड्या-पताकांचा ते उल्लेख करतात. निवृत्ती, ज्ञानदेव आणि सोपान या संतांबरोबर जमलेल्या वैष्णवांचा निर्देश करतात. ज्ञानदेव, नामदेव, मुक्ताई, गोरा कुंभार हे त्यांचे समकालीन

संत होते. त्यांच्याविषयी चोखामेळा कृतज्ञतेनं अनेक अभंगांतून उच्चार करतात. ईश्वरनिष्ठांच्या या मांदियाळीत ते पूर्णपणे रमून जातात. अभंगाच्या शेवटी त्यांनी म्हटलं आहे, 'हरिकीर्तनाची दाटी, तेथे चोखा घाली मिठी। चोखा म्हणे नाम सुलभ सोपे रे। जपावे निर्धारे एकाभावे ॥ आणखी एका अभंगात त्यांनी योगयोगादी कोटी जपजाप्य देखील एका नामापुढं प्रभावहीन आहे असा विचार स्पष्ट केला आहे.

संत चोखामेळ्यांचं लौकिक जीवन दारिद्रयानं वेढलेलं होतं. घाम गाळूनही पुरेसा दाम त्यांच्या पदरात पडत असेल असं वाटत नाही. कुळ, जाती आणि वर्ण यांना अवास्तव, अतिरेकी महत्त्व असलेल्या त्या कालखंडात चोखामेळ्याजवळ काहीही नव्हतं. फक्त विठ्ठल नामाचं अमूप धन त्यांनी मिळवून ठेवलं होतं. ही नामाची श्रीमंती गेल्या सातशे वर्षात ओसरलेली नाही. ईश्वरभक्तीतून मिळणारी सत्ता प्रदीर्घकाळ टिकते. मराठी सारस्वतात नामदेव तुकारामांच्या मालिकेत संत चोखामेळाही अभिमानानं बसू शकतो. याचं कारण विठ्ठलनामाच्या वैभवानं उजळून निघालेली त्याची वाणी हेच आहे.'विठ्ठल-विठ्ठल' हा गजर करणारा चोखामेळा तुमच्या आमच्या अंतःकरणात जोपर्यंत आहे तोपर्यंत आपणही त्याच्याप्रमाणंच श्रीमंत राहू. इतकंच मी म्हणेन, विठ्ठलनामानं दुमदुमणारी पंढरी चोखामेळ्याच्या अभंगात 'अभंग' राहिली आहे.

संत चोखामेळा विठ्ठलनामाच्या गजरातच मनानं राहत होते. त्यांच्या भोवतालचं संपूर्ण वातावरण भजन-कीर्तनानं, नामघोषानं दुमदुमलेलं होतं. भक्ती आणि अध्यात्म या क्षेत्रातले मोठमोठे संत त्यांना दिसत होते. चोखोबांच्या संवेदनशील वृत्तीवर या वातावरणाचा खोल परिणाम झाला होता. दुःखी कष्टी चोखोबा आपलं दुःखदैन्य, आपली जातिव्यवस्थेतली शेवटची पायरी, आपला होणारा अपमान या गोष्टी भावभक्तीनं सुगंधित झालेल्या वातावरणात विसरून जात होते. आणि तेही भक्तीच्या आवेगात नाचत होते, गात होते. जन्माचे दुःख विसरण्यासाठी विठ्ठलभक्ती त्यांना उपयोगी पडली. पण याचा अर्थ ते सुखी- समाधानी होते असा करता येणार नाही. 'विठ्ठल- विठ्ठल' हा गजर कानामनात अखंड होत होता. तो विठ्ठल त्यांना कोणी दाखवलाच नाही. मंदिराचं दार सवर्ण दांभिकांनाही उघडं होतं पण प्रामाणिक,भक्तिमान अशा चोखोबांना मात्र कायमचं बंद होतं. पण तरीही त्यांच्यातला कवी आणि संत त्या वातावरणात रस घेत होता. रमत होता. कारण त्याशिवाय दुसरी गती नव्हती. 'हरिकीर्तनाची दाटी, तेथे चोखा घाली मिठी' हे एका आर्तभक्ताचे उद्‌गार आहेत.

●●●

किती धावाधावी करावी कोरडी । न कळे काही जोडि हानि लाभ ।।
जे जे करतो ते ते फलकट । वाउगेचि कष्ट दुःख भोगी ।।
निवांत बैसोनि नामाचे चिंतन । करू जाता मन स्थिर नाही ।।
दान धर्म करू तो नाही धन पदरी । जन्माचा भिकारी होऊनी ठेलो ।।
चोखा म्हणे ऐसा करंटा मी देवा । काय तुझी सेवा करू आता ।।

सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वताएवढे । जीवनातलं एक विदारक सत्य तुकोबांनी एका ओळीत अतिशय परिणामकारक रीतीनं सांगून ठेवलं आहे. या सत्याची जळती अनुभूती आयुष्यात प्रत्येकालाच आल्याशिवाय राहात नाही. संत चोखामेळ्याचं उसवलेलं आयुष्य त्यानं विठ्ठलनामाच्या धाग्यानं शिवण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा संसार दुःख, उपेक्षा, दारिद्र्य आणि ठायी ठायी अपमान यांनी पुन्हा फाटत होता. लक्तरलेला प्रपंच कसा सुधारावा या एकच विवंचनेनं हा भक्तकवी रात्रंदिवस तळमळत होता. भक्ताच्या कपाळावर दुःखाचा लेख विठ्ठलानं का लिहावा या प्रश्नाला उत्तर नाही. सज्जनांच्या ललाटी वेदना आणि आपत्ती यांचीच अक्षरं नियती कोरीत असते. अनेक संतांच्या जीवनात प्रारब्धाचा हा विपरीत खेळ चालत राहिला. दुर्जन सुखात राहतात आणि सुजन रानावनात वणवणत असतात. या देवाघरच्या न्यायाचं कोडं तुम्ही आम्ही उलगडू शकत नाही. 'ईश्वरेच्छा बलीयसी' असं म्हणून संत महंतांनी दुःखभोग स्वीकारले. चोखामेळ्यालाही ते स्वीकारावेच लागले. 'किती धावाधावी करावी कोरडी' हा त्याचा प्रश्न अनुत्तरित राहतो. चोखोबा म्हणतात, 'जे जे करितो ते ते फलकट । वाउगेचि कष्ट दुःख भोगी ।।'

संत चोखामेळ्याची वेदना आणि समस्या यांचं निवारण विठ्ठलानंही केलं नाही अशी त्याची रास्त तक्रार आहे. अस्पृश्य असल्यानं गावकुसाबाहेर राहिलेला हा विठ्ठलभक्त एका फाटक्या तुटक्या झोपडीत कसाबसा जगत होता. पण त्याच्या जगण्यात फारसा जीव नव्हता. नुसत्या विठ्ठलनामानं प्रापंचिक प्रश्न सुटत नाहीत. 'विठ्ठल- विठ्ठल' म्हटलं तरी याचनेसाठी पसरलेल्या हातात काहीच पडत नाही. या संताचं सारं कुटुंब कष्ट उपशीत होतं. घाम गाळत होतं. पण उघड्यावर पडलेल्या या कुटुंबाला समाधानानं जगता येईल अशी परिस्थिती नव्हती. तो व्याकुळ होऊन विचारतो,

जन्माचा भिकारी होऊनी ठेलो । चोखा म्हणे ऐसा करंटा मी देवा ।।
काय तुझी सेवा करू आता ? ।

आपल्या अंधारलेल्या आणि मरगळलेल्या आयुष्यावर या कवीनं प्रकाश

टाकला आहे. त्याची पत्नी सोयराबाई आणि मुलगा कर्ममेळा हेही कवीच होते. सोयराबाईचा भाऊ बंका हाही अभंगरचना करीत असे. संत चोखामेळ्याची बहीण निर्मळा हिचेही अभंग प्रसिद्ध आहेत. या साऱ्या कुटुंबावर कवितेची कृपादृष्टी होती. दारिद्र्यानं वेढलेल्या संसारात विठ्ठलभक्ती आणि त्या भक्तीतून उमललेली कविता इतकंच धन या कुटुंबापाशी होतं. मध्ययुगातील दलित समाजाच्या विपन्न अवस्थेचं दर्शनच जणू या अभंगातून चोखोबांनी घडवलं आहे. प्रामाणिकपणे कष्ट करणाऱ्या, घाम गाळणाऱ्या देवभक्ताला दारिद्र्य आणि वैफल्य यांच्याशिवाय काहीही मिळू नये ही दुर्दैवाची पराकाष्ठा म्हणावी लागेल. आपल्या भविष्याविषयी आणि वर्तमान स्थितीसंबंधी हताश झालेला चोखामेळा एखाद्या अभंगातून आपल्या विकल जीवनाचं चित्र रंगवीत असला तरी त्याची विठ्ठलावर अढळ श्रद्धा आहे. सामाजिक आणि आर्थिक दुःख बाजूला ठेवून चोखामेळ्याचं कुटुंब विठ्ठलाच्या भक्तीत बुडून गेलं आहे. तो पुन्हा पुन्हा विनंती करीत आहे.

सुखे पंढरिराया । माझी निववावी काया ॥
बहु तापलो संसारा । कोठवरी येरझारा ॥

पण अटळ दुःख दारिद्र्याच्या चक्रव्यूहात अडकलेल्या या संतकुटुंबाची सुटका होत नाही. जे आपल्या वाट्याला आलं आहे ते स्वीकारीत संत चोखामेळा पांडुरंगाला विनवतो,

जनक तू माझा जननी जगाची । करुणा आमुची का हो नये ॥

या कवीचे सर्वच अभंग 'आत्मचरित्रात्मक' आहेत. 'जन्माचा भिकारी' असा त्यानं स्वतःच आपला उल्लेख केला आहे. भक्ताला भीक मागावी लागते याची लाज देवाला कधी वाटते का ? नाहीतरी चोखोबांचा मुलगा कर्ममेळा यानं असाच उल्लेख आपल्या अभंगातून केला आहे.

कर्ममेळ्याच्या कवितेत अन्यायाची तीव्र चीड आहे. चोखोबा मात्र इतके चिडत नाहीत. दुःख आणि अन्याय ते गिळून टाकतात. आपल्या कवितेतून अश्रू गाळतात. एक दीन आणि हीन समजला गेलेला संत आयुष्यभर कोरडी धावपळ मात्र करीत राहिला. आपला जन्मे व्यर्थ झाला ही खंत त्याच्या कवितेला चिकटून बसली आहे. नाम चिंतन करतानाही दयाळू देवाच्या दयेचा आणि मायेचा अनुभव त्यांना कधी आलेला त्यांच्या चरित्रावरून तरी दिसत नाही. काव्यात काही ठिकाणी कल्पनाविलास आढळतो पण 'ऐसा मी करंटा देवो हे सत्य मात्र शिल्लक राहतं.

●●●

आम्हां न कळे ज्ञान न कळे पुराण। वेदाचे वचन न कळे आम्हां ॥
आगमाची आठी निगमाचा भेद । शास्त्रांचा संवाद न कळे आम्हां ॥
योग याग तप अष्टांग साधन। न कळेचि दान व्रत तप ॥
चोखा म्हणे माझा भोळा भाव देवा। गाईन केशवा नाम तुझे ॥

भक्तीचं माहात्म्य तिच्यापासून मिळणाऱ्या उत्कट आनंदात आहे. ईश्वर नामाचा मनःपूर्वक जप करणाऱ्या एका भक्ताला मी प्रश्न विचारला होता. 'या नामभक्तीपासून तुला नेमकं काय मिळतं ? नामघोष केल्यामुळं संपत्ती मिळत नाही. सत्तेचा लाभ होत नाही. संसारातील विवंचना संपत नाहीत. पण तू तर नामभक्तीचा एकनिष्ठ समर्थक आहेस. या भक्तीतून तुझं स्वतःचं जीवन सुखकारक झालं आहे का ?'

तो भक्त म्हणाला, 'नामभक्ती हा ईश्वरोपासनेचा आणि मोक्षप्राप्तीचा सर्वात सुलभ असा मार्ग आहे. नामस्मरणात आणि उच्चारणात मन एकाग्र केलं की,आपण देवाच्या सान्निध्यात आलो आहोत, तो परमेश्वर आपली सर्व बाबतीत काळजी घेत आहे, त्याच्या सहवासात आपल्या मनाचा, भावनांचा विकास होत आहे, मनातल्या अन्य वासना आणि विकार ओसरत आहेत, आपण एका उदात्त अनुभवाच्या उंचीवर जात आहोत हा विलक्षण अनुभव मला येतो.' भक्तीतला हा आनंद इतर गोष्टीत मिळू शकत नाही. खऱ्या भक्ताला नामस्मरण यासाठीच प्रिय असतं. त्याच्या म्हणण्यात सत्य असलंच पाहिजे. भक्तीमुळे विचारांचं शुद्धीकरण होतं. मनाची विशालता वाढू शकते. मानसिक शांतीचा प्रत्यय येतो. हे मुद्दे मला योग्य वाटले. नामस्मरण आणि भजन या निरर्थक गोष्टी आहेत अशी टीका अनेक बुद्धिवादी करतात. पण जगातल्या कित्येक श्रेष्ठ व्यक्तींनी नामभक्तीचा महिमा मनापासून गायिला आहे. ईशप्रार्थनेमुळं मनाची चंचलता नाहीशी होऊन ते स्थिर, संतुलित होतं; असं मत गांधीजींनी व्यक्त केले होतं. ते दररोज नियमानं सकाळ-संध्याकाळी प्रार्थना करीत असत. मनातले कडवट, अनिष्ट विचारांचे आवेग नाहीसे करण्यासाठी प्रार्थनेचा उपयोग होतो यात शंका नाही. संतकवी चोखामेळा हे तर विठ्ठलाचे अनन्य भक्त होते. त्याचं नाव त्यांना सर्वाधिक मधुर आणि चिंतनीय वाटत होतं. तुझं नाव गाण्यातच मला खरा आनंद आहे. असं त्यांनी या अभंगात स्पष्ट केलं आहे. ते म्हणतात,'आम्हाला ज्ञान नाही. वेदाच्या वचनाचा अर्थ मला समजत नाही पोथ्या-पुराणांचं वाचन आणि आकलन आमच्या शक्तीबाहेरचं आहे.

'आगम, निगम, शास्त्रसंवाद, चर्चा-चिकित्सा, योग, याग, तप अष्टांग

साधन, तपश्चर्या आणि व्रत, नियम यातलं काहीही मला समजत नाही. मी अज्ञानी आहे.' संत चोखोबांची ही कबुली बरोबर होती. त्यांच्यापाशी ग्रंथपांडित्य नव्हतं. पण देवभक्तीनं विकास पावलेलं विशुद्ध अंतःकरण मात्र निश्चित होतं. देवाला भक्ती प्रिय असते. घटपटात्मक शुष्क चर्चा करणारं पांडित्य देवाला आवडत नाही. तो चोखामेळ्याच्या झोपडीत प्रेमानं वास्तव्य करतो. कारण तिथला भोळा भाव त्याला आवडतो. स्वार्थी हेतू बाळगून पांडित्याचं प्रदर्शन करणारी विद्वान मंडळी देवाला रुचत नाहीत. तो चोखामेळा, जनाबाई, सावतामाळी यांच्यासारख्या उत्कट भक्तींनं भारलेल्या भक्तांना दर्शन देतो. कारण तुकारामांच्या शब्दांत सांगायचं तर 'ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभावीण प्रीती' या प्रकारची शुद्ध भक्तीच सात्त्विक आनंद देऊ शकते. चोखामेळा हा भक्त अज्ञानी असेल, तो लोकदृष्टीनं हीनयातीचा असेल पण पराकाष्ठेच्या प्रेमानं नामभक्ती करणाऱ्या या चोखोबाला उच्चप्रतीचा आनंद मिळत होता हे निःसंशय ! आध्यात्मिक मार्गात पांडित्यापेक्षा आंतरिक भक्तीला अधिक महत्त्व असतं हे चोखामेळ्याच्या उदाहरणावरून सिद्ध होतं.

'चोखा म्हणे मज भरवसा नामाचा । येणे कळिकाळाचा भेव नाही'

संत चोखामेळा हे केवळ परमभक्तीनं विठ्ठलाची प्रार्थना करणारे आर्तभक्त होते. ग्रंथज्ञानाचा, शास्त्रपुराणांचा त्यांचा काहीही अभ्यास नव्हता. त्या काळात समाजातल्या खालच्या वर्गापर्यंत साधं अक्षरज्ञानदेखील पोहचलेलं नव्हतं. वेद, आगम आणि निगम, योग-याग या गोष्टी तर आवाक्याच्या पलीकडच्या होत्या. शूद्राला वेद वाचण्याचा, योगा-याग करण्याचा अधिकारच नव्हता. त्यानं सारा जन्म अज्ञान आणि दारिद्र्य यांच्या अंधारात खितपत काढावा अशी तरतूद शास्त्र-पुराणांनी करून ठेवली होती. पण ज्ञानापेक्षा भक्ती श्रेष्ठ आहे हे सांगून चोखोबा देवाच्या नामभक्तीचा जयघोष करीत आहेत. अध्यात्मातही शास्त्रज्ञानापेक्षा अंतःकरणातली भक्ती हीच अधिक समर्थ मानली गेली आहे. चोखोबा अज्ञानी होते याची त्यांना जाणीव होती. पण त्यांच्या हातात भक्तीची मशाल होती. दृष्टीत भक्तीतून आलेली तृप्ती होती. मुखात विठ्ठलनाम होतं. इथेच आयुष्याच्या सार्थकतेचा त्यांना अनुभव येत होता. असे अभंग लिहिताना आपल्या हीन यातित्वाचं वैषम्य विसरून नामभक्तीतला ओसंडून वाहणारा आनंद ते मनापासून घेतात. नामसंकीर्तनातला आनंद लुटतात. नाम हेच धन, नाम हेच वैभव. नामगीत गाण्यासाठी चोखोबांनी जन्मभर सूर लावला होता.

●●●

**विठोबा पाहुणा आला आमुचे घरा। निंबलोण करा जीवेभावे ।।**
**पंचप्राणज्योती ओवाळुनी आरती। ओवाळिला पती रखुमाईचा ।।**
**षड्रस पक्वान्ने विस्तारिले ताटा। जेवू एकवट चोखा म्हणे ।।**

देवभक्ताचं एक विलक्षण उत्कट स्वप्न असतं. देवाचं प्रत्यक्ष दर्शन व्हावं, त्याची पाऊलं आपल्या घरात उमटावीत. त्याचं आपण अत्यानंदानं स्वागत करावं, आतिथ्य करावं, आपल्या हातचे दोन घास त्यानं संतोषानं स्वीकारावेत, प्रत्येक भक्ताच्या मनात ही तीव्र इच्छा असते. या इच्छेची पूर्ती व्हावी म्हणून त्यांचे प्राण तळमळत असतात. विश्वचालक परमेश्वर 'याचि देही याचि डोळा' पाहायला मिळणं हे अपूर्व सौभाग्य आहे. भक्त या एकमेव इच्छेनं भारावून जातो. त्याच्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूत आणि प्रत्येक श्वासनिश्वासात ईश्वरभेटीचं स्वप्न उचंबळत असतं. संत चोखामेळ्याची हीच अवस्था होती. तो रात्रंदिवस नामघोष करीत होता. विठ्ठलाची परोपरीनं आळवणी करीत होता. दैनंदिन व्यवहारातही त्याची ही इच्छा कधीच मंद होत नव्हती. विठ्ठलाचा छंद हे त्याचं सर्वस्व होतं. विठ्ठलनामाच्या तालाशिवाय त्याच्या प्रपंचाचं आणि आयुष्याचं गाणं प्रकट होणं शक्यच नव्हतं. संत नामदेवालाही याच स्वप्नानं घेरलं होतं. विठ्ठलानं त्याला दर्शन दिलं. त्याच्याशी संभाषण केलं. फार काय नामदेव कीर्तनाच्या रंगात बेभान होऊन नाचू लागले म्हणजे विठ्ठलही त्या रंगात दंग होऊन नाचू लागायचा अशी आख्यायिका आहे. अनेक संतांच्या आयुष्यात ईश्वरी साक्षात्काराचे प्रसंग आलेले आहेत. ते त्यांनी आपल्या लेखनात नोंदवूनही ठेवले आहेत. देव भक्ताला प्रत्यक्ष भेटतो, त्याच्याशी प्रेमसंवाद करतो ही अद्भुत कल्पना असली तरी आर्त भक्तांना ती खरी वाटते. ज्याची दृष्टी पराकोटीच्या भक्तीनं उजळलेली आहे त्याच्या दृष्टीला निर्गुण परमेश्वर सगुण स्वरूपात दिसू शकतो. इतकंच नव्हे तर तो भक्ताच्या कामातही साहाय्य करतो. चोखामेळ्याला समकालीन असलेली संत जनाबाई या प्रकारचा अनुभव आपल्या अभंगातून मांडते.

धुणे घेऊन कारवेसी। जनी गेली उपवासी ।।
मागे विठ्ठल धावला। म्हणे का टाकिले मला ।।

ती आणखी म्हणते-एके दिवशी वाडियात। देव आले अवचित ।।

देवभक्त भेटीच्या या घटना आपल्याला अवास्तव वाटल्या तरी भक्तांची भावानुभूती त्यांनी लिहून ठेवली आहे.

संत चोखामेळाही म्हणतात, 'विठोबा पाहुणा आला आमुचे घरा। निंब लोण

करा जीवे भावे ॥' पंचप्राणांच्या ज्योतीनं या रखुमाईच्या पतीला मी ओवाळतो. आणि षड्रसयुक्त पक्वान्नांचं ताट त्यांच्यापुढं ठेवतो. 'एकत्र जेऊ' असंही तो म्हणतो. हा अभंग वाचताना माझ्या डोळ्यात पाणी आलं. एका उपेक्षित, पददलिताची ही भक्ती शब्दांच्या पलीकडची आहे. गावकुसाबाहेर फाटक्या-तुटक्या झोपडीत उच्छिष्ट अन्नावर जगणारा हा दलित संत त्रैलोक्याच्या स्वामीचं पाहुणा म्हणून स्वागत करतो. आणि त्याला पक्वान्नांचं भोजन देतो. हे एक स्वप्न आहे. गरीबांची आपल्या स्वप्नावरच सत्ता असते. चोखामेळा आर्थिक दृष्टीनं कंगाल होते. पण त्यांची काव्यप्रतिमा श्रीमंत होती. आपल्या प्रतिभेच्या बळावर मूर्तिमंत विठ्ठलालाही आपल्या घरी येणं त्यांनी भाग पाडलं. देवालाही अन्नदान करणारा भक्त दरिद्री कसा म्हणावा ? या भक्तानं विठ्ठलाकडं काहीच मागितलेलं नाही. त्याचं केवळ दर्शन घडावं एवढी एकच आस आपल्या हृदयात तो बाळगून होता. मंगळवेढ्याचं गावकुसू बांधताना कोसळलेल्या भिंतीखाली हा कष्टकरी संत निजधामाला गेला. चोखामेळ्याच्या अस्थी गोळा करताना संत नामदेवानं अस्थी ओळखण्यासाठी एक युक्ती केली. कारण अनेकांच्या अस्थी विखुरल्या होत्या. प्रत्येक हाड त्यानं कानाला लावलं. ज्यातून 'विठ्ठल विठ्ठल' असे भजनाचे स्वर निघतील त्या अस्थी संत चोखोबाच्या असं ठरवलं. याचा अर्थ चोखोबांच्या देहात, आत्म्यात, जीवनात आणि मरणानंतर हाडातसुद्धा तो विठ्ठल सामावला होता.

विठोबा पाहुणा नव्हता तो चोखामेळ्याच्या आत्म्यातला रहिवासी होता. या अभंगातली कल्पना अद्भुतरम्य आहे. अवास्तव आहे. लौकिक अर्थानं 'विठ्ठल' कोणा भक्ताच्या घरी पाहुणा म्हणून जाणं ही अशक्य घटना आहे. पण एका भक्तानं रचलेलं हे मनोराज्य आहे. प्रत्यक्ष आयुष्यात मंदिरात प्रवेशबंदी असलेल्या या कवीला आपल्या मनाच्या राज्यात कोणीच प्रतिबंध करू शकत नव्हता. म्हणूनच हे गगनचुंबी स्वप्न आपल्या अभंगातून चोखोबांनी उत्कट आनंदानं रंगवलं आहे. प्रत्येक भक्ताला याच पद्धतीनं देव भेटलेला आहे. वास्तवात तो देव कुठे असतो कुणास ठाऊक ? वास्तवातली दुःखं नाहीशी करण्यासाठी स्वप्नांची इमारत उभी करण्याचं कार्य भक्त आणि कवी करीत असतात. त्या अभंगाचं उदाहरण घेऊन चोखामेळा आणि पांडुरंग यांची भेट झाली होती असं विधान कोणी करील तर ते केवळ अलौकिक अर्थानं मान्य करता येईल. जे कधीच घडत नाही ते घडण्याची ओढ बलवत्तर झाली की इच्छित ते मिळालं असा आनंद होत असतो. या अभंगावरून चोखोबा कसे अंतर्बाह्य विठ्ठलमय झाले होते याचं आकलन होतं. 'मनी वसे ते स्वप्नी दिसे' हेच खरं.

●●●

**हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ।।**
**मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटू कवण्या रीती ।।**
**माझा लागताची कर । सिंतोडा घेताती करार ।।**
**माझ्या गोविंदा गोपाळ । करुणा भाकी चोखामेळा ।।**

संत चोखोबांची कविता एका अटळ दुःखवेदनेनं वेढलेली आहे. चोखामेळा हे आपल्या श्रमावर आणि घामावर जगणारे एक कर्तव्यनिष्ठ सद्गृहस्थ होते. ते कोणाच्या दयेवर किंवा कृपेवर जगत नव्हते. त्यांचं सारं कुटुंब प्रामाणिकपणानं कष्ट करून जी काही ओलीकोरडी भाकरी पदरात पडेल त्यावर चरितार्थ चालवीत होते. विठ्ठलाची उत्कट स्वरूपाची भक्ती करणारं हे कवीवृत्तीचं कुटुंब अस्पृश्यतेच्या शापामुळं जन्माचं दुःखी झालेलं होतं. खरं तर ज्याच्या हृदयात भक्ती आहे, माणुसकी आहे, जो विठ्ठलाच्या भजनपूजनात, नामःस्मरणात बुडालेला आहे त्याची जात केवळ विठ्ठलभक्ताचीच असते. भक्ताच्याही कपाळावर वर्ण, जाती आणि वंश कोरून ठेवणारी कर्मठ परंपरा कोणत्याही अर्थानं समर्थनीय नव्हती. जातीपातीच्या चौकटीत माणसांना डांबून ठेवणारी जीर्ण समाजव्यवस्था म्हणजे मानवी संस्कृतीवरचा एक कलंक आहे. या कलंकामुळं निष्कलंक चोखामेळा रात्रंदिवस तळमळत होता. त्याच्या बहुतेक अभंगांतून समाजव्यवस्थेनं आपल्यावर केलेल्या अन्यायाचं गाऱ्हाणं त्यानं अत्यंत विषण्णतेनं गायिलं आहे. त्याच्या कवितेतला प्रत्येक शब्द त्याच्या आर्त अंतःकरणाचं दर्शन घडवतो. या करुण अभंगात हा संतकवी म्हणतो,

'देवा, मी हीनजातीचा आहे. तुझी सेवा माझ्या हातून कशी घडणार ? मला पाहताच सर्वजण 'दूर हो,' 'दूर हो' असं खेकसून सांगतात. कोणत्या रीतीनं तुला भेटू. माझ्या हाताचा थोडासा स्पर्श झाला की हे लोक पाण्यानं हात धुतात. माझ्या गोविंदा-गोपाळा । करुणा भाकी चोखामेळा ।। परमेश्वराची निःस्सीम भक्ती करून या भक्ताच्या पदरात कोणतं फळ पडलं ? भक्ताला परमेश्वर भेटू नये, त्याला विठ्ठलाचं दर्शन घेण्याचा अधिकार असू नये. म्हणजे बालकाला आईजवळ जाण्याची बंदी घालणं आहे. विठ्ठलाचं दर्शन हे चोखामेळ्याचं जीवनध्येय होतं. ते त्याचं एकमेव भव्य स्वप्न होतं. डोळांभरून विठ्ठलाला पाहावं आणि त्याच्या चरणांवर आपलं मस्तक टेकवावं म्हणजे आपल्या साऱ्या आयुष्याचं सार्थक झालं हे चित्र संत चोखामेळा आणि त्याचं सारं कुटुंब जन्मभर रंगवीत होतं. पण

हीनजातीच्या माणसाला मंदिरात प्रवेश नाही अशी शास्त्राज्ञा आहे असं सांगून तत्कालीन सामाजिक व्यवस्थेनं हजारो, लाखो भक्तांना मंदिरांच्या दारातून ढकलून दिले. हे कितपत न्यायाचं झालं ? याचा विचारही त्या काळात कोणी केला नाही. भक्ती नसलेला ब्राह्मण मंदिरात येऊ शकतो. पण भक्तिभावनेनं अंतर्बाह्य पवित्र असलेला चोखामेळा मात्र मंदिरात येऊ शकत नाही, या चित्रावर आणखी कोणतं भाष्य करायचं ? चोखामेळा विठ्ठल-विठ्ठल म्हणत निघून गेला. त्याला आता सातशे वर्षं उलटून गेली. पण त्यानं विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर आजही आपण देऊ शकत नाही. जी व्यवस्था भेद निर्माण करते, माणुसकीला पारखी होते, प्रामाणिक भक्तांना छळते ती व्यवस्था नसून दुर्व्यवस्था आहे. असो. ते दिवस आता भूतकाळात विलीन झाले. पण संत चोखामेळ्याचं सामाजिक दुःख मात्र अजून त्याच्या अभंगवाणीतून वाहत आहे. दुःख सोसूनही विठ्ठलनामाचं सुख भोगणाऱ्या या संताला आपण वंदन करू.

खरं तर जात आणि संप्रदाय हे शब्द पूर्वीही निरर्थक होते. आणि आजही ते अधिकच अर्थशून्य बनलेले आहे. आज संत चोखामेळा असते तर त्यांनी जातीपातीच्या कारखानदारांना अभिनिवेशानं प्रश्न विचारला असता. आकाशाला जात असते काय ? वाऱ्याला आणि ताऱ्यांना जात आहे काय ? चंद्र आणि सूर्य यांची जात कोणती ? प्रकाशाच्या किरणांना तुम्ही कोणत्या जातीत ढकलणार ? जर आकाशाला जात नसेल तर माणसालाच जात देणारा परमेश्वर कोणत्या जातीचा आहे ? पण त्या जुन्या काळात या भक्ताला हे प्रश्न विचारण्याचं धैर्य नव्हतं. ते पोथ्यापुराणांचं युग होतं. परंपरेला बांधला गेलेला माणूस त्या काळात केवळ प्रवाहपतित होता. प्रश्न विचारण्याचीच त्या काळी बंदी होती. आम्ही बोलू ते शास्त्र,आम्ही सांगू ती शास्त्राज्ञा. आम्ही ब्राह्मण म्हणजे परमेश्वराचे प्रतिनिधी, आमच्याहून कोणी उच्च नाही आणि शूद्रातिशूद्राहून कोणी कनिष्ठ नाही असं रूढीवादी धर्मपंडितांचं मत होतं. या पंडिती गलबल्यात एका महार संताच्या मनाची जखम भळभळत राहिली तिला साधी मलमपट्टीदेखील कोणी लावली नाही. भूतदयेलाही पारखी झालेली माणसं वर्णव्यवस्थेचं रक्षण करीत होती. म्हणूनच 'तुज भेटू कवण्यारीती ?' हा प्रश्न या संतानं विचारला आहे. त्याचं उत्तर त्याला कधीच मिळालं नाही. त्यामुळं भक्त आणि देव यांची गळाभेट दूरच राहो साधी डोळांभेटही कधी झाली नाही.

●●●

**सुख अनुपम संतांचे चरणी । प्रत्यक्ष अलंका भुवनी नांदतसे ।।**
**तो हा महाराज ज्ञानेश्वर माऊली । जेणे निगमवल्ली प्रकट केली ।।**
**संसारी आसक्त माया मोहेरत । ऐसे जे पतित तारावया ।।**
**चोखा म्हणे श्रेष्ठ ज्ञानदेवी ग्रंथ । वाचिता सनाथ जीव होती ।।**

जे संत असतात त्यांना संतांच्या सान्निध्यातच परमसुख वाटतं. चोखामेळा परमभक्त होता. नावाप्रमाणेच चोख म्हणजे शुद्ध होता. जे विठ्ठलाचे भक्त असतील त्यांच्या सहवासाचा तो भुकेला होता. संतांच्या संगतीत असताना आपण जणू पांडुरंगाच्याच सुखसान्निध्यात आहोत असं त्याला वाटत असे. म्हणूनच 'सुख अनुपम संतांच्या चरणी' हे भावोद्गार त्याच्या तोंडून सहजपणानं निघतात. पण यात केवळ भावनाच आहे असं नव्हे. विचारही आहे. संतवृत्तीचा सज्जन भेटला आणि त्याच्या सोबतीला काही वेळ राहता आलं की मनातले क्षुद्र विचार आणि विकार नाहीसे होतात. संत हा निःस्वार्थी असतो. त्याच्या ठायी असलेली प्रेमाची भावना प्रांजल असते. जो भेटेल त्याचं कल्याण व्हावं ही संतमनीची इच्छा असते. असे काही श्रेष्ठ संत चोखोबांना भेटलेले आहेत. त्यांनी चोखोबांच्या मनाला आणि व्यक्तित्वाला आपल्या आंतरिक प्रेमशक्तीनं आकार दिला आहे. त्यांच्याविषयी या अभंगातून चोखोबा आपला कृतज्ञ भाव प्रकट करतात. महान संत ज्ञानेश्वरांविषयी चोखोबा उत्कटतेनं म्हणतात, 'संतांच्या चरणसहवासात प्रत्यक्ष इंद्रपुरीचं वैभव प्रत्ययाला येतं. ज्यांनी निगमवल्ली प्रकट केली ती ज्ञानेश्वर माऊली इथं आहे. पतितांना तारण्यासाठी आणि माया मोहरूप संसारात आसक्त झालेल्या लोकांचा उद्धार करण्यासाठी ज्यांनी 'ज्ञानदेवी' हा ग्रंथ लिहिला की जो वाचताना अनाथ जीव सनाथ होतात. त्या ज्ञानेश्वरांचं मी काय वर्णन करू ?'

चोखामेळा य़ा भाग्यवान भक्ताला संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांचा सहवास काही काळ लाभला. संत नामदेवांच्याही सान्निध्यात चोखोबा काही काळ होते. ज्ञानदेव आणि नामदेव म्हणजे धर्म आणि साहित्य यांच्या सौंदर्याची दोन शिखरं म्हणावी लागतील. मराठी भाषेला श्रीमंत करणारे हे दोन संतकवी चोखोबांच्या जीवनाचे आधारस्तंभ होते. सात शतकांपूर्वी चंद्रभागेच्या तीरावर ज्ञानेश्वर आणि चोखामेळा प्रेमभावानं एकमेकांना उराउरी भेटत होते. या दोघांची भेट म्हणजे जातिभेद संपल्याची आणि भक्तीच्या क्षेत्रात समतेची गुढी उभारल्याची खूण होती. सामाजिक दृष्टीनं पाहिल्यास ब्राह्मण आणि दलित एकत्र आल्यामुळं जात आणि

पंथ चंद्रभागेत बुडाले. उरले ते दोन पांडुरंगाचे अनन्य भक्त. असं या भेटीचं वर्णन करता येईल. या भेटीमुळं महाराष्ट्रात आध्यात्मिक लोकशाही 'Spiritual Democracy' प्रस्थापित झाली असं मत काही विचारवंतांनी व्यक्त केलं आहे. निदान विठ्ठलनामाच्या गजरात आणि भजन-कीर्तनात जातपात शिल्लक राहत नाही, ती राहू नये ही सुधारणा ज्ञानेश्वरांनी केली. त्यांच्या आधारानं चोखामेळ्याला आध्यात्मिक वाटेनं चालण्याचं बळ मिळालं यात शंका नाही. ज्ञानेश्वरांसारख्या महनीय संताविषयी कृतज्ञ भाव प्रकट करणारा चोखामेळ्याचा हा अभंग त्याच्या हृदयस्थ प्रेमभावनेचं प्रसन्न दर्शन करून देतो. ज्ञानेश्वरांना चोखोबांनी माऊली असं संबोधलं आहे. याचा अर्थ सातशे वर्षांपासून ज्ञानेश्वर हे माऊलीच्या रूपात समकालीन संतांना दिसत होते असा करता येईल. नामदेवांप्रमाणेच चोखोबा म्हणतात, 'चोखा म्हणे श्रेष्ठ ज्ञानदेवी ग्रंथ' ज्ञानदेव आणि ज्ञानदेवी यांचे उपकार अवर्णनीय आहेत.

चोखामेळ्याच्या जीवनात काही विलक्षण आनंदाचे क्षण आले होते. त्यातला एक अपूर्व अनुभव या भक्तानं इथं सांगितला आहे. 'ज्ञानेश्वर माऊली' त्यांना भेटली. सातशे वर्षांपूर्वीच्या वातावरणात चोखोबांना ज्ञानोबांची भेट म्हणजे मायमाऊलीची भेट असं वाटावं यावरून ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्त्वाची महती लक्षात येते. ज्ञानेश्वरांना ज्ञान होतं पण त्यापेक्षाही अधिक मातेचं वात्सल्य होतं. त्यामुळंच उपेक्षित आणि दलित अशा चोखोबांना त्यांनी आपल्या हृदयाशी धरलं. चोखोबांच्या वाचनात 'ज्ञानेश्वरी' आली होती. म्हणूनच ती वाचल्यावर अनाथ माणूस सनाथ होतो असं भावोत्कट शब्दांतून ते सांगतात. ज्ञानेश्वरीतला रस चोखोबा प्याले होते. त्यामुळंच आपल्यावर कोसळणाऱ्या दुःख संकटांना त्यांनी शांतपणानं तोंड दिलं. ब्राह्मण असूनही ज्ञानेश्वरांना तत्कालीन समाजानं एका अर्थानं अस्पृश्यांच्या पंक्तीत बसवलं होतं. त्यांचा छळ केला होता. पण त्यांनी आपल्या हृदयाच्या ताटीचं दार समाजासाठी सदैव उघडं ठेवलं होतं. म्हणूनच संत चोखोबाही ज्ञानदेवांच्या अंतःकरणापर्यंत पोहोचले होते. संतांच्या चरणी असलेलं सुख कसं अनुपम आहे हे सांगणारा हा अभंग म्हणजे ज्ञानेश्वरांविषयी चोखोबांच्या मनात दाटून असलेला कृतज्ञ भावाचा सुंदर आविष्कार आहे. ज्ञानेश्वर आणि नामदेव भेटले नसते तर कदाचित चोखोबाही आपल्याला आज दिसले नसते.

●●●

**कोणाचा संग धरू कोणासाठी । तो दुःखाचीच मिठी तेणे पडे ।।**
**म्हणोनी नामयाचे धरियेले पाय । आठविता होय समाधान ।।**
**सुखाचे सुख मज दावियेले डोळां । आनंद सावळा विटेवरी ।।**
**चोखा म्हणे माझा नामदेव प्राण । घालीन लोटांगण जीवे भावे ।।**

चोखोबांसारख्या श्रेष्ठ विठ्ठलभक्ताच्या पदरात नियतीनं काटेच अधिक टाकावेत ही एक शोकांतिकाच आहे. खरं तर ज्याच्या मनात पांडुरंग वस्तीला असतो तो भक्त सदैव आनंदाच्या डोहात तरंगत राहिला पाहिजे. देवभक्ती आणि मानसिक शांती यांचं  एक समीकरण बनलेलं आहे. पण याला अपवाद म्हणजे संत चोखामेळा यांचं जीवनचरित्र. विषमतावादी समाजरचनेमुळं चोखोबांना जन्मभर अपमानित अवस्थेत राहावं लागलं. विठ्ठलाचं प्रत्यक्ष दर्शन देखील त्यांना घडू शकलं नाही. वंचनेचं हे दुःख चोखोबांच्या कवितेतून अखंड वाहत आहे. त्यांचा अपराध एवढाच की, ते समाजाच्या सर्वात खालच्या स्तरात जन्माला आले होते. खालचा स्तर आणि वरचा स्तर ही भाषा देखील तर्कशुद्ध नाही. पण रूढी तर्कशास्त्रापेक्षा अधिक बळकट असते. अपेक्षित राहिलेले चोखोबा कोणाशी मैत्री करू शकत नव्हते. एखाद्याची सोबत मिळाली तरी तीही दुःख आणि अपमान यांनाच कारणीभूत व्हायची. म्हणून ते खिन्न प्रश्न विचारतात

'कोणाचा संग धरू कोणासाठी ? ।
तो दुःखाचीच मिठी तेणे पडे ।'

दुःख आणि अपमान चुकत नाही. ते आपल्या पाचवीला पुजलेलं आहे हे त्यांनी गृहीत धरलं.पण संत नामदेवांच्या चरणांपाशी ते आले आणि या संताच्या सहवासात चोखोबांना परम समाधानाचा ठेवा सापडला. नामदेव हे विठ्ठलाचे लाडके भक्त. विठ्ठलाशी त्यांचा सुखसंवाद व्हायचा. विटेवर उभ्या असलेल्या त्या परमब्रह्माचं दर्शन चोखोबांना नामदेवांनी घडवलं. याचा अर्थ पांडुरंगाचं ते शामसुंदर रूप आपल्या शब्दांतून नामदेवांनी रेखाटलं. ते शब्दचित्र पाहून चोखामेळा मनोमन सुखावले. विठ्ठल हे त्यांच्या दृष्टीनं सुखाचं सर्वस्व होतं. त्या दर्शनानं आपण कृतार्थ झालो ही जाणीव चोखोबांच्या मनात उचंबळून आली. कृतज्ञतेनं ते म्हणतात.

'माझा नामदेव प्राण । घालीन लोटांगण जीवेभावे ।' संत चोखामेळ्याला संत नामदेवांनी आधार दिला. विचारदृष्टी दिली. नामदेवांची कीर्तनं चोखोबांनी जिवाचे कान करून ऐकली. नामदेवांची उपदेशात्मक प्रवचनं  नेहमी चोखोबा

ऐकत असत. त्याच्या मार्गदर्शनामुळं आणि सहवासामुळं चोखोबांच्या हृदयातली विठ्ठलभक्तीची ज्योत अधिकच प्रज्वलित झाली. आपली सामाजिक दुःखं एका बाजूला ठेवून नामदेवांचा वत्सल हात हातात घेऊन चोखोबा त्यांच्याबरोबर आयुष्याची वाट चालू लागले. दोन्ही संतांच्या मनातले एकमेकांसंबंधीचे भावबंध दृढ झाले. एका अर्थानं नामदेवांनी आपला वरदहस्त चोखोबांच्या मस्तकावर ठेवला. आणि त्यामुळं चोखोबांच्या अभंगवाणीला नवं बळ प्राप्त झालं. ज्ञानदेव आणि नामदेव या दोन्ही संतांनी चोखोबांच्या आध्यात्मिक विकासाला साहाय्य केलं. त्यांचं हे ऋण मान्य करणारे काही अभंग चोखोबांनी कृतज्ञतेनं लिहिले आहेत. या भावोत्कट अभंगांत चोखामेळ्याच्या अंतःकरणाचं सुकुमार दर्शन होतं. भक्ताच्या मनातली समाधानवृत्तीची सुंदर वलयं त्यातून दिसतात. चोखोबांच्या अभंगातलं हे सौंदर्य रसिकांना नेहमीच मुग्ध करतं. आणि तेही म्हणतात. 'सुखाचे सुख मज दावियेले डोळां.' भावनिर्भर काव्याचं सहज दर्शन घडवणारे असे अभंग चोखामेळा लिहू शकला याचं कारण त्याची विठ्ठलविषयक जिवंत भक्ती हेच आहे.

दुःखित आणि शापित व्यक्तीला कुणाचीच सोबत नसते. कोणाशी सोबत केली तर ती दुःखालाच आमंत्रण देते. पण चोखोबांच्या आयुष्यात घडलेली एक सुंदर घटना म्हणजे त्यांना नामदेवांसारखा महान विठ्ठलभक्त भेटला. दोघेही हातात हात घालून चालू लागले. त्यांच्या हृदयाच्या तारा जुळल्या होत्या त्यामुळं दोघांच्याही काव्यातून भक्तिप्रेमाचे सूर उमटू लागले. चोखोबांना नामदेव आणि ज्ञानदेव भेटले नसते तर त्यांच्या जीवनात थोडं फार समाधानाचं जे चांदणं फुललेलं त्यांच्या अभंगांतून दिसतं ते कधीच दिसलं नसतं. चोखोबा आणि नामदेव हा दोन पवित्र नद्यांचा संगम होता. या नद्यांत सरस्वतीचाही प्रवाह ज्ञानदेवांच्या रूपानं मिसळला होता. तीन संत आणि प्रतिभावंत यांचा त्रिवेणी संगम चंद्रभागेच्या वाळवंटी व्हावा हा एक विलक्षण योगायोग आहे. चोखोबांच्या काव्यात कुठे कुठे आनंदाचे तरंग अल्पांशानं दिसतात याचं कारण नामदेव आणि ज्ञानदेव यांची मैत्री लाभली होती. एक ब्राह्मण, एक शिंपी आणि एक महार एकमेकांना उराउरी भेटत होते. आपापली सुखदुःखं परस्परांना देत होते. मला खरं तर जातीच्या परिभाषेत बोलणं आवडत नाही. पण हे तीन भिन्न वर्णजातीतले संत एकत्र आले ही घटना महाराष्ट्रात नवीन आणि क्रांतिकारक होती. 'सुखाचे सुख मज दावियेले डोळा' हे उद्गार खरे आहेत.

●●●

**माझी तू माऊली माझी तू माऊली । माझी तू माऊली विठ्ठला तू ॥**
**मज का मोकलिले वेगळे का केले । का बा धाडियेले मंगळवेढ्या ॥**
**काय माझा भार झालासे जोजार । म्हणोनी केले दूर पायांपरते ॥**
**चोखा म्हणे मज द्रव्याची नाही चाड । तुझे नाम गोड मुखीं गाता ॥**

भक्ताला केवळ परमेश्वराची प्रेमदृष्टी हवी असते. पांडुरंगाची कृपा झाली की मग मिळवण्यासारखं दुसरं काहीच उरत नाही. भक्ताला जर विचारलं, ' तुला राज्यवैभव पाहिजे, की ईश्वराचा अनुग्रह पाहिजे ?' भक्त म्हणेल 'साऱ्या जगाची सत्ता मिळत असली तरी मी तिच्याकडं वळूनही पाहणार नाही. पांडुरंगाचा कृपाप्रसाद मिळावा, त्याचं पवित्र नाव माझ्या देहकणात मिसळून जावं, त्याचा प्रेमळ सहवास सतत मिळावा, त्याची अमृतवाणी माझ्या कानीमनी रुजावी इतकंच मला पाहिजे. सत्ता नको, संपत्ती नको, मला विठ्ठल हवा. मी हेच म्हणेन 'माझी तू माऊली विठ्ठला तू ' माऊलीचं प्रेम हीच माझी सर्वश्रेष्ठ दौलत आहे.'

एखादा व्यवहारी मनुष्य म्हणेल या वेड्या देवभक्ताला व्यवहार कळत नाही. धनदौलतीचं महत्त्व काय असतं हे याला अजून समजलं नाही. पांडुरंगाचं ध्यान करून धन मिळत नाही. माड्या महालात राहता येत नाही. देवाच्या भक्तीपेक्षा द्रव्याची भक्ती हीच लाभदायक होते. पण हा व्यवहारी विचार कोणत्याही संताच्या मनात क्षणभरही येणं शक्य नाही. भक्त हा ईश्वरी प्रेमाचा भुकेला असतो. भौतिक वैभवाची त्याला इच्छाच नसते. कारण त्यापेक्षा कितीतरी उच्चकोटीचा श्रेष्ठ आनंद परमेश्वराच्या सान्निध्यात त्याला मिळू शकतो. संतांचे हिशेब सामान्य व्यवहारी लोकांना कळत नाहीत. सामान्य माणूस धनाला देव मानतो. पण संत देवाला आपल्या जीवनाचं सर्वोच्च धन मानतो.

संत चोखामेळा हा पांडुरंगाचा अनन्य भक्त होता. म्हणून तो या अभंगात त्रिवार सांगत आहे 'माझी तू माऊली विठ्ठला' आणि त्याला व्याकुळ मनानं विचारीत आहे 'मला तू का सोडलंस ?' इथं पंढरीला होतो. आता मंगळवेढ्याला का धाडलंस ? तुला माझा भार झाला काय ? तुझ्या चरणांपासून तू मला दूर का पाठवलंस ? मला कशाचीही चाड नाही. धन नको, मान नको. फक्त तुझं नाम पाहिजे. तुझी सोबत-संगत पाहिजे.'

या अभंगातून चोखोबांचं हळवं प्रेमळ मन स्वच्छ दिसतं. चरितार्थासाठी मंगळवेढ्याला जाणं त्यांना आवश्यक झालं. तेव्हा पंढरी सोडताना त्यांच्या मनानं

केलेलं हे करूण आक्रंदन आहे. पोटासाठी परमेश्वराचं गाव सोडून दूरवर जाणं हे या भक्ताला मोठं संकट वाटतं. सामान्य माणूस पोटोबालाच विठोबा मानतो. पण चोखामेळ्याला स्वतःचा स्वार्थ उरलेला नव्हता. विठ्ठलाच्या सान्निध्यात तो इतका रमला होता की, देवाचा विरह त्याला प्राणसंकटासारखा वाटत होता.

या अभंगात भक्तीचा उत्कट प्रत्यय येतो. आज सातशे वर्षांनंतरही चोखोबांची कविता सहस्त्रावधी रसिकांच्या अंतःकरणाला आपला हळवा पण समर्थ स्पर्श करू शकते. याचं महत्त्वाचं कारण असं की, चोखोबांचं सारं भक्तीमय जीवन, त्यांची सारी सुखदुःखं या कवितेतून स्वच्छपणानं दिसतात. या सच्या कवितेचे सूर आपल्यालाही भक्तीच्या क्षेत्रात ओढून नेतात. भावभक्तीतूनच साहित्याला आणि जीवनाला शक्ती प्राप्त होते. विठ्ठल नावाच्या एका महनीय तत्त्वाच्या ध्यासानं जन्मभर गात राहिलेला हा चोखामेळा मराठी सारस्वताला वैभव देऊन गेला. विठ्ठल ही त्याची माऊली होती. विठ्ठल ही त्याची सावली होती. विठ्ठलाच्या वात्सल्यानं आनंदित झालेल्या या कवीचे उद्‌गार आपल्यालाही एक आगळी अनुभूती देतात.

आपली सुखदुःखं, आशा-निराशा व्यक्त करण्याचं भक्ताचं एकमेव ठिकाण म्हणजे परमेश्वर. कारण परमेश्वर हीच सर्वश्रेष्ठ सत्ता आहे. ही खूण भक्ताला पटलेली असते. 'तू माझी माऊली' असं केवळ चोखामेळाच विठ्ठलाला सांगतात असं नव्हे. प्रत्येक भक्ताला आईची माया आपल्या विठ्ठलाच्या चरणीच मिळू शकेल असं वाटत असतं. श्रद्धेत एक आगळं सामर्थ्य असतं. श्रद्धेची शक्ती पर्वताला देखील हालवू शकते. चोखामेळा अस्पृश्यतेच्या दुःखाग्नीत जन्मभर होरपळत राहिले. परंपरेनं त्यांना शूद्र ठरवून त्यांच्या कपाळावर बहिष्काराचा तप्त लेख लिहिला. पण या संकटातही विठ्ठल आपली माऊली आहे ही त्यांची अतूट श्रद्धा केव्हाही डळमळीत झाली नाही. भक्ती ही 'सुळावरची पोळी' असते असं म्हणतात. त्याचा अनुभव चोखामेळ्यालाही अखंड येत होता. पण त्यानं मुखातलं नाम सोडलं नाही. आणि मनातल्या विठ्ठलाकडं कधी पाठ फिरवली नाही. आपल्या माऊलीचा धरलेला पदर या बालकानं कधीच सोडला नाही. मायेची ऊब त्याला या पदरानं दिली. आणि आपलं दरिद्री आयुष्यही श्रीमंत झालं ही त्याची भावना झाली. मन संतुष्ट असल्यावर कोण श्रीमंत आणि कोण दरिद्री ? कंगाल असलेला चोखामेळा विठ्ठलमाऊलीमुळं धनवान झाला यात शंका नाही.

●●●

**नेत्री अश्रुधारा उभा भीमातीरी। लक्ष चरणावरी ठेवोनिया ।।**
**का गा मोकलीले न येसी देवा। काय मी केशवा चुकलोसे ।।**
**नेणे करू भक्ती नेणे करू सेवा। न येसी तू देवा कळले मज ।।**
**चोखा म्हणे मज जीवनाचा विसावा। पोकारितो धावा म्हणोनिया ।।**

ज्याची आपण मनोभावे करूणा भाकतो, भक्ती करतो, तो परमेश्वर अजून आपल्याला भेटत नाही याचं अनिवार दुःख भक्ताला होत असतं. रात्रंदिवस त्याच इच्छेनं तो तळमळत असतो. परमेश्वरी साक्षात्कारासाठी आसुसलेल्या मनाची अगतिकता संत चोखामेळ्याच्या या अभंगातून व्यक्त झाली आहे. परमेश्वराचं रूप प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहावं, त्याचा हात आपल्या मस्तकी असावा, त्याच्याशी आपण संवाद करावा, त्याच्या दृष्टीतून झरणाऱ्या प्रेमधारांत आपण चिंब भिजावं ही कोणत्याही अनन्य भक्ताची तीव्र भावना असते. पण तरीही परमेश्वर दिसत नाही, त्याचा सहवास लाभत नाही यामुळं भक्ताचं मन आणि सारं जीवन वैफल्यानं काजळून जातं. काय करावं, कुठं जावं म्हणजे आपल्याला परमेश्वरी साक्षात्कार होईल अशी त्याची सैरभैर स्थिती होते. भक्तीच्या वाटेनं चालून देवाची आराधना करणाऱ्या प्रत्येक भक्ताच्या पदरात निराशेचं दुःख अनेकवेळा पडतं. हा अनुभव सर्वच भक्तांचा असतो. निराश झालेलं दुबळं मन दुःखाच्या डोहात बुडून जातं. आपलं सारं जीवन व्यर्थ झालं ही हताश जाणीव त्याला पावलोपावली होऊ लागते. या अवस्थेला 'आत्म्याची काळोखी रात्र' The dark night of the soul अशी संज्ञा दिलेली आहे. केव्हातरी ही रात्र संपणार असते. पण ती लवकर संपत नाही म्हणून भक्ताचा आत्मा प्रतिक्षणी तळमळत राहतो.

'ओस जाल्या दिशा, मज वाटे भिंगुळवाणे।' हा तुकारामांचा अभंग याच मनःस्थितीचा द्योतक आहे. नामदेवांच्या जीवनातही अशीच काळोखी रात्र येऊन गेली. संत चोखोबाही परमेश्वरी अनुग्रहासाठी आसुसलेले आहेत. आपल्या स्थितीचं त्यांनी वर्णन केलं आहे. 'भीमेच्या तीरावर डोळ्यांतून अश्रू गाळत मी उभा आहे. तुझे चरण दिसावेत म्हणून व्याकुळ झालो आहे. माझ्या हातून कोणती चूक घडली म्हणून तू माझ्यांकडे लक्ष देत नाहीस ? तू येणार नाहीस हे मला कळलं आहे. कोणत्या उपायांनी तुला आळवू ? कोणत्या उपायांनी तुला आळवू ? कोणत्या रीतीनं तुझी सेवा करू ? देवा, धावत ये. मला हृदयाशी धर. तूच माझ्या जिवाचा विसावा आहेस.' अभंगांतून व्यक्त झालेला हा आशय चोखोबांच्या

मनातल्या अगतिकतेचं आणि वैफल्याचं दर्शन घडवतो. भक्ती आणि प्रेम लवकर सफल होऊ नये हा दैवाचा खेळ असा का खेळला जावा हे कळत नाही. देवदेखील प्रथम निराशेचे घाव घालतो. यातनांच्या वाटेनं फरफटत नेतो. भक्ताची कठीण परीक्षा घेतो. आणि मग नंतर एका क्षणी तो त्याला दर्शन देतो. एखादं साधं उद्दिष्ट मिळवायचं असेल तर त्यासाठी देखील कष्ट करावे लागतात. इथं तर विश्वाची सूत्रं सांभाळणारा प्रत्यक्ष देव मिळवायचा आहे. मग त्याला सारं आयुष्य समर्पित केल्याशिवाय तो लाभणार नाही. दिल्याशिवाय काही मिळत नाही हा लौकिक जगातला नियम अलौकिक परमेश्वराच्या बाबतीतही पाळावा लागतो. मीरेनं आयुष्य दिलं तेव्हा तिला कृष्ण मिळाला. तुकोबांनी जीवन दिलं तेव्हा पांडुरंग भेटला. चोखोबांनाही तो भेटणार आहे. पण सध्यातरी आपल्या अश्रूंनी त्या पांडुरंगाची पूजा करीत राहण्याशिवाय गत्यंतर नाही. जिवाचा विसावा असलेला विठ्ठल असाच भेटणार नाही.

सर्वच भक्तांच्या जीवनात दाट निराशेची अशीच लाट येत असते. वर्षानुवर्षे जिवाच्या आकांतानं भक्ती करूनही तो परमेश्वर भेटत नसेल तर भक्ताची अवस्था विकल आणि विफल होते. ईश्वर हेच भक्ताचं एकमेव उद्दिष्ट असतं. त्याची करुणामय पाऊलं दिसावीत म्हणून तो रात्रंदिवस तळमळत असतो. व्यवहारी जगानं त्याला वेडा ठरवलेलं असतं. पण भक्ती आणि प्रेम या भावना वेडाच्याच सीमारेषेपर्यंत जाव्या लागतात. एका अर्थानं परमेश्वर आपली परीक्षा पाहत आहे हे भक्ताला पटतं. पण त्याची भेट होत नाही म्हणून तो दुःखानं, अगतिकत्वाच्या जाणिवेनं काळवंडून जातो. ही अनुभूती सर्व भक्तांना अपरिहार्यपणे येते. सफलतेचा आनंद मिळविण्यासाठी विफलतेच्या वणव्यात होरपळावं लागतं. सुवर्णालासुद्धा आगीतून आपल्या शुद्धत्वाची खात्री पटवावी लागते. सूर्योदयापूर्वी मध्यरात्रीचा काळोख जगाला स्वीकारावा लागतो. चोखामेळा हा भक्त आपल्या श्रद्धेची फुलं हातात घेऊन देवभेटीसाठी जन्मभर तिष्ठत उभा होता. 'न येसी तू देवा मज कळले' असं म्हणून तो अश्रू गाळीत भीमातीरी उभा आहे. अखेर त्याला विठ्ठलाचा साक्षात्कार होतो असं त्याच्या अभंगांतून कळतं. परमेश्वरी साक्षात्कार हा इंद्रियांना होणारा भास आहे असं एक मत आहे. ही एक मनोमय अनुभूती आहे. ज्याला ती आली तोच भाग्यवान म्हटला पाहिजे. चोखोबांचंही भाग्य यथावकाश उगवलं. त्यांच्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूत 'विठ्ठल' गाऊ नाचू लागला.

●●●

**सप्रेमे निवृत्ति आणि ज्ञानदेव । मुक्ताईचा भाव विठ्ठलचरणी ।।**
**सोपान सावंता गोरा तो कुंभार । नरहरी सोनार प्रेमभरित ।।**
**कबीर कमाल रोहिदास चांभार । आणिक अपार वैष्णवजन ।।**
**चोखा तया पायी घाली लोटांगण । वंदितो चरण प्रेमभावे ।।**

संतवृत्तीचा मनुष्यच संतांना ओळखू शकतो. चोखामेळा यांच्या आचारविचारात, दृष्टिकोनात, साऱ्या जीवनात संतत्व ओथंबलेलं होतं. भक्ती आणि प्रेम त्यांच्या अंतःकरणातून अखंड वाहणाऱ्या चंद्रभागेप्रमाणं झुळझुळत होतं. चोखोबांचं आयुष्य दुर्दैवानं वेढलेलं असलं तरी त्यांचं एक महनीय सुदैव असं होतं की, त्यांना श्रेष्ठ संतांचा सहवास लाभत होता. संतांची महती ते जाणू शकत होते. त्यामुळे हा संतसहवास चोखोबांना घडवीत होता.त्यांच्या व्यक्तित्वाला आणि कवित्वाला आकार देत होता. नाना प्रकारच्या आपदा-विपदा भोगतानाही संतहृदयीचा प्रेमभाव कधीच ओसरत नाही. जगाचे आघात सहन करूनही जगाच्या कल्याणासाठी देह कष्टविणाऱ्या संतांची उदारता आणि वत्सलता चोखोबांनी पाहिली होती. ज्ञानेश्वर-नामदेवांनी त्यांना आत्मीयतेनं पोटाशी धरलं होतं. इतर संतांच्याही प्रेमाची अनुभूती त्यांना आली होती. त्या सर्वांचं कृतज्ञ स्मरण या अभंगातून चोखामेळा करतात. त्यामुळं हा अभंग हृदयस्पर्शी झाला आहे.

संत चोखोबांनी अनेकवेळा निवृत्ती आणि ज्ञानदेव यांच्याशी हृदयसंवाद केला होता. मुक्ताबाईंच्या हार्दिक प्रेमभक्तीची त्यांना प्रतीती आली होती. नामदेवांची कीर्तनं त्यांनी जीवाचे कान करून ऐकली होती. त्यांच्या सोबतीला सावतामाळी, गोराकुंभार आणि नरहरी सोनार हेही महान विठ्ठलभक्त असायचे. संत संताला भेटला की, दोघांच्याही हृदयातली भक्तीची वीणा झंकारित होते. भजन आणि नामसंकीर्तन यात रंग भरतो. हा अनुभव चोखोबांनी अनेक वेळां घेतलेला आहे. म्हणूनच या अभंगात ते म्हणतात, 'मी या संतांच्या पायावर प्रेमानं लोटांगण घेतो.' त्यांचा मी कसा उतराई होऊ ? कबीर आणि कमाल, रोहिदास चांभार आणि असंख्य वैष्णव संत, असंख्य देवभक्त मला वंदनीय आहेत. या सर्व संतांची आठवण त्यांच्या चित्तात दाटून येते आणि ते आनंदभरित होतात.

चोखोबांच्या जीवनदृष्टीला या संतांच्या सान्निध्यात आकार मिळाला यात शंका नाही. संस्कारित करण्याची शक्ती संतांच्या संगतीत आणि वचनात असते. जीवनचिंतनातून आणि समाजनिरीक्षणातून संतांनी ज्ञानसंपादन केलेलं असतं. जे

आपण मिळवलं ते समाजाला द्यावं या उत्कट इच्छेनं संत आपल्या विचारांचं प्रसरण करीत असतात. हा विचार जीवनाच्या अभिवृद्धीसाठी महत्त्वाचा असतो. प्रकाश देणं हा जसा दीपकाचा गुणधर्म असतो, सुवास देणं हा जसा फुलाचा जन्मजात स्वभाव असतो, त्याप्रमाणं आपल्या पुण्यप्रद विचारांचं समाजात अभिसरण घडवून आणणं हा संतांचा उद्देश असतो. 'आनंदाचे आवारू मांडू जगा' आणि 'अवघाचि संसार सुखाचा करीन' ही ज्ञानदेवांची प्रतिज्ञा होती. नामदेवही 'ज्ञानदीप लावू जगी' या ध्येयानं भारलेले होते. संत कर्मयोग शिकवीत होते. देवभक्तीचा सुगंध पसरवीत होते. त्यांच्या सहवासात चोखामेळा आले. आणि तेही भक्तिप्रेमाच्या विचारांचं आदान-प्रदान करू लागले. त्यांच्या ठायी निखळ भक्ती होती. स्वार्थ आणि अहंकार यांचा लेशही नव्हता. त्यामुळंच आपल्या सर्व समकालीन साधूसंतांना आणि वैष्णवजनांना त्यांनी अपार आत्मीयतेने वंदन केलं आहे. जिथं जिथं त्यांना दिव्यत्व दिसलं तिथं तिथं त्यांनी आपली मान लवविली. आम्हाला चोखोबांच्या व्यक्तित्वाची, दिव्यत्वाची प्रचीती येते म्हणूनच 'तेथे कर आमुचे जुळती.'

संत चोखोबा अनेक बाबतीत दुर्दैवी होते. दुःखीकष्टी होते. पण एका बाबतीत मात्र ते अत्यंत सुदैवी होते. त्यांना त्यांच्या काळातल्या अनेक श्रेष्ठ संतांचं प्रेम मिळालं. या प्रेमातूनच त्यांचा मानसिक आणि बौद्धिक विकास होत गेला. चोखोबा मुळातच सत्प्रवृत्त आणि बुद्धिमान असल्यामुळं परिस्थितीतून त्यांनी स्वतःला घडवलं. प्रयत्नवादी मनुष्य स्वतःला घडवीत जातो. आपल्या प्रारब्धाचा प्रवाह काही प्रमाणात तो अनुकूलतेकडं वळवू शकतो. संत निवृत्तिनाथांपासून नरहरी सोनारापर्यंतच्या भक्तकवींचा संजीवक सहवास त्यांना लाभला. कबीर आणि कमाल यांच्याही काव्याचं त्यांनी अध्ययन केलं. त्यामुळं चोखोबांच्या व्यक्तित्वाचं सोनं अधिकच चोख झालं. संतसहवास हा साक्षात् परमेश्वरी कृपेचा आविष्कार असतो. ही कृपा चोखोबांना भरभरून मिळाली. संतांशी केलेल्या संवादामुळं विचारसंपन्न झालेले चोखोबा बाह्यतः दुःखाचं पण अंतर्यामी तृप्तीचं जीवन जगले. त्यांनी वेदनेचं गाणं गाईलं तसंच सामाधानाचेही सूर आळवले. या अभंगातला सूर शांतीचा, संतोषाचा आहे.

●●●

**नाही देह शुद्ध याति अमंगळ। अवघे वोंगळ गुणदोष ॥**
**करू जाता विचार अवघा अनाचार। आणिक प्रकार काय बोलू ॥**
**वाणी नाही शुद्ध धड न ये वचन। धि:कारिती जन सर्व मज ॥**
**अंगसंग कोणी जवळ न बैसे। चोखा म्हणे ऐसे जीवित माझे ॥**

संत चोखोबांचं जीवन दुःखमय होतं. खरं तर त्यांच्या दुःखाला ते जबाबदार नव्हते. काही दुःखं आपणच निर्माण करतो. पण चोखोबांचं संपूर्ण आयुष्य नासवून टाकणारी दुःखवेदना ही केवळ सामाजिक विषमतेमुळं उत्पन्न झाली होती. कुणीतरी, केव्हातरी समाजात विषमतेची बीजं पेरली आणि त्यातून निर्माण झालेली कडवट, विषारी फळं पिढ्यान् पिढ्या कोट्यवधी लोकांना निरुपायानं चाखावी लागली. यात त्यांचा दोष काहीच नव्हता. विषमतेवर आधारलेली समाजरचना माणसाच्या कर्तृत्वाकडं, बुद्धीकडं लक्ष न देता त्याचा जन्म कोणत्या कुळात, कोणत्या जातिवर्णात झाला आहे यावरच त्याची योग्यायोग्यता ठरवीत होती. या अन्यायाची अनेक उदाहरणे देता येतात. महाभारतात ज्याच्या वीरत्वाची आणि उदारतेची मुद्रा उमटली आहे त्या महारथी कर्णाला केवळ जातीच्या आणि वर्णाच्या निरर्थक विचारामुळं न्याय मिळू शकला नाही. सूतपुत्र म्हणून समकालीन जगानं त्याची उपेक्षा केली. एकलव्याचं उदाहरण देखील याच अन्यायाची कहाणी सांगतं. मध्ययुगात संत नामदेव, चोखामेळा, गोराकुंभार, सेना न्हावी, सावता माळी, नरहरी सोनार आणि तुकाराम या साऱ्या संत कवींना सामाजिक विषमतेच्या धगीत होरपळावं लागलं. सोयराबाई, जनाबाई यासारख्या संतकवयित्रींनाही स्त्रीपणाचं आणि अकुलीनत्वाचं सामाजिक दुःख सहन करावं लागलं. भारतीय समाजव्यवस्थेत समतेचं वातावरण निर्माण करण्यासाठी या संत-महंतांनी आपल्या काव्यातून देवाधर्माला आणि समाजाला उत्कट साद घातली आहे. चोखोबांच्या या अभंगातून व्यक्त झालेलं विलक्षण दुःख केवळ व्यक्तिगत स्वरूपाचं नाही. अस्पृश्यतेच्या ज्वालेत जळणाऱ्या लक्ष लक्ष मनांचं आर्त आक्रंदन यातून प्रकट झालं आहे.

चोखोबांचा हा अभंग वाचताना आपल्या डोळ्यांत अश्रू उभे राहतात. मनाला पीळ पडतो. ते म्हणतात, 'माझं शरीर शुद्ध नाही. जात अमंगळ आहे. विचार करू लागलो तर सगळा ओंगळपणा, सगळे दोष माझ्याच वाट्याला आले आहेत. माझी वाणी शुद्ध नाही. माझ्या बोलण्यात धडपणा नाही. कोणी माझ्याजवळ बसायलाही तयार नाही. 'धि:कारिती जन सर्व मज। चोखा म्हणे ऐसे

जीवित माझे ।' आपल्या प्रारब्धाची, आपल्या फाटलेल्या आणि तुटलेल्या आयुष्याची ही कर्मकहाणी चोखोबा सांगतात. अस्पृश्याची सावलीसुद्धा अंगावर पडू द्यायची नाही असल्या तर्कशून्य हास्यास्पद समजुतींच्या त्या कालखंडात चोखोबांना आपुलकीचे आणि सहानुभूतीचे दोन शब्दही समाजाकडून मिळाले नाहीत. ज्ञानेश्वर, नामदेव आणि समकालीन संत यांनीच चोखोबांवर प्रेमाचा वर्षाव केला. पण गावकुसाबाहेर राहिलेल्या या विठ्ठलभक्ताच्या पदरात सहानुभूतींच्या शब्दांचं अल्पस्वल्प दानदेखील कधी पडलं नसेल. सातशे वर्षांपूर्वीच्या सामाजिक परिस्थितीत सर्वसामान्य माणसाची काय स्थिती होती याचं हे हृदयद्रावक चित्र आहे. पण या अवस्थेतही चोखोबांच्या अंतःकरणातली विठ्ठलभक्तीची ज्योत तेवतच राहिली. त्या आधारावर आपली काटेरी वाट ते चालत राहिले आणि उत्तमोत्तम कवितांची रचना करीत राहिले हे त्यांचं कार्य इतिहासात कायमचं राहील.

आपली जात अमंगळ आहे आणि देह शुद्ध नाही असं यात चोखोबांनी म्हटलं आहे. जात अमंगळ आहे हे म्हणायला रूढ परंपरेशिवाय काहीही आधार नाही. मंगलत्व आणि अमंगलत्व हा जातीचा गुणधर्म नव्हे, आपली सामाजिक रचना उच्चनीचपणाच्या केवळ मानीव कल्पनेतून झाली आहे. ही समाजरचना ईश्वरानं केली नाही. ईश्वरापुढं कुणीही वरिष्ठ कनिष्ठ नाही. सारे समान आहेत. समता आणि ममता हेच परमेश्वराचं लक्षण आहे. पण काही धूर्त, स्वार्थी धर्मपंडितांनी प्राचीन काळापासून माणसांची चार विभागात वाटणी करून जन्मसिद्ध विषमतेचं तत्त्व दृढ केलं आहे. चोखामेळा महार जातीत जन्मला म्हणून तो अमंगळ ठरवला गेला. ही एका अर्थानं धर्माची आणि मानवतेची विटंबनाच आहे. महाराचा स्पर्श झाला तरी सचैल स्नान करावं ही कुजकट कल्पना ज्याच्या सडक्या मेंदूतून जन्माला आली त्याचं कौतुक केलं पाहिजे ! आज आपण अशा युगात आहोत की आता नवीन चोखामेळा जन्माला येऊ नये. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक समतेवर आधारलेली उदार घटना या देशाला दिली आहे. आता तरी दुःखवेदनेचा जातीपातींचा, विषमतेचा काळा इतिहास पुसला पाहिजे. संत चोखोबा हे शुद्ध, स्वच्छ आणि पवित्र होते. आपल्याला धिःकारणाऱ्या जनतेला त्यांनी प्रेम आणि समता यांची देणगी दिली आहे. माणसाचं मन शुद्ध असलं म्हणजे झालं. कुळ आणि जात यांचा विचारसुद्धा करण्याचं कारण नाही पण आपलं हिमालयाएवढं दुःख चोखोबांनी या अभंगात मांडलं आहे.

●●●

ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ।।
कमान डोंगी परी तीर नव्हे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ।।
नदी डोंगी परी जळ नव्हे डोंगे । काय भुललासी वरलीये रंगे ।।
चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ।।

माणसाची उच्चता किंवा कनिष्ठता ही खरं तर त्याच्या गुणवत्तेवर, कर्तृत्वावर अवलंबून असते. योग्यतेचा संबंध जात, कुळ आणि वर्ण यांच्याशी जोडणं हा वेडेपणाचा प्रकार आहे. पण या वेडेपणाचं समर्थन करणारी शास्त्रं लिहिली गेली. कित्येक पंडितांनी आणि धर्मचिंतकांनी जन्म हाच श्रेष्ठत्वाचा अथवा कनिष्ठत्वाचा निकष आहे असं सांगून त्या विचाराचा प्रचार केला. विषमतेवर आधारलेल्या वर्णव्यवस्थेनं उच्चनीचपणाचा सिद्धान्त ईश्वरप्रणीत आहे हे गृहीत धरलं. संत चोखामेळा शूद्रकुळात जन्मला म्हणून तो कनिष्ठ मानायचा, मग त्याची भक्ती आणि कवित्वशक्ती कितीही उच्च प्रतीची असली तरी त्याला प्रतिष्ठेचं स्थान कधीही मिळू शकणार नाही अशी पक्की व्यवस्था कर्मठ आणि दुराराध्य परंपरेनं करून ठेवली होती. शूद्रकुळातला म्हणून विठ्ठलदर्शन घेण्याचा, मंदिरात प्रवेश करण्याचा अधिकारही त्याला आणि त्याच्या हजारो बांधवांना नाकारण्यात आला होता. शूद्रत्व म्हणजे नीचत्व हे चुकीचं समीकरण शतकानुशतकं समाजानं स्वीकारलं आणि त्याचा परिणाम म्हणून कोट्यवधी लोकांना उपेक्षित आणि अपमानित अवस्थेत गावाच्या बाहेर फाटक्या तुटक्या झोपडीत दारिद्र्याचं आणि कष्टाचं जीवन कंठावं लागलं. ब्राह्मणत्व आणि शूद्रत्व यात श्रेष्ठकनिष्ठपण ठरवायचं झालं तर ते त्या व्यक्तींच्या कर्तृत्वावरूनच निश्चितच करता येतं.

चोखामेळा हे पांडुरंगाचे अनन्य भक्त होते. त्यांचं समग्र जीवन आणि चारित्र्य त्यांच्या नावासारखंच चोख म्हणजे शुद्ध होतं. पण या शुद्धात्म्यालाही ज्या परंपरेनं शापित अवस्थेतलं जिणं बहाल केलं त्या परंपरेला आव्हान दिलं पाहिजे. हे आव्हान देण्याचा प्रयत्न संत चोखामेळा आणि पुढील कालखंडात संत तुकारामांनी केला आहे. खरं तर संताची जात पाहणं हाच अत्यंत वेडेपणा आहे. जातीपातीच्या चौकटीत खरा संत कधीत राहत नाही. तो असल्या भेदांपासून सदैव मुक्त असतो. संत चोखोबांनी या अभंगातून विषमता मानणाऱ्या प्रवृत्तीला बिनतोड प्रश्न विचारले आहेत. ते म्हणतात,

'अरे, ऊस वाकडा असेल पण त्याचा रस कधी वेडावाकडा असतो का ?

धनुष्य वाकलेलं असेल पण बाण तसा असतो का ? नदीला वेडीवाकडी वळणं असतील पण पाणी तसं असत नाही. तुम्ही बाह्य गोष्टीवरून आणि वरवरच्या रंगावरून अंतरंगाची परीक्षा करता हे हास्यास्पद आहे. काय भुललासी वरलिया रंगा ?' हा त्यांचा सवाल आहे. अभंगाच्या शेवटच्या ओळीत ते म्हणतात, 'चोखा डोंगा, परि भाव नोहे डोंगा। काय भुललासी वरलिया रंगा ' पण चोखोबा कोणत्याही अर्थानं डोंगा म्हणजे कमी दर्जाचे नव्हते. त्यांनी स्वतःला विनयानं डोंगा म्हटलं असेल पण ते अंतर्बाह्य श्रेष्ठच होते. कारण ईश्वराचा अनन्य भक्त उच्च प्रतीचाच असतो. कुळ आणि जात, वर्ण यांची निरर्थक चर्चा परमशुद्ध भक्तांच्या बाबतीत करण्याचं कारण नाही. म. कबीर म्हणाले होते- म्यानेतल्या तलवारीचं मूल्य पाहावं. तलवार महत्वाची. म्यान बरी की वाईट याची चिकित्सा करणं हा वेडेपणाचाच प्रकार आहे. परंपरेनं चोखामेळ्याला अपमानित अवस्थेत ठेवलं असलं तरी संतांच्या आणि कवींच्या मालिकेत चोखोबा हे नामांकित आणि मानांकित या श्रेणीतले संत आहेत यात शंका नाही.

एक भावसुंदर आणि विचारसमृद्ध कविता म्हणून या अभंगाचा उल्लेख केला पाहिजे. संत चोखोबांनी एवढा एकच अभंग लिहिला असता तरी कवींच्या मालिकेत त्यांची गणना झाली असती. या काव्यातलं त्यांनी केलेलं आत्मसमर्थन अत्यंत प्रभावी आहे. ही गोष्ट खरीच आहे की, लोक बहिरंगाला भुलतात, अंतरंगाला विसरतात. अंतरंगात डोकावून पाहण्याइतकी बुद्धी लोकांना असते कुठे ? साधूंचं अंतःकरण ओळखायला देखील साधुत्वाच्या पायरीपर्यंत यावं लागतं. वरचा रंगढंग पाहतात आणि विचार न करता त्या साधूच्या (?) पायांवर डोकं ठेवतात. कोणाच्या पायावर आपण डोकं ठेवीत आहोत हे समजायला देखील डोकं लागतं. संत तुकोबांच्या काळातही त्यांना 'संत' म्हणून लवकर मान्यता मिळाली नाही. 'वरलिया रंगा' भुलणारे असेच गाजरपारखी तुकोबांच्या वेळी होते. आजही ते आहेत. संत कबीरानं म्हटल्याप्रमाणं साधू त्याच्या ज्ञानावरून आणि चारित्र्यावरून ओळखावा. त्याचं बाह्यदर्शन कसंही असलं तरी अंतरंगदर्शन घेण्याची क्षमता लोकदृष्टीत आली पाहिजे. संत चोखोबा कशानंही 'डोंगा' या विशेषणाला पात्र नव्हते. ते शुद्ध, सरळ स्वभावाचे आणि उदार अंतःकरणाचे देवभक्त होते. शूद्र समजल्या जाणाऱ्या या संताच्या हृदयात पावित्र्याची गंगा वाहत होती. म्हणूनच त्यांच्या काव्यातून भक्तीचे आणि प्रेमाचे अनेक रंग प्रकट झाले आहेत.

●●●

**वारी पंढरीची तोचि वारकरी । दया क्षमा वरी वसे तेथे ।।**
**तोचि माझा जीव प्राणाचाहि प्राण । जीव वोवाळीन तयावरी ।।**
**आसनी शयनी पंढरीचे ध्यान । वाचे नारायण जप सदा ।।**
**चोखा म्हणे तोचि माझा हे सांगाती । तयाचे संगती देव जोडे ।।**

पंढरीची वारी करणाऱ्या भक्ताला वारकरी ही संज्ञा आहे. पण केवळ पंढरीला जाणारा आणि विठ्ठलाच्या पायी माथा ठेवणारा भाविक हेच वारकऱ्याचं एकमेव लक्षण नव्हे. वारकरी पंथ हा समता तत्त्वावर आधारलेला उदार विचारांचा पंथ आहे. वारकऱ्याच्या ठायी दया, क्षमा आणि शांती हे भाव प्रामुख्यानं असतात. तो सर्वांना समान लेखतो. उच्चनीचत्वाचा भाव त्याच्या मनातही कधी येत नाही. 'मुंगी आणि राव । आम्हा सारखाचि जीव ।' ही त्यातली भूमिका असते. त्याचा विठ्ठल केवळ पंढरीत असत नाही. तो विश्वात सर्वत्र त्याच्या दृष्टीला जाणवत असतो. 'जे जे भेटे भूत । ते ते जाणिजे भगवंत ।' ही उदार भावना वारकऱ्याच्या चित्तात रुजलेली असते. असा वारकरी संत चोखोबांना प्रिय होता. तो भेटला की त्यांच्या दुःखदैन्याचा निचरा होत असे. आनंदाची लाट त्यांच्या मनात उचंबळून येत असे. कारण दया आणि क्षमा, समता आणि ममता, भक्ती आणि शांती ही चोखामेळ्याचीही जीवनवैशिष्ट्यं होती. सामाजिक छळ सोसून, पोटासाठी कष्ट उपसून मनाची स्वच्छता आणि शांती टिकवणं सामान्य माणसाला अशक्य असतं. पण चोखोबा संत होते. पांडुरंगावर त्यांची अनन्य श्रद्धा होती. असाच श्रद्धाशील वारकरी भेटला म्हणजे त्यांना प्रत्यक्ष परमेश्वर भेटल्याचा आनंद व्हायचा. तुकोबांनीही एका अभंगात म्हटलं आहे.

'माझिये जातीचा मज भेटो कोणी । आवडीची धणी फेडावया । ' माझ्याच वृत्ती-प्रवृत्तीचा भक्त भेटला तर मला आत्यंतिक समाधान होईल असं ते म्हणत असत. दोन भक्तांचा हृदय संवाद म्हणजे गंगा-यमुनेची उराउरी झालेली भेट. याच भावनेनं पंढरीचा वारकरी हा चोखोबांच्या दृष्टीनं प्राणाचाही प्राण असतो. ते गहिवरल्या मनानं म्हणतात,

'तोचि माझा जीव प्राणाचाहि प्राण ।
जीव वोवाळीन तयावरी ।।'

कारण त्याला सदासर्वदा पंढरीचं ध्यान लागलेलं असतं. त्याच्या शब्दांत नारायणाचं स्मरण असतं. 'चोखा म्हणे तोचि माझा सांगाती तयाचे संगती देव

जोडे ।' खरा वारकरी ही देवाची प्रतिमाच असते. देवत्व म्हणजे तरी काय ? जिथं आनंद आहे, दया आणि क्षमा आहे, जिथं शुद्धता आणि पवित्रता आहे, जिथं मनातल्या सुविचारांचा सुगंध आहे. जिथं निष्कलंक चारित्र्य आहे. वृत्तीची उदारता आहे, जिथं सर्व जीवांविषयी प्रेमभाव आहे, तिथंच देवत्व नांदत असतं. संतांच्या ठायी ही गुणसंपत्ती असते म्हणून त्यांची भेट म्हणजेच प्रत्यक्ष देवाची भेट असं मानलं जातं. देव आणि संत यांची एकदम भेट झाली तर खरा वारकरी प्रथम संतांच्या चरणांवर मस्तक ठेवील. त्यांचा मानसन्मान करील. नंतर तो देवाकडं वळेल, संतत्व हेच देवत्वाचं खरं अधिष्ठान असतं. चोखोबांनी या अभंगातून संतांची जी महती गायिली ती बरोबरच आहे. संत हेच तीर्थक्षेत्र असतं. संतसंगत मिळाली की, ईश्वरी साक्षात्कार झाला असं मानावं. मोरोपंतांच्या काव्यातली एक ओळ आठवते. 'सुसंगति सदा घडो । सुजनवाक्य कानी पडो ।' ज्ञानेश्वरांनी संतांना उद्देशून 'मार्तंड जे तापहीन आणि चंद्रमे जे अलांछन' असं म्हटलं ते पूर्णपणानं सयुक्तिक आहे. संत चोखोबांची संतांसंबंधीची ही दृष्टी प्रत्येक भक्तानं आपल्या मनात रुजवली पाहिजे.

महाभारतातली एक कथा. यक्षानं धर्मराजाला प्रश्न विचारला, 'दिशा कोणती मानावी ? दिशा म्हणजे काय ?' धर्मराज म्हणाला, 'तुमच्या 'का दिक्' या प्रश्नाचं उत्तर 'संतो दिक्' असंच द्यावं लागेल. संत हीच दिशा. त्याप्रमाणंच चोखोबांनी 'दया, क्षमा वरी वसे तेथे ' ही वारकऱ्याची व्याख्या केली आहे. त्याच्यावर जीव ओवाळून टाकण्याइतकं त्याला त्यांनी महत्त्व दिलं आहे. ज्याच्या ठायी हे गुणी नाहीत तो वारकरी पंढरीला गेला काय किंवा काशीला गेला काय त्याला नारायण भेटणं शक्य नाही. सर्वांकडं समदृष्टीनं आत्मौपम्य भावानं पाहता आलं पाहिजे. जात, धर्म आणि संप्रदाय यांच्या भिंती प्रमाण मानणाऱ्याला वारकरी म्हणता येणार नाही. जो दयाशील, क्षमाशील, समताभावी, आहे. त्याच्या संगतीतच देव असतो. ही देवत्वाची मार्मिक मीमांसा चोखांबानी केली आहे. ज्याच्यात भेद आहे त्याच्यात देव कसा नांदणार ? चोखोबांनी हा व्यापक आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन आपल्या वाङ्मयातून व्यक्त केला हेच त्या वाङ्मयाचं वैचारिक सामर्थ्य आहे. असे वारकरीच आपले सांगाती असतात. हे आपलं भाग्य आहे असं हा भक्तकवी आनंदान सांगतो.

●●●

धिक् तो आचार धिक् तो विचार। धिक् तो संसार धिक् जन्म ।।
धिक् ब्रह्मज्ञान वाउग्या ह्या गोष्टी। दया क्षमा पोटी शांती नाही ।।
धिक् ते आसन जटाभार माथा। वायाचि हे कंथा धरली जेणे ।।
चोखा म्हणे धिक् जन्मला तो नर। भोगी नरक घोर अंतकाळी ।।

संत चोखोबा शूद्र कुळात जन्मले असल्यामुळं त्यांना सारा जन्म गावकुसाबाहेर काढावा लागला. उपेक्षा आणि तिरस्कार यांच्या कात्रीत सापडून त्यांचं आयुष्य ठिकठिकाणी फाटून गेलं होतं. या उत्कट विठ्ठलभक्ताला समाजात स्थान मिळालं नाही. अपमानित अवस्थेत असूनसुद्धा त्यांची विठ्ठलाविषयीची श्रद्धा किंचित्सुद्धा ढळली नाही. नामस्मरणात, भजन-कीर्तनात त्यांना विलक्षण आनंद वाटायचा. त्यांचं सारं कुटुंबच पांडुरंगाच्या भक्तीनं प्रेरित झालेलं होतं. जे परंपरावादी, दुराग्रही लोक त्यांच्या जातीवर बोट ठेवून त्यांना बहिष्कृत ठरवीत होते त्यांच्यातले कित्येक लोक दांभिक होते, दुराचारी होते. धार्मिकतेचा केवळ देखावा करीत होते. त्यांच्या अंतःकरणात देवभक्ती नव्हती. कुळवर्णाच्या अहंकारानं फुगून गेलेल्या या लोकांचं दुहेरी आणि दुटप्पी ढोंगी आचरण चोखोबांना दिसत होतं. उच्चवर्णातला जन्म एवढंच त्यांचं भांडवल होतं. पण या भांडवलावर ते प्रतिष्ठित होऊन बसले होते. चोखोबांसारखा अस्सल भक्त उपेक्षेच्या धगीत होरपळत होता आणि हे नकली, दांभिक भक्तं केवळ उच्च कुळाच्या भांडवलावर आपला भक्तीचा धंदा करीत होते. त्यांच्याविषयी चोखोबांनी अत्यंत स्पष्ट शब्दांतून आपलं मत व्यक्त केलं आहे. संत तुकारामांच्या शब्दांत जी आक्रमकता पाखंडी लोकांचं खंडन करताना येते त्याच आवेशाचं स्पष्ट दर्शन या अभंगातून होतं. संत चोखोबा या धंदेवाईक भक्तांच्या आणि पुरोहितांच्या दांभिक प्रवृत्तीवर अक्षरशः तुटून पडले आहेत. ते म्हणतात,

'अरे, तुमचा धिःक्कार असो. तुमच्या आचार-विचारांचा; फार काय तुमच्या जन्माचा मी धिःक्कार करतो. तुमचं सगळं ब्रह्मज्ञान हास्यास्पद आहे. पोथ्या-पुराणांवर बोट ठेवणारे आणि ज्ञानाचा बडिवार माजवणारे तुम्ही लोक अन्यायी आहात. तुमच्या अंगावरची वस्त्रं, माथ्यावरचा जटाभार, बसण्याचं तुमचं आसन हे सगळं व्यर्थ आहे. तुमच्या हृदयात दया नाही. मनात शांती नाही आणि पोटात क्षमाशीलता नाही. धिक् तो आचार, धिक् तो विचार, धिक् ते आसन, माथा जटाभार ! तुमचा जन्म व्यर्थ. आहे अंतकाळी नरकाशिवाय तुमच्या वाट्याला काहीही येणार नाही.

एका आवेगपूर्ण उचंबळत्या विचारांचं दर्शन या अभंगातून घडतं, खरं तर

चोखोबा शांत आणि सहिष्णु आहेत. त्यांच्या वागण्या- बोलण्यात नेहमी ऋजुता आणि लीनता असते. कोणाचा धिःक्कार करावा, कोणावर राग धरावा ही त्यांची प्रकृतीच नाही, हा विष्णुदास मेणाहून मऊ आहे. पण या साधुपुरुषाचा तत्कालीन धर्ममार्तंडांनी जन्मभर अपमान केला. त्याला कोणी जवळ येऊ दिलं नाही. जवळिकेचा शब्दही त्याला कधी मिळाला नाही. श्रेष्ठत्वाच्या अहंकारात बुडालेले ब्रह्मज्ञानी अधर्म आणि अनीती यांचा व्यवहार करीत होते. या विसंगतींवर आघात करण्याची इच्छा चोखोबांसारख्या कमालीच्या सात्त्विक भक्ताला झाली. याचा अर्थ धार्मिक क्षेत्रातली त्यावेळची विसंगती आणि ढोंगी आचारपद्धती केवढी वाढलेली होती हे दिसून येतं. चोखोबांच्या मनाचा क्षोभ स्पष्ट करणारा हा अभंग तत्कालीन स्थितीवर प्रकाश टाकतो.

काही लोक कर्मकांडात गुंतून पडलेले असतात. हातात जपमाळ घेऊन नामस्मरणाचं प्रदर्शन करतात. होमामध्ये तीळ, तांदूळ जाळत बसतात. मंत्रपठणाचं अवडंबर माजवतात. पूजाअर्चेचा देखावा करतात. सोवळ्या-ओवळ्याची पराकाष्ठा करीत राहातात. पोथ्या- पुराणांतले दाखले देतात. पण यांच्या अंतरंगात शुद्ध भक्तीचा दुष्काळच पडलेला असतो. संत कबीरानं मशिदीत मोठ्यानं बांग देणाऱ्या एका मुल्लाला प्रश्न विचारला आहे, 'एवढ्या मोठ्यानं का ओरडतोस ? क्या तेरा अल्ला बहिरा है ? अरे, मुंगीच्या पायातल्या नूपुराचा आवाजही ज्याला ऐकू येतो त्याला इतक्या मोठ्यानं ओरडून सांगण्याची काय गरज आहे ?' एका पुरोहित पंडिताला ते विचारतात, 'लांबलचक माळ हातात घेऊन जपजाप्य करतोस पण परमेश्वर तुझ्या मनातलं कपट जाणू शकतो .' हे आचारांचं सोंग झालं. ब्रह्मज्ञानाच्या व्यर्थ गोष्टी करणाऱ्या दांभिकांच्या मनात दया, क्षमा नाही हे दृश्य चोखोबांना दिसत होतं. म्हणूनच ते क्षुब्ध झाले. धिःक्काराचे शब्द त्यांना उच्चारावे लागले. असले जटाधारी संन्यायी अंती नरकात जातील अशी शापवणी त्यांच्या तोंडून बाहेर पडली. इथं संत तुकारामांच्या जळजळीत शब्दांची आठवण होते. चोखोबांनंतर चार शतकांनी तुकोबा जन्माला आले. त्यांनीही असेच सडेतोड आणि स्पष्ट निषेधाचे शब्द आपल्या अभंगांत योजले आहेत. चोखोबांच्या सात्त्विक संतापाचं दर्शन या काव्यातून होतं आणि त्यांच्याही काव्यात एखाद्या ठिकाणी विद्रोहाच्या ठिगण्या कशा उसळतात हे दिसून येतं. संतांचा संताप हा देखील निर्मितीशील असतो.

●●●

**जन्मला देह पोशिला सुखाचा। काय भरवसा याचा आहे ॥**
**एकलेचि यावे एकलेचि जावे। हेचि अनुभवावे आपणचि ॥**
**कोण हे अवघे सुखाचे सांगाती। अंतकाळी होती पाठीमोरे ॥**
**चोखा म्हणे याचा न धरी भरंवसा। शरण जा सर्वेशा विठोबासी ॥**

सर्वच संतांनी देह नाशवंत आहे म्हणून त्याचा भरवसा धरू नये असं सांगितलं आहे. पण माणूस देहवादीच असतो. शरीर हेच आपल्या सुखाचं महत्त्वाचं माध्यम आहे म्हणून आपण आपल्या देहाची सर्वदृष्टीनं काळजी घेतली पाहिजे असं त्याला वाटतं. शरीराच्या साजशृंगाराकडं आणि त्याच्या भरणपोषणाकडं मनुष्य संपूर्णपणे लक्ष देतो. तऱ्हेतऱ्हेचे सुगंधी साबण आणि उटणी लावून शरीर धुतो. त्याच्यावर उत्तमोत्तम वस्त्राभूषणे घालतो. आपलं शरीर सुंदर दिसावं, ते समर्थ असावं यासाठी तत्परतेनं त्याची सेवासुश्रुषा करतो. यात चुकीचं काही नाही. 'शरीरमाद्यं- खलुधर्मसाधनम् ।' शरीर हे धर्माचं आद्य साधन आहे त्यामुळं ते स्वस्थ आणि स्वच्छ सुंदर ठेवणं सयुक्तिकच आहे. पण ते धर्माचं साधन आहे. साध्य नव्हे. शरीर हे अंतिम सत्य नव्हे. एक दिवस ते निष्प्राण होणार आहे. उपयोगशून्य होणार आहे. शरीर सर्वकाळ साजिरं गोजिरं राहील किंवा ते सदैव सशक्त राहील या भ्रमात राहण्यात अर्थ नाही. अनेक रोग त्याचं शोषण आणि भक्षण करू शकतात. म्हातारपण आणि मरण त्याला विळखा घालू शकतात. शरीर हे नित्याचं नाही. ते पाण्यावर आलेल्या बुडबुड्याप्रमाणं फुटून जाणार आहे. म्हणूनच कालिदासासारखा जीवनवादी कवी देखील 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम् विकृतिर्जीवित मुच्यते बुधै :।' असं म्हणतो. मरण ही शरीराची प्रकृती आहे आणि जीवन ही विकृती आहे असं ज्ञानवंतांनी म्हटलं आहे. म्हणूनच संत चोखोबा म्हणतात, 'काय भरवसा याचा आहे ?' हे अगदी खरं आहे.

संत चोखोबा आपल्या अभंगात म्हणतात, देहाचं पोषण करून त्याला सुख दिलं म्हणून त्याच्यावर विसंबून राहता येत नाही. जो देह आपला आहे तो आपल्याबरोबर येत नाही 'एकलेचि यावे एकलेचि जावे। हेचि अनुभवावे आपणचि ।' अंतकाळी शरीरच काय सुखाचे सोबती सांगातीसुद्धा पाठमोरे होतात. अशा परिस्थितीत शरीरावर श्रद्धा ठेवता येत नाही. विठ्ठलालाच शरण गेलं पाहिजे. तो जवळ असला की मग दुसऱ्या कशाचीही आवश्यकता भासत नाही. कारण तो सर्वेश्वर आहे. विश्वेश्वर आहे. तोच विश्वजीवनाचा केंद्रबिंदू आहे. त्याचा आश्रय

हेच खरं संरक्षण आहे.

विठ्ठलभक्त चोखोबांचा हा विचार त्यांच्या दृष्टीनं तर्कशुद्ध आहे. या अभंगातून त्यांनी देहवादी विचाराची मर्यादा सांगितली आहे. तत्त्वचिंत्तक आणि संत शरीराच्या आहारी जात नाहीत. तुम्ही आम्ही सामान्य माणसं शरीराच्या भोवतीच आशाळभूतपणानं प्रदक्षिणा घालतो. शरीराच्या ठायी असणारा आत्मा मात्र आपल्या खिजगणतीत नसतो. देहाला देवाचं मंदिर म्हटलं आहे. मंदिराला महत्त्व देवामुळं येतं. देवच नसेल तर नुसत्या दगडविटांच्या बांधकामाला मंदिर म्हणता येईल काय ? देव आहे म्हणून ते मंदिर आहे. आपल्या शरीराच्या अणुरेणूत आणि हृदयाच्या देव्हाऱ्यात जो आत्माराम वसत आहे तोच विठ्ठलरूप आहे. त्याला शरण जाणं आणि त्याचं भजन पूजन करणं हे आपलं कर्तव्य आहे. देहाचं मंदिर केव्हातरी कोसळून पडतं. पण आत्माराम मात्र अखंड नांदत असतो. तोच आपल्या आराधनेचा मुख्य विषय असला पाहिजे. हे संत चोखोबांचं प्रतिपादन अत्यंत अर्थपूर्ण आहे. शरीर आणि आत्मा यांच्या वास्तविक स्वरूपाचं वर्णन करणारा हा अभंग चोखोबांच्या चिंतनशीलतेवर प्रकाश टाकतो. असे अभंग वाचकांना जीवनाची दृष्टी देतात. म्हणूनच ते विचारपूर्वक अभ्यासिले पाहिजेत.

प्रत्येक संताच्या मनात आणि जीवनात विठ्ठलभक्तीला सर्वोच्च स्थान असतं. चोखामेळा हे जीवनाचं सूक्ष्म निरीक्षण करणारे विचारवंत होते. सुखदुःखांच्या अनुभवातून आणि चिंतनातून संवदेनशील माणसाला एक प्रकारचं खोल शहाणपण येतं. त्याचं एक विशिष्ट जीवनविषयक तत्त्वज्ञान तयार होतं. जगरहाटी पाहिलेला हा संत जीवनावर भाष्य करतो. ते पारंपरिक स्वरूपाचं आहे. पण त्यात असत्य काहीही नाही. आपला देह हा आपला असत नाही. याची जाणीव प्रत्येकालाच केव्हा ना केव्हा होत असते. जन्मभर देहाला कष्टविणाऱ्या या संताच्या मनात एक दिवस देहाचा भरवसा धरू नये असा विचार येतो. अंतकाळी शरीर आपलं असत नाही. आप्तनातलग, सखेसोबती सगळेच सुखाचे वाटेकरी असतात. आपलं जर काही असेल तर तो विश्वचालक परमेश्वर हाच आपला एकमेव आधार असतो. या विचारात नैराश्य असेल पण त्याबरोबरच वास्तवताही आहे. माणसं दुःखातूनच अंतर्मुखतेकडं वळतात. दुःख मनुष्याला प्रगल्भ बनवतं. चोखामेळा हे पंडित नव्हते. पण ज्ञानेश्वर-नामदेव यासारख्या थोर संतांच्या संगतीत होते. जगण्याच्या धडपडीतून, संघर्षातून ते शिकत गेले.

●●●

**कोण तो सोवळा कोण तो वोवळा । दोहींच्या वेगळा विठ्ठल तो माझा ।।**
**कोणासी विटाळ कशाचा जाहला । मुळींचा संचला सोवळाची ।।**
**पाचांचा विटाळ एकाचिये अंगा । सोवळा तो जगामाजी कोण ।।**
**चोखा म्हणे माझा विठ्ठल सोवळा । अरूपे आगळा विटेवरी ।।**

संत चोखामेळा यांच्या मनात आपण अकुलीन आहोत आपला वर्ण आणि जाती हीन मानली जाते आणि त्यामुळं सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात आपल्याला बहिष्कृत मानलं जातं हे शल्य जन्मभर टोचत राहिलं. माणसासारख्या माणसाची उपेक्षा त्याच्या जातीवरून केली जावी ही एक समाजमनात मूळ धरून बसलेली विकृती आहे यात शंका नाही. चोखोबा हे अत्यंत शुद्धाचरणी असे भागवत धर्मीय संत होते. पंढरीच्या विठ्ठलावर त्यांची नितांत भक्ती होती. निढळाचा घाम गाळून, काबाडकष्ट करीत हा संत आपला आणि आपल्या कुटुंबाचा चरितार्थ कसाबसा चालवीत होता. पण अंतर्यामी विषमतेच्या दुःखानं चोखोबा आणि त्यांचं सारं कुटुंब पोळलेलं होतं. त्यामुळं अनेक अभंगांतून त्यांनी आपलं दुःख व्यक्त करून परमेश्वराकडं न्यायाची मागणी केली आहे. त्यांची कविता हे सातशे वर्षांपूर्वीच्या सामाजिक आणि धार्मिक इतिहासाचं एक साधन आहे. सोवळा-ओवळा, विटाळ वगैरे निरर्थक शब्द त्यावेळी लोकमनात रूढ झाले होते. शूद्राच्या दर्शनानं प्रत्यक्ष ईश्वरालाही विटाळ होतो. यासारखी निर्बुद्धपणाची कल्पना बहुसंख्य लोकांच्या डोक्यात ठाण मांडून होती. संत चोखोबा सोवळे नाहीत. उच्चवर्णीय माणूस मात्र जन्मतःच सोवळा असतो असे लोकभ्रम प्रचलित होते. आपल्या अभंगातून चोखोबा प्रश्न विचारतात.

'कोण सोवळा आणि कोण ओवळा ? माझा विठ्ठल मात्र या सोवळेपणाच्या आणि ओवळेपणाच्या साऱ्या सीमा ओलांडून आपल्या आगळेपणानं श्रेष्ठपणानं उभा आहे. तो मूळचाच सोज्ज्वल आहे. त्याला सोवळ्यात किंवा ओवळ्यात कोणीही बांधू शकत नाही. पंचमहाभूतांचा स्पर्श सर्वांनाच झाला आहे. त्यामुळं जगात सोवळा कोण हा प्रश्न विचारता येईल. विठ्ठलाला या उपाधी लावता येणार नाहीत. कारण तो निर्मळ आणि महन्मंगल आहे.' चोखोबांचा हा युक्तिवाद तर्कशुद्ध आहे. प्रत्येक जीवाच्या ठायी जे देवपण आहे त्यानं प्रत्येक जीव स्वभावतःच सोवळा आहे असं म्हणता येतं. प्रत्येक प्राणिमात्राच्या ठायी ईश्वरत्वाचा अंश आहे हे मान्य केल्यावर विटाळ आणि ओवळेपणा यांचा प्रश्नच उद्भवत नाही. ईश्वराची करणी ही कलंकित किंवा विटाळणारी कशी असू शकेल ? पण सोवळ्या ओवळ्याच्या आणि उच्च-

नीचत्वाच्या अज्ञानी समजुतींची शेकडो जळमटं हजारो वर्षांपासून लोकांच्या डोक्यात खोलवर गेलेली आहेत. ही कोळिष्टकं झटकून टाकण्याचा प्रयत्न अनेक साधूसंतांनी केला. 'भेदाभेदभ्रम अमंगळ' असं तुकोबांनी गर्जून सांगितलं. पण चोखोबाला जी उपेक्षा सहन करावी लागली तीच थोड्याफार अंशानं तुकोबांच्याही पदरात पडली. त्यांनाही तत्कालीन समाज ओवळाच मानीत होता. ज्ञानेश्वरांच्याही वाट्याला हे दुःख आलं होतं. संत चोखामेळा तर जन्मभर या वेदनेच्या चक्रव्यूहात सापडले होते. पण या अभंगातून त्यांनी विचारलेले प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आणि मौलिक आहेत. देव स्वयंभू आणि सोवळा आहे. त्याप्रमाणंच त्यानं निर्माण केलेले सर्व प्राणी सोज्ज्वळच आहेत. विटाळ मानण्याचं कारण नाही. हा या अभंगाचा व्यापक अर्थ चोखोबा आपल्या प्रसादपूर्ण शैलीतून समजावून सांगतात. शुद्धता आणि स्वच्छता जातीपातीवरून किंवा वर्णावरून ठरवता येत नाही. अंतःकरणाचा विकास आणि समतादृष्टीचा प्रभाव म्हणजेच शुद्धता यापेक्षा शुद्धतेचा दुसरा अर्थ करण्याचं कारण नाही. चोखोबा चोख म्हणजे शुद्धच होते.

पंचवीस शतकांपूर्वीची गोष्ट. भ. बुद्ध वनात फिरत असताना तहानेले झाले. कडक उन्हाळ्याचे दिवस होते. दूरवर एक झोपडी त्यांनी पाहिली. तिथं पाणी मिळेल या अपेक्षेनं ते गेले. कोणी स्त्री झोपडीत होती. तिला पाहून बुद्धांनी म्हटलं, 'भद्रे, मला तहान लागली आहे, थोडं पाणी देशील का ?' ती स्त्री लगबगीनं उठली पण खाली मान घालून म्हणाली,

'भदन्त, मी पाणी कशी देऊ ? मी हलक्या जातीची आहे. माझा आपल्याला विटाळ होईल.' तिच्या मुद्रेवर दुःख होतं. बुद्ध हसले आणि म्हणाले, 'मी तुला पाणी मागितलं. जात नव्हे. पाणी हे सत्य आहे. जात ही एक कल्पना आहे.' तिनं आनंदानं बुद्धांना पाणी दिलं. त्यांच्या तर्कशुद्ध बोलण्यानं तिच्या पायातल्या अस्पृश्यतेच्या जाणिवांचे साखळदंड तुटून पडले. आता ती कनिष्ठ नव्हती. माणूस म्हणून तिला माणसांत वावरण्याचा या महान धर्मपुरुषाकडून अधिकार मिळाला होता. पंचवीसशे वर्षापूर्वीची ही कथा आहे. पण आजही जातिव्यवस्थेच्या बेडीत माणसांची मनं अडकून पडली आहेत. बेडी काल्पनिक आहे पण तिच्यामुळं लादलेली गुलामगिरी मात्र खरी आहे. 'कोण सोवळा आणि कोण ओवळा ?' हा चोखोबांचा प्रश्न बिनतोड आहे. पंडितांनाही याचं उत्तर देता येणार नाही. जे चोखोबांना समजत होतं ते पढीक पंडितांना उमगत नव्हतं. अस्पृश्यतेच्या बेड्या पायात वागवीत एका मोठ्या लोकसमूहाला शेकडो वर्षे खुरडत चालावं लागत आहे. कोण सोवळा आणि कोण ओवळा ?

●●●

**पुंडलिकें सुख दाखविले लोका । विठ्ठलनाम नौका तारावया ।।**
**जाय पंढरीसी जाय पंढरीसी । पाहे विठोबासी डोळांभरी ।।**
**अवघा पर्वकाळ तयाचिये पायी । नको आणिके ठायी जाऊ वाया ।।**
**चोखा म्हणे ऐसा लाभ बांधा गाठी । जावोनिया मिठी पायी घाला ।।**

भागवत संप्रदायातल्या सर्व संतकवींची कविता विठ्ठल आणि पंढरी यांच्या भोवती प्रदक्षिणा घालते. विठ्ठलाचं नामस्मरण करावं, त्याच्या गुणसंकीर्तनात आणि भजनात सारं जीवन व्यतीत करावं हीच भक्ताची इच्छा असते. भक्तीमुळं त्यांच्या मनःशक्तीचा आणि जीवनाचा विकास होत गेला असं त्यांच्या चरित्रावरून आढळतं. संत चोखोबांच्या जीवनात विठ्ठलाला मध्यवर्ती स्थान आहे. या कवीची सारी कविता विठ्ठलविषयक भक्तीचाच उत्कट आविष्कार आहे. आपल्या आराध्य दैवताशी बोलावं, आपली सुखदुःखं त्यालाच सांगावीत, त्याच्याशी भांडावं, आपल्यावर होणारे अन्याय त्यालाच सांगावेत यातच चोखोबांचं मन गुंतलेलं होतं. त्यांना पंढरी जिवापाड प्रिय होती कारण त्यांच्या दृष्टीनं पंढरीच्या मातीच्या प्रत्येक कणात तो पांडुरंग त्यांना दिसत होता. पुंडलिकाला त्यांनी कृतज्ञतेनं धन्यवाद दिले आहेत. कारण तो जगजेठी विठ्ठल पुंडलिकाच्या आज्ञेनं पंढरीत थांबला. भक्तीचं आणि सेवेचं श्रेष्ठ प्रतीक म्हणून चोखोबांना पुंडलिक हा आदर्श वाटतो. संसार समुद्रातून तरून जाण्यासाठी विठ्ठल नावाची नौका पुंडलिकानं पाठवली. आणि जगाला एक सुखसाधन मिळवून दिलं असं त्यांचं मत आहे. म्हणून ते सर्वांना उद्देशून म्हणतात, 'जाय पंढरीसी, जाय पंढरीसी । पाहे विठोबासी डोळांभरी ।' विठ्ठल पाहणं म्हणजे दृष्टीचं सार्थक होणं. डोळ्यात भरलेला विठ्ठल हृदयाच्या देव्हाऱ्यात स्थापन करणं म्हणजे जीवन कृतार्थ होणं. विठ्ठलाचं सान्निध्य हीच जीवनाची परिपूर्णता. दुसऱ्या कोणत्या ठिकाणी जाण्यात अर्थ नाही. पंढरी आणि विठ्ठल हीच खरी मुक्तीची रूपं, असं चोखोबांच्या भाविक मनाला वाटत होतं.

या अत्युच्च आणि उत्कट भक्तीमुळं चोखोबा आपली भौतिक दुःखं विसरू शकत होते. खरं तर त्यांचं जीवन अनेक प्रकारच्या आपदाविपदांनी भरलेलं होतं. घरातलं दारिद्र्य समाजातलं बहिष्कृत स्थान, कष्ट करूनही सुखाचे आणि विश्रांतीचे क्षण पदरात पडत नाहीत ही स्थिती. आणि सर्वात मोठं दुर्दैव म्हणजे विठ्ठलाचं दर्शन घ्यायला असलेली बंदी, यामुळं चोखामेळा हे अंतर्यामी सदैव दुःखीच राहिले. पण दुःखात पिचतानाही विठ्ठलाची भक्ती त्यांनी त्रैलोक्याच्या राज्याप्रमाणं आपल्या मनात सांभाळून ठेवली

होती. ही एकमेव तृप्ती सोडली तर बाकीचं सारं आयुष्य वैराण वाळवंटासारखं नीरस होतं. आपल्या अभंगांतून त्यांनी आपल्या दैन्यपूर्ण आयुष्याचं अनेक ठिकाणी चित्र रेखाटलं आहे. पण तरीही आपल्या अनुभवातून ते उपदेश करतात की, 'जावोनिया मिठी पायी घाला।' विठ्ठलाच्या पायाला मिठी घातल्याशिवाय तुमच्या जीवनाला अर्थ येणार नाही. हा विचार ते तीव्रतेनं मांडतात. दृढ श्रद्धा आणि खोल भक्ती यांची विपुल संपत्ती चोखोबांनी आयुष्यात गोळा केली. त्या बळावर त्यांना फाटक्या झोपडीतच स्वर्गीचं वैभव जणू प्राप्त झालं होतं. कारण याच झोपडीत तो पांडुरंग कित्येक वेळा चोखोबांना येऊन भेटला. मंदिरातलं स्थान सोडून चोखामेळ्याची झोपडी जवळ करणारा विठ्ठल लाभल्यानंतर चोखोबांना या सुखापुढं बाकीची सारी सुखं नगण्य वाटली. हीच त्यांच्या भक्तीची नवलाई आहे.

'पाहे विठोबासी डोळांभरी' असं सांगणाऱ्या चोखोबांना डोळांभरून कधी विठोबाला पाहता आलं होतं काय ? याचं उत्तर इतकंच द्यावं लागतं की गावकुसाबाहेरची झोपडी हेच त्यांचं विठ्ठलमंदिर होतं. चोखोबांच्या मनात आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या चित्तात विठ्ठल नांदत होता. आपल्या अंतर्दृष्टीनं विठ्ठलाचं रूप चोखोबा न्याहाळीत होते. सत्याच्या आणखी जवळ जायचं म्हणजे विठ्ठलाच्या ठायी चोखोबा आणि चोखोबांच्या ठायी विठोबा मिसळून गेले होते. पंढरीच्या देवळात विठोबाची मूर्ती होती. पण तो स्वतः या भक्ताच्या मनी-मानसी वस्तीला आला होता. हा भक्तीचा महिमा आहे. चोखामेळ्याच्या भावोत्कट मनःस्थितीचं दर्शन घडवणारा हा अभंग आहे. चोखोबा सतत नामसंकीर्तनात गुंतलेले होते. अशा भक्ताच्या सान्निध्यातच देव राहतो. ज्ञानेश्वरांनी म्हटलं आहे,

जयांचे वाचेपुढां भोजे । नाम नाचत असे माझे ॥
जे जन्मसहस्री वोळगिजे । एकवेळ यावया ॥
तो मी वैकुंठी नसे । वेळु एक भानुबिंबीही न दिसे ॥
वरी योगियांचीही मानसे । उमरडोनि जाय ॥

भक्त आणि योगी यांच्या मनातच परमेश्वराचा निवास असतो. वैकुंठापेक्षाही भक्तांच्या हृदयातलं वास्तव्य त्याला अधिक सुखाचं वाटत असतं. चोखोबांचं समग्र जीवन विठ्ठलमंदिरासारखं पवित्र बनलं होतं. पण या पवित्र माणसाला अस्पृश्यतेच्या दुःखात जन्मभर ठेवणाऱ्या सनातन वर्णव्यवस्थेला काय म्हणावं ? माणसाच्या माणूसपणाची अवहेलना करणारी ही (अ) व्यवस्था आजही अस्तित्वात आहे हे आपलं दुर्दैव आहे.

●●●

दुःखरूप देह दुःखाचा संसार । सुखाचा विचार नाही कोठे ।।
कन्या पुत्र बाळे सुखाचे सांगाती । दुःख होता जाती आपोआप ।।
सोईरे धायरे कवणाचे कवण । अवघा वाटे शीण मना माझ्या ।।
चोखा म्हणे अहो पंढरीनिवासा । सोडवी भवपाशा पासोनिया ।।

मानवी जीवन अनेक प्रकारच्या दुःखांनी आणि संकटांनी भरलेलं आहे. हा संसार खोलवर विचार केला तर अर्थशून्य आणि दुःखमय आहे असाच निष्कर्ष काढावा लागतो. ज्याला आपण सुख मानतो ते बारकाईनं पाहिलं तर क्षुद्र आणि फार लवकर उडून जाणारं असतं. इतक्या क्षुद्र सुखासाठी आयुष्यभर आपण व्यर्थच धावपळ केली ही जाणीव माणसाला होत राहते. याला कुणी अपवाद असेल असं वाटत नाही. सुख म्हणजे मृगजळ. दुरून दिसणारं एक काल्पनिक सुखाचं आकर्षक चित्र. स्वप्नासारखी सुखं पाहता पाहता विरून जातात. उरतं ते दुःख आणि वैफल्य. दुःखासारखा जिवलग दुसरा नाही. संतांनी आणि तत्त्ववेत्त्यांनी सुखदुःखांसंबंधी अशाच आशयाचे विचार व्यक्त केले आहेत. ते वस्तुस्थितीला अनुसरूनच आहेत. संत ज्ञानेश्वर या संबंधात भाष्य करताना म्हणतात, सुखाची वस्त्रं लेवून दुःख माणसाला छळत असतं. तुकोबांनीही 'सुख पाहाता जवापाडे। दुःख पर्वताएवढे ।' असा आपला अभिप्राय आणि अनुभव सांगितला आहे. हे कालच्या जगाचं चित्र आहे असं नव्हे तर आजच्या शास्त्रीय दृष्ट्या प्रगत झालेल्या जगातही हेच दृश्य दिसतं. याचा अर्थ दुःख ही एक विदारक वस्तुस्थिती आहे. संत चोखोबा 'दुःखरूप देह दुःखाचा संसार' असे उद्‌गार का काढतात ? त्यांच्यावर तर दुःखाचं आणि दुर्दैवाचं आभाळ कोसळलेलं होतं. 'सुखाचा विचार नाही कोठे' हीच त्यांची अवस्था होती. म्हणूनच त्यांनी पंढरीनाथाकडं आपल्याला या प्रपंचाच्या जंजाळातून सोडवण्याची विनवणी केली आहे. आपला एक कडवट अनुभव या अभंगातून ते सांगतात,

कन्यापुत्र बाळे सुखाचे सांगाती ।
दुःख होता जाती आपोआप ।।

असं म्हणून आप्तनातलगही आपले नाहीत हे जीवनाचं सार सांगतात.

आजही हा दुःखद अनुभव बहुसंख्य लोकांना येत असतो. ज्यांना आपण स्वजन म्हणतो ते देखील स्वार्थीच असतात. केवळ स्वार्थमूलक जीवनात जवळच्या व्यक्तीदेखील दुरावलेल्या असतात. असल्या सारहीन, स्वार्थमय, प्रेमशून्य आणि

दुःखांनी भरलेल्या प्रपंचातून आपली लवकर सुटका व्हावी अशी संत चोखोबा करुणा भाकतात. हा अभंग वाचताना चोखोबांचा जीवनविषयक दृष्टिकोन निराशावादी आहे असं आपण म्हणू शकत नाही. हे तत्त्वज्ञान कोणाचं तरी ऐकून त्यांनी मांडलेलं नाही. 'Philosophy is the interpretation of our daily experiences' आपल्या दैनंदिन जीवनातल्या अनुभवांचं मनन करून त्यांनी हे तात्पर्य काढलेलं आहे. ते दुःखवादी नव्हते. पण आयुष्याच्या पदरात सारखे दुःखाचे काटे पडल्यानंतर फुलांची गाणी कोणाला तरी कशी सुचतील ? संत चोखोबांचं दुःखी जीवन आता काळाबरोबर वाहून गेलं तरी त्यांनी या अभंगातून व्यक्त केलेले विचार मात्र 'अभंग' आहेत. अटळ दुःखांची वाट माणसाला चालावीच लागते. म्हणूनच त्यानं परमेश्वराचं भक्तीनं, उत्कटतेनं स्मरण केलं पाहिजे. त्या स्मरणातूनच आनंदाची वाट सापडणं शक्य आहे असा या अभंगाचा मला अर्थ जाणवतो.

या अभंगातून जीवनाचा दुःखवादी दृष्टिकोनातून केलेला विचार व्यक्त झाला आहे. संतांच्या वाङ्मयात दुःख आणि निराशा यांचा प्रभाव अधिकांशानं जाणवतो असं मत अनेक समीक्षकांनी व्यक्त केलं आहे. या मतात संपूर्ण सत्य नाही. काही अंशांनी हा विचार मान्य होतो. केवळ संतांनीच नव्हे तर जगातल्या अनेक कवींनी, नाटककारांनी आणि विचारवंतांनी जीवनाच्या दुःखमयतेचं स्वरूप विवरून सांगितलं आहे. चोखामेळ्यानंतर चारशे वर्षांनी तुकाराम याच प्रकारचं मत मांडतात. सुख जवाइतकं आहे आणि दुःख मात्र पर्वताएवढं आहे असं त्यांनी म्हटलं आहे. केशवसुतांसारखा आधुनिक कवी देखील जो वस्तुतः 'देववादी' किंवा 'दैववादी' नव्हता- तो देखील 'आमचा पेला दुःखाचा, डोळे मिटुनी प्यायाचा' असं म्हणून दुःखाचंच गाणं गातो. दुःख व्यापक आहे. सुख मात्र त्या मानानं अल्प आहे. चोखोबांनी प्रकट केलेला विचार त्यांना त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवातून जाणवलेला आहे. त्यामुळं ते विफलतावादी संत होते अशी टीका करण्याचं कारण नाही. उलट त्यांनी प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष केला. अस्पृश्यतेचं जीवघेणं दुःख जन्मभर त्यांना चटके देत राहिलं. पण त्यातूनही त्यांनी भक्तीची कविता लिहिली. संतांच्या मालिकेत स्थान मिळवलं. चोखामेळा हे वास्तवाचं चित्र रेखाटणारे कवी आहेत इतकाच निष्कर्ष या अभंगावरून काढता येईल. संसारपाशातून सोडवण्याची त्यांनी विठ्ठलाकडं विनंती केली आहे.

●●●

**असोनि नसणे संसाराचे ठाई। हाचि बोध पाही मना घ्यावा ॥**
**संतांची संगती नामाची आवडी। रिकामी अर्ध घडी जावी नेदी ॥**
**काम क्रोध सुने परी करी दूर। सहपरिवारी दवडी वाया ॥**
**चोखा म्हणे सुख आपोआप घरा। नाहीतर फजीतखोरा जासी वाया ॥**

संत चोखोबा आपला संसारासंबंधीचा आणि जीवनाविषयीचा दृष्टिकोन इथं विवरून सांगत आहेत. संसार तर करावा पण त्याच्यात गुरफटून जाऊ नये. एक दृष्टांत नेहमी घेण्यात येतो. कमळाच्या पानावरील पाण्याच्या थेंबाप्रमाणं माणसानं प्रपंचात असावं. पाण्याचा थेंब कमलपत्रावर असला तरी तो त्या पानापासून अलिप्तच असतो. अशी अलिप्तता संसारात राहिली पाहिजे हे चोखोबांचं म्हणणं एका दृष्टीनं अगदी सयुक्तिक आहे. प्रपंचाविषयी खोल आसक्ती मनात निर्माण झाली की मनुष्य सर्व बाजूंनी त्या प्रपंचाच्या डोहात फसत जातो. जंजाळात अडकून पडतो. आपलं स्वातंत्र्य आणि सुख हरवून बसतो. जो प्रपंच त्याला सुखाचं साधन वाटत होता तोच नाना प्रकारच्या दुःखांचं कारण होऊन बसतो. जाळ्यात सापडलेला मासा कितीही धडपड केली तरी जाळं तोडू शकत नाही. त्याप्रमाणंच संसाराच्या मायाजालात माणूसरूपी मासळी कायमची अडकून पडते. हा अनुभव सार्वत्रिक आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत आणि पुढेही अनंत काळपर्यंत या अनुभवाचा फास माणसाच्या गळ्याला लागणारच आहे. चोखोबांचा यावरचा उपाय त्यांच्याच शब्दांत सांगतो.

संतांची संगती नामाची आवडी। रिकामी अर्धगडी जावी नेदी संतांचा सहवास आणि विठ्ठलाचं नामस्मरण यात जर आपल्याला यात अखंड रस घेता आला तर सुखाचा शोध करता येईल. नाहीतर मात्र दुःखाशिवाय दुसरा पर्याय नाही. संसारातलं सुख संसाराच्या नव्हे तर संतांच्या सान्निध्यात मिळतं. ईश्वर, नामाच्या उच्चारात आणि चिंतनात मिळतं. दुर्जनांच्या संगतीनं जर माणूस दुष्प्रवृत्त होतो तर संतांचा सहवास त्याला सत्प्रवृत्त का करणार नाही ? मातीवर फुलं पडली तर माती देखील सुवासिक होते. संतांच्या सोबतीत मनातले वाईट विचार हळूहळू वितळून जातात.

'आपणासारिखे करिती तात्काळ' हा साधूंचा प्रभाव असतो. चोखोबा आणखी म्हणतात, काम आणि क्रोधरूपी कुत्री मनातून हाकलून द्या. त्यांच्या भुंकण्यामुळंच जीवनातली शांती नष्ट होते. नाना प्रकारच्या इच्छांचं मोहोळ आपल्या मनात वर्षानुवर्षं लागलेलं असतं. काम आणि क्रोध यांची विनाशक शक्ती भयंकर असते हे इतिहासावरून आपल्याला कळतं. फार काय आपल्याही हातून घडलेले

प्रमाद कामक्रोधांच्या आहारी गेल्यामुळं झालेले असतात. संयम सुटला की शांती नष्ट होते. गीतेतला एक प्रसिद्ध श्लोक इथं उद्धृत करायला हरकत नाही.

काम एष क्रोध एष रजोगुणसमुदभव : ।
महाशनो महापाप्मा विद्ध्येनं इह वैरिणम् ॥

काम आणि क्रोध हे मनुष्याचे सर्वात भयानक शत्रू आहेत. तेच त्याला पापाकडं प्रवृत्त करतात. या कामक्रोधाला दूर ठेवल्यावर 'चोखा म्हणे, सुख आपोआप घरा' विकारावर नियंत्रण ठेवणं हाच वास्तविक सुखाचा मार्ग आहे असं सर्व संतांनी निश्चयपूर्वक सांगितलं आहे. संसाराच्या सागरात बुडायचं नसेल तर त्यात राहूनही त्याच्यापासून अलिप्त राहण्याची कुशलता असली पाहिजे. येणारी प्रत्येक लाट कशी अडवावी त्यासाठी मानसिक सामर्थ्य आणि शांती, संयम, सावधपणा कसा ठेवावा हे साधुसंतांच्या उदाहारणावरून शिकलं पाहिजे. एक महत्त्वाच्या जीवनविचार चोखोबांनी इथं सांगितला आहे.

कामक्रोधाच्या दुष्परिणामावर या अभंगातलं भाष्य अधिक महत्त्वाचं आहे. त्यांना कुत्र्यांची उपमा चोखोबांनी दिली आहे. प्राचीन काळापासून अगदी या क्षणापर्यंत कामक्रोधांनी जगाच्या जीवनात प्रचंड धुमाकूळ घातला आहे. हिंसा, रक्तपात व जाळपोळ यांचं तांडवनृत्य याच दुष्प्रवृत्तीमुळं चालू आहे. इतिहासात याची अनेक उदाहरणं सापडतील. 'काम' या शब्दाचा अर्थ दुरन्त इच्छा. मग ही इच्छा सत्तेची, संपत्तीची अथवा इंद्रियसुखांची असेल. या दुर्निवार वासनांच्या सावटाखाली माणूस आपली मानसिक शांती हरवून बसतो.महाभारतातलं ययातीचं उदाहरण सर्वप्रसिद्ध आहे. त्याच्या संदर्भात म्हटलं गेलं, 'न जातु काम : कामानाम् उपभोगेन शाम्यति' उपभोगानं वासना शमत नाही. क्रोधाची ज्वाला भडकली की तिच्यात साऱ्या उत्तम मूल्यांची राखरांगोळी होऊन जाते. संत चोखोबा यांनी कामक्रोधाला कुत्री म्हटलं असलं तरी ही पिसाळलेली कुत्री आहेत. ती पाठलाग करून माणसांचा बळी घेतात. यातला उपदेश नवीन नाही. पण तो माणसाला मार्गदर्शक होणारा आहे. संत नवीन सांगत नाहीत. पण जुन्या झालेल्या, विस्मृतीत गेलेल्या विचारांची नव्यानं आठवण करून देतात. तुकारामांचं एक वचन इथं आठवतं.

आम्ही वैकुंठवासी । आलो याचि कारणासाठी ॥
बोलिले जे ऋषी । साच भावे वर्ताविया ॥
झाडू संतांचे मारग । आडरानी भरले जग ॥

संत चोखामेळा यांची हीच भूमिका आहे.

●●●

**जिकडे पाहे तिकडे बांधलोसे हरी । सुटायाचा करी बहु यत्न ।।**
**परि ते वर्म मज न कळे काही । अधिकाचि डोहीं बुडतसे ।।**
**एकापुढे एक पडती आघात । सारिता न सरत काय करू ।।**
**चोखा म्हणे येथे न चलेचि काही । धावे माझे आई विठाबाई ।।**

संत चोखोबांचं जीवन काट्याकुट्यांनी आणि खाचखळग्यांनी भरलेलं होतं. समाजाच्या उपेक्षित स्तरातला हा विठ्ठलभक्त नानाविध संकटांना तोंड देत होता. आघात सहन करीत होता. या संताचं मन अत्यंत संवदेनशील होतं. त्यामुळंच त्याची भक्ती आणि कवित्वशक्ती उत्कट होती. पण अशा मनाची माणसं दुःख आणि अपमान यांनी घायाळ होतात. आपल्याच कपाळी हा दुःखाचा जळता लेख परमेश्वरानं का लिहावा हा प्रश्न त्यांना सतत अस्वस्थ करतो. संत चोखोबांनी हा प्रश्न आपल्या अभंगांतून पुन्हा पुन्हा विचारला आहे. पण त्याचं उत्तर त्यांना मिळालेलं नाही. आयुष्यातले पुष्कळसे प्रश्न निरुत्तर करणारे असतात. हाच अनुभव त्यांना आला. भक्तीच्या वाटेनं गेलो तर परमेश्वर आपल्याला सुख शांती देईल हा विश्वास त्यांच्या मनात असतो. म्हणूनच आपल्या अभंगांतून चोखोबा म्हणतात, ' येथे न चलेचि काही । धावे माझे आई विठाबाई ।।' कोणत्याही प्रश्नाचं भक्ताच्या दृष्टीनं अंतिम उत्तर 'परमेश्वर' हेच आहे. त्याचा अनन्य भावानं चोखोबा धावा करतात. सुखाचे फारच थोडे क्षण त्यांच्या पदरात पडले. दुःखांचे आघात मात्र नको तितके सोसावे लागले. एकामागून एक प्रहार सहन करणं हेच तर जीवनाचं स्वरूप आहे. प्रहार का होतात हे कोडं शेवटपर्यंत उलगडत नाही. रात्रंदिवस विठ्ठल नामाचा गजर करणाऱ्या या कष्टकरी अतिसज्जन व्यक्तीच्या अंगावर बांधत असलेली भिंत कोसळावी आणि त्याखाली चोखोबा गाडले जावेत हा दुर्दैवाचा भोग त्यांचा वाट्याला का आला या प्रश्नाचं उत्तर कोण देऊ शकणार ? जे पदरात पडलं ते निमूटपणानं स्वीकारण्याशिवाय गत्यंतर नसतं. नियती आणि परमेश्वर यांच्या खेळांचं उत्तर अवतारी पुरुषांना देखील सापडलं नाही तिथं गावकुसाबाहेरचं दीनवाणं जिणं जगणाऱ्या या संताला हे उत्तर कसं सापडणार ?

चोखोबा म्हणतात, 'जिकडं पाहावं तिकडं मी बांधला गेलो आहे यातून सुटण्याची सारखी धडपड करीत आहे. पण दुःखवेदनेच्या डोहात आणखी खोल बुडत चालली आहे. आघातामागून आघात झेलावे लागत आहेत. मला यश मिळणं शक्य नाही. आता विठाई माऊलीची करुणा भाकतो. तीच मला संकटमुक्त करू

शकेल.' संत चोखोबांना एवढा एकच आधार उरलेला होता. त्याच्यावर ते विसंबून होते. हा अभंग म्हणजे चोखोबांच्या आंतरिक वेदनेचा उत्कट उद्गार आहे. त्यामुळंच हे काव्य तुमच्या आमच्या अंतःकरणाला तीव्रपणानं भिडतं, दंश करतं.आपल्याही जीवनात असेच काटेकुटे आणि अंधारानं भरलेल्या दऱ्याखोऱ्या असतात. त्यामुळं चोखोबांची कविता ही आपल्याही दुःखाचं दर्शन घडवते. आपण देखील काहीवेळा व्याकुळ होऊन देवाला प्रश्न विचारतो,

'हे देवाधिदेवा, किती अंत पाहणार आहेस ? माझ्याच फाटक्या झोळीत इतके दुर्दैवाचे काटे का टाकतोस ? एखादं सुवासिक पान किंवा फूल टाकलं असतंस तर सुखाचा निःश्वास सोडला असता' चोखोबांची ही कविता जितकी त्यांच्या आयुष्याचं चित्र रंगवणारी आहे. तितकंच आपल्याही जीवनाचं पुनर्दर्शन घडवणारी आहे. चांगली कविता ही प्रातिनिधिक असते. संतांची कविता बहुसंख्य लोकांना आवडते. याचं कारण तिचं आवाहन प्रत्येकाला पोहोचू शकतं. चोखोबांच्या शब्दात आपणही म्हणू-

धावे माझे आई विठाबाई।

संत चोखामेळा हे नियतिवादी आणि ईश्वरवादी होते. विठ्ठल हे त्यांचं अंतिम असं केंद्र होतं. या दैवताला शरण जाणं, त्याच्यासमोर आपली दुःखाची कहाणी पुन्हा पुन्हा सांगणं यापलीकडं त्यांना मार्ग नव्हता. दुर्दैवाच्या फेऱ्यात जन्मापासून सापडलेला हा देवभक्त जसजसा सुटण्याचा प्रयत्न करीत होता तसतसा तो प्रपंचातल्या अनेक आपत्तींच्या डोहात गटंगळ्या खात होता. पण या भक्ताची तक्रार केवळ भौतिक स्वरूपाची नाही. अध्यात्माच्या वाटेवरून चालण्याचा प्रयत्न करणाऱ्या या विठ्ठलाच्या अनुयायाला आध्यात्मिक समाधान मिळत नव्हतं. माणसाला तीन प्रकारची दुःखं सहन करावी लागतात. आधिभौतिक, आधिदैविक, आणि आध्यात्मिक. हे त्रिविध ताप आहेत. तिसरा आध्यात्मिक स्वरूपाचा ताप हा चिंतनशील संत सज्जनांच्या वाट्याला येतो. चोखोबांना ईश्वरी दर्शनाचा आनंद मिळवायचा होता. त्यासाठी ते दिनरात्र तळमळत होते. पण परमेश्वराचा साक्षात्कार त्यांना होत नव्हता. आघातावर आघात सहन करणाऱ्या या संतांनं 'धावे माझे आई विठाबाई' असा आर्त हंबरडा फोडला आहे. देवस्वरूपीचा प्रकाश शोधण्यासाठी अनंत अंधारातून आणि खाचखळग्यांतून भ्रमण करावं लागतं. चोखोबा त्या देवाला शोधण्यासाठी हिंडत होते. आणि देव हुलकावण्या देत होता. त्याच्या भेटीसाठी केलेलं आक्रंदन म्हणजे हा आर्त अभंग आहे.

●●●

**येथे तो संग आहे दुर्जनांचा । म्हणोनी शीण त्याचा होत आहे ।।**
**यातीचा प्रकार अमंगळ खाणार । मद्य मांस आहार करिताती ।।**
**मुखे ते वाईट बोलती कश्मळ । तेणे हळहळ जीव करी ।।**
**चोखा म्हणे ऐसा पडिलो काचणी । सोसू हे जाचणी कोठवर ।।**

संत सज्जनांना दुर्जनांनी केलेला छळ सोसावा लागतो. खरं तर संत कोणालाही उपद्रव देत नाहीत. ते आपल्या सरळ वाटेनं, सरळ मनानं चालत असतात. आपल्या चालण्यानं देखील कोणाला पीडा होऊ नये याची ते दक्षता घेतात. शांती आणि प्रेम संतांचे गुणधर्म असतात. पण त्यांनाही दुर्जनांच्या छळ कपटाला तोंड द्यावं लागतं. राम आणि सीता यांच्या उज्ज्वल जीवनावर चिखल उडवण्याचा अधिकार एका दुष्ट प्रवृत्तीच्या माणसानं आपल्याकडं घेतला. आणि त्याचा परिणाम रामसीतेचं जीवन पुन्हा दुःखानं भरून गेलं. एका प्रसिद्ध संस्कृत श्लोकात कवीनं म्हटलं आहे, 'हरिणं, मासे आणि सज्जन व्यक्ती यांना शिकारी, धीवर आणि दुर्जन अकारण छळतात.' सज्जन असणं हाच दुर्जनांच्या दृष्टीनं अपराध असतो. सद्गुणाचा प्रकाश दुर्गुणी व्यक्तींना सहन होत नाही. संतांच्या ललाटी परमेश्वरानं दुर्जनाकडून होणारा असह्य छळ जणू काही कायमचा लिहून ठेवला आहे. ज्ञानेश्वर, तुकारामांना, नामदेव, एकनाथांना या अग्निदिव्यातून जावं लागलं. देवाचं नाव घेणाऱ्या संताला दुष्ट दैत्यानं पीडा द्यावी ही परंपरा संत चोखोबांनाही मान्य करावी लागली. या अभंगात ते अगतिकतेनं म्हणतात

'येथे तो संग आहे दुर्जनांचा । म्हणौनि शीण त्याचा होत आहे ।'

चोखोबांच्या भोवती दुष्प्रवृत्तीच्या लोकांचा वेढा पडला होता. त्यांच्या भोवतालचे लोक मद्य आणि मांस सेवन करीत होते. त्यांचा आहार-विहार अमंगल, तामसी होता. वाणी अमंगळ होती. या दुर्गंधी वातावरणात चोखोबासारख्या संत सज्जनाचा विचित्र कोंडमारा सारखा होत होता. आजूबाजूचं वातावरण भक्तीला, भजन-कीर्तनाला, नामस्मरणाला सर्वस्वी प्रतिकूल होतं. पण चोखोबांच्या विठ्ठलभक्तीत त्यामुळं कधी खंड पडला नाही. सभोवतालच्या दुर्गंधीचा प्रतिकार त्यांच्या हृदयातल्या भक्तीचा सुगंध सतत करीत राहिला.

संत चोखामेळा सर्वस्वी प्रतिकूल वातावरणातही आपल्या देवभक्तीनं, प्रेमशक्तीनं आणि शांत वृत्तीनं विठ्ठलाची आराधना करीत होते. शेजारच्या झोपडीत दारू प्यालेल्यांची शिवीगाळ चालू असली तरी चोखोबांच्या झोपडीत मात्र विठ्ठल

नामाची ओवी आणि अभंग यांचं उत्कट गायन चालू असायचं, शिवीला ओवीनं उत्तर देता येतं, हेच संतांनी दाखवून दिलं. चोखोबांना या वातावरणाची खंत वाटायची. दुर्जनांचा जाच कुठवर सहन करायचा असा प्रश्न ते विठ्ठलाला विचारतात. कधी निराश होतात, पण आपल्या आजूबाजूचं वातावरण विठ्ठलनामानं सत्त्वसुंदर करण्याचा ते प्रयत्न करीत राहातात, दुर्गंध वाढला म्हणून हताश होणारा किंवा त्या दुर्गंधाचंच स्वागत करणारा भित्रा आणि पलायनवादी असतो. संत चोखोबा आपल्या अंतःकरणातल्या भावसुगंधानं त्या दूषित वातावरणाशी झुंज देत राहिले. हेच त्यांचं खरं संतत्त्व आणि श्रेष्ठत्व आहे. ज्याच्या हृदयात विठ्ठलाची मूर्ती आहे, ज्याच्या शब्दात अमृताची रुची आहे त्यानं विफल होण्याचं कारण नाही. परिस्थिती बदलण्याची शक्ती संतांच्या मनात असते. हळूहळू आजूबाजूचं वातावरण आपल्या श्वासोच्छ्वासानं ते बदलू शकतात. येशू ख्रिस्ताला शिव्याशाप देणारं आणि त्याचा प्राणांतिक छळ करणारं वातावरण ख्रिस्ताच्या प्रेमदृष्टीनं, क्षमाशीलतेनं बदलून गेलं. हाच चमत्कार ज्ञानेश्वरांच्या जीवनातही घडला. संत चोखामेळाही लोकांनी केलेल्या निंदानालस्तीचं विष पिऊन जगाला मात्र आपल्या अंतकरणातलं अमृत देत राहिले. हीच खरी विठ्ठलभक्ती ! हेच खरं वारकरी पंथाचं कार्य ! प्रेमाची आणि नामाची पताका खांद्यावर घेऊन निघालेला चोखामेळा नावाचा संत आपल्या अभंगातून आणि जीवनातून भक्तीचा आणि शांतीचा संदेश देतो.

संत आजूबाजूचं वातावरण बदलण्याचा प्रयत्न करीत राहतो. चोखोबा गावाबाहेरच्या कंगाल झोपडपट्टीत राहात होते. त्यांचे शेजारी-पाजारी दारू पिणारे, शिवीगाळीत रस घेणारे, निंदा-नालस्ती करणारे अनेक दुर्गुणांनी वेढलेले होते. चोखोबांच्या झोपडीत मात्र सत्प्रवृत्तीचा नंदादीप तेवत होता. एकतारीवर भक्तीचं गीत गायिलं जात होतं. विठ्ठलाचं नामस्मरण केलं जात होतं. पण सभोवतालचा अपवित्र परिसर कसा सुधारायचा हा प्रश्न होता. या विठ्ठलभक्ताची लोक टवाळी करीत होते. पण जगाचे आघात सहन करणारे चोखोबा त्या लोकांना शांतीनं आणि प्रेमानं समजावून सांगत होते. कधीकधी हे सारं असह्य व्हायचं. पण तरीही हे सोसण्यासाठी बळ मिळावं म्हणून विठ्ठलाला साकडं घालीत होते. अवघं आयुष्यच इथून तिथून फाटलेलं त्याला टाके तरी कुठं आणि किती घालणार ? आयुष्याची ही घुसमट त्यांनी विठ्ठलनाम जवळ होतं म्हणूनच सहन केली. अशा वातावरणातही त्यांची कविता फुलत होती. हा एक चमत्कार आहे. आपल्या काव्यफुलांची माला गुंफून या संतानं ती विठ्ठलाला आणि मराठी भाषेला अर्पण केली. तिचा गंध अजून ताजा आहे हे विशेष.

●●●

**जे मन गांजले विषयाचे पोखे । ते केले पारखे कृपादृष्टी ।।**
**काम आणि क्रोध हे जीवे मारिले । दंभ मान केले दूर देशी ।।**
**आशा आणि ममता दवडिली चिंता । नाही भय आता संसाराचे ।।**
**चोखा म्हणे अवघा संदेह फिटला । उपकार हा केला नामयाने ।।**

संतत्वाच्या अत्युच्च पायरीपर्यंत पोहोचण्याचा मार्ग खडतर असतो. भगवे कपडे घातले की आपण संत झालो हा भ्रम कित्येकांच्या डोक्यात भरलेला असतो. तुकोबांनी अशा तथाकथित जोग्याबैराग्यांची आपल्या अभंगातून मार्मिक चेष्टा केली आहे. भोळ्या भाविकांचा मेळावा आपल्याभोवती युक्ती प्रयुक्तीनं जमा करायचा आणि आपलं माहात्म्य वाढवीत बसायचं हा कित्येकांना छंद असतो. वस्त्रानं किंवा पात्रानं, टाळ मृदंगानं किंवा केवळ पाठांतरामुळं,गळ्यात रुद्राक्षांच्या माळा घातल्यानं संत होता आलं असतं तर तुकोबा म्हणतात त्याप्रमाणं – 'घरोघरी जाले जोगी' अशी अवस्था आली असती. संतत्वाचा संबंध कोणत्याही बाह्य उपाधीशी नाही. जपमाळेशी नाही. पायघोळ कफनीशी नाही. फार काय पांडित्याशीही नाही. संतत्वाचा साक्षात् संबंध प्रेममय हृदयाशी आहे. ज्याचं मन विशाल असतं आणि जो साऱ्या विश्वावर प्रेम करू शकतो तोच संतत्वाच्या पायरीवर उभा राहू शकतो. कर्मकांड केलं, होमहवन आणि जपजाप्य यात गुरफटून गेला म्हणून संत होता येत नाही. सर्व जीवांविषयी ममत्व आणि समत्व जो आपल्या चित्तात ठेवतो तोच संत असतो. तुकोबांनी संताची व्याख्या अत्यंत मार्मिकपणे केली आहे. ते म्हणतात,

'देव रोकडा सज्जनी' 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारे' 'तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात ।' 'संतांचिये गावी नाही दुःखलेश'

या शब्दांतून संतत्वाची सारी लक्षणं त्यांनी स्पष्ट केली आहेत. संत चोखोबांनीही या अभंगातून आपल्या व्यक्तित्वाची घडण कशी होत गेली यावर प्रकाश टाकला आहे. त्यांनी म्हटलं आहे,

'माझं मन विषयानं गांजलेलं होतं. तुझ्या कृपादृष्टीनं ते विषयापासून दूर नेलं. दंभ आणि अहंकार मी दूरदेशी धाडून दिला. काम आणि क्रोध समूळ नष्ट केले. कोणतीही आशा किंवा लोभ मनात ठेवला नाही. आता मला या संसाराचं भय वाटत नाही. सारे संशय फिटून गेले. सारे भ्रम वितळून गेले. आता विठ्ठला तूच माझ्या मनाला आणि जीवनाला व्यापून उरला आहेस. आता मी निश्चिंत आहे.' संतत्वाच्या

पदवीपर्यंत येण्यासाठी दीर्घ आणि दृढ तपश्चर्या करावी लागते. दांभिकता, काम आणि क्रोध, मोह आणि लोभ, अहंकार आणि वासना या साऱ्या शत्रूंशी निर्धारानं लढावं लागतं. निरिच्छ आणि निरहंकारी बनणं ही सर्वात कठीण गोष्ट आहे. हजारो वर्षांच्या तपस्येनंतरसुद्धा विश्वमित्राला काम, मोह जिंकता आला नाही. पण चोखोबासारखा निढळाच्या कामावर जगणारा एक निष्ठावंत विठ्ठलभक्त आपल्या मनात रुजून बसलेली वासनाविकारांची सारी मुळं बलिष्ठ हातांनी उपटून टाकतो आणि 'नाही भय आता संसाराचे' असं आत्मविश्वासानं म्हणतो. हेच त्याच्या संतत्वाच्या विकासाचं खरं दर्शन आहे. चोखोबा कोणत्या जातीचे होते ?, ते किती शास्त्रं पढलेले होते ? हे सगळे तपशील अत्यंत क्षुद्र आणि निरर्थक आहेत. पांडुरंगाच्या भक्तीतून स्वतःला घडवीत गेलेला हा भक्त श्रेष्ठ संतांच्या मालिकेत स्थान मिळवू शकला. भक्तीतूनच ज्ञानाची आणि साधुत्वाची वाट त्यांना सापडली. शुद्ध आणि स्वच्छ मनाचे चोखोबा म्हणजे जीवनसामर्थ्याचं एक तेजस्वी प्रतीक आहे यात शंका नाही. संत चोखोबांचा हा अभंग त्यांच्या चरित्रावर आणि चारित्र्यावर स्पष्ट प्रकाश टाकतो. इतर अभंगात चोखोबांच्या दुःखवेदनांचं प्रतिबिंब आहे. पण हा अभंग त्यांच्या निर्भेळ सुखाचं आणि तपःसामर्थ्याचं प्रत्ययकारी दर्शन घडवतो.

'काम आणि क्रोध हे जीवे मारिले, दंभ मान केले दूरदेशी' संत होण्याच्या प्रवासात अत्यंत दुस्तर आणि दुःखदायक खाचखळगे हेच असतात. गीतेतही या दुर्गुणांमुळं साधकाचा नाश होतो असं म्हटलं आहे. काम, क्रोध, अहंकार आणि दंभ हे राक्षस आहेत. त्यांनी मोठमोठ्या पंडितांना आणि तपस्व्यांना गिळून टाकलं आहे. या राक्षसांना जो जिंकतो तो संतपणाच्या व देवपणाच्या उंच आसनावर अधिष्ठित होतो. मात्र या राक्षसांबरोबर जन्मभर लढावं लागतं. ते नाहीसे झाले असं वाटतं पण पुन्हा ते प्रकट होतात. चोखोबांसारखा गावकुसाबाहेरच्या झोपडीतला एक बहिष्कृत मानला गेलेला विठ्ठलभक्त या लढाईत विजयी होतो आणि आपलं चारित्र्य घडवतो हे अभिमानास्पद आहे. संत नामदेवांसारख्या मार्गदर्शकानं दाखवलेल्या मार्गानं चोखोबा धीरानं, नेटानं चालत राहिले आणि अखेर विठ्ठलाच्या गावी पोहाचले. याची कथा म्हणजे हा अभंग आहे. अंतरीचा दिवा वाऱ्या वादळांतही विझू न देता चालत राहण्याची तपश्चर्या चोखोबांनी केली. शूद्राच्या आत्मिक प्रगतीची ही विजयगाथा स्वतःला उच्चवर्णीय समजणाऱ्या लोकांनी ध्यानात ठेवावी.

●●●

**न म्हणे याति कुळ। शुचि अथवा चांडाळ ॥**
**कशी प्रीत आवडीची। पोहे भक्षी कोरडेच ॥**
**खावोनिया भाजीपान। घाली दुर्वासा भोजन ॥**
**पहा विदुराच्या कण्या। आवडल्या माझ्या धन्या ॥**
**चोखा म्हणे जनीच्या घरी। दळू लागतो श्रीहरी ॥**

माणसाच्या मनात भेदभाव असतो. हा उच्च, हा कनिष्ठ. हा उत्तम कुळीचा, हा हलक्या जातीतला. याच्याशी संबंध ठेवावा पण त्याच्याशी मुळीच ठेवू नये. असले अनेक भेदभाव माणसानं आपल्या डोक्यात अज्ञानानं ठेवलेले असतात. जात, वंश आणि वर्ण ही माणसाच्या योग्यतेची मोजमापं नव्हेत. वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीतले कित्येक लोक अज्ञानाचे आणि अयोग्यतेचे मूर्तिमंत अवतार असतात. आणि ज्यांना कनिष्ठ मानलं गेलं अशा कित्येक व्यक्तींनी ज्ञानाची, कर्तृत्वाची अत्युच्च शिखरं पादाक्रांत केली आहेत. इतिहासाची पानं चाळताना कुळ, जाति, वर्ण या गोष्टी किती निरर्थक आहेत हे लक्षात येतं. शूद्र म्हणून ज्याची कविता परंपरावाद्यांनी इंद्रायणी नदीत बुडवली तो तुकाराम आपल्या प्रतिभेनं मराठी साहित्यमंदिराचा कळस होऊन बसला. जात आणि कुळ यांचा कर्तृत्वाशी अर्थाअर्थी कसलाही संबंध नाही. पण जातीच्या भांडवलावरच उच्चत्वाचा आविर्भाव करणाऱ्या लोकांना हा तर्कवाद पिढ्यान् पिढ्या पटला नाही. आता परिस्थितीत बदल झाला आहे. संत चोखामेळा आज असते तर त्यांचा सातशे वर्षांपूर्वी झाला तसा भावनिक कोंडमारा झाला नसता. आज विठ्ठलाचं दर्शन प्रत्येक भक्ताला सहज मिळू शकतं. देवाची भेट भक्ताला मिळावी हा नैसर्गिक न्याय आज प्रस्थापित झाला आहे. पण सात शतकांपूर्वी जात आणि कुळ याचं अवास्तव, अतिरेकी स्तोम माजलेलं होतं. संत चोखोबांनी या अभंगात परमेश्वराच्या समतावादी उदार वृत्तीचं वर्णन केलं आहे. त्यांनी श्रीहरीच्या चरित्रातली काही उदाहरणं देऊन ईश्वराच्या विशाल अंतःकरणाची प्रशस्ती केली आहे. ते म्हणतात,

'हा श्रीहरी विदुराच्या कण्या खातो. जनाबाईच्या घरी जाऊन तिच्याबरोबर दळणकांडण करतो. भाजीचं पान खाऊन दुर्वासाला आकंठ भोजन देतो. सुदाम्याचे पोहे आनंदानं खाऊ लागतो. याति आणि कुळ, शुचिमान आणि चांडाळ असला कोणताही भेद त्याच्या चित्तात अल्पांशानंही नाही.' तो सर्वांचा आहे. सर्वांच्या जीवनात तो मिसळून गेला आहे. त्याच्या हिशेबी कोणी उच्च वा नीच नाही. सर्वांची

पातळी समान आहे.

चोखोबांना हा परमेश्वर आनंद देतो. समतेचं आणि ममतेचं हे आदर्श प्रतीक म्हणून ते त्याच्याकडं पाहातात. आजूबाजूच्या जगानं जरी अस्पृश्य म्हणून चोखोबांना दूर उभं केलं असलं तरी तो विठ्ठल सर्वांकडेच साम्यभावानं पाहतो. याचा विलक्षण आनंद त्यांना झालेला आहे. माझा श्रीहरी असा अत्यंत भावपूर्ण उल्लेख ते विठ्ठलाचा करतात. विषमतेच्या वातावरणात परमेश्वर आपल्या पाठीशी उभा आहे ही जाणीव त्यांच्या कवितेतून अनेक स्थळी प्रकट झाली आहे. परमेश्वरानं प्रेमानं माणूस निर्माण केला. पण माणसानं अज्ञानानं जात आणि वर्ण यांच्या भिंती बांधून माणूस माणसापासून विभक्त केला. याचं दुःख जेवढं संतांच्या मनाला होतं तेवढं साधारण माणसाला जाणवत नाही. चोखोबांच्या काव्यात समता आणि ममता, बंधुभाव आणि एकता या तत्त्वासाठी त्यांनी केलेलं आक्रंदन आहे. हे तीव्र सूर त्यांच्या अभंगांतून प्रामुख्यानं उमटले. या अभंगातही विषमतावादी माणसाच्या अन्यायापेक्षा परमेश्वरी न्याय किती उदार आहे याचं त्यांनी वर्णन केलं आहे. सुदाम्याचे कोरडे पोहे आणि द्रौपदीच्या थाळीतलं भाजीचं पान मिटक्या मारीत खाणारा भगवान जनाबाईसारख्या दासीबरोबर दळण दळू शकतो. हे सांगून संत चोखोबांनी आपल्या दुःखावर हळुवार फुंकर घातली आहे. हे काव्य जितकं देवाचं आहे तितकंच ते चोखोबांच्या सुखदुःखांचं गाणं गाणारं आहे.

आपल्या व्यथा वेदनेचं आणि भक्ती तृप्तीचं भावमय गाणं गाण्यात कवी चोखामेळा रंगून गेला आहे. श्रीकृष्ण सुदाम्याचे पोहे अत्यंत आवडीनं खातो. विदुराच्या कण्याही पुन्हा पुन्हा ओरपतो आणि जनीच्या दळणाला मदत करतो. या पुराणकथांची हृदयस्पर्शी आठवण या कवीला होते. त्यामुळं त्याच्या दुःखाचे कढ शांत होतात. अरे, आपण समजतो तसा हा परमेश्वर कठोर नाही. तो भक्तीसमोर नम्र होतो. भक्ताच्या पुढ्यात आपले बाहू पसरून त्याला भेटण्यासाठी उभा राहतो. आपल्या हृदयाची जखम त्याला कळू शकते. तो आपल्या हातानं मलमपट्टी करून ती जखम बांधणार आहे. हा विश्वास चोखोबांच्या या अभंगातून प्रकट झाला आहे. भेद माणसं करतात. देव मात्र अभेदरूप आहे. या विचारानं त्याच्या वात्सल्याची कथा ते इथं सांगतात.आणि आपलं दुःख विसरून जातात. भक्तीत हीच विलक्षण शक्ती असते. खरा भक्त देवभक्तीपासून कधीच विचलित होत नाही. चोखामेळा विठ्ठलाला कधी अंतरला नाही. भौतिक अर्थानं तो दुःखी होता. पण त्याच्या पारमार्थिक जीवनात तो तृप्त होता. प्रतिष्ठित होता. विठ्ठलाच्या सान्निध्यातच होता. ज्याला विठ्ठल भेटला त्याला आयुष्यात सर्वकाही मिळालं.

**उदंड शहाणे होवोत तार्किक । परी न कळे अलौकिक महिमा काही ।।**
**उदंड वाचन जरी झाले साचे । परी महिमान ययाचे न कळे काही ।।**
**उदंड ब्रह्मज्ञान सांगताती गोष्टी । परी अनुभव कसवटी एका नाही ।।**
**संतांचे उदंड घेताती सोंग । कामनेचा त्याग करिता न ये ।।**
**चोखा म्हणे हे तो पोटाचे बांधिले । म्हणोनि पांगिले घरोघरी ।।**

संत चोखोबांचा हा अभंग पढीक पांडित्यावर मर्मभेदक टीका करणारा आहे. ग्रंथपांडित्य प्राप्त झालं म्हणजे आपण ब्रह्मज्ञानी झालो अशा भ्रमात बहुतेक पंडित असतात. पण या ज्ञानामुळं त्यांचा अहंकार मात्र फोफावतो. चार ग्रंथ वाचले की आता समजून घेण्यासारखं काही उरलेलं नाही. यच्चयावत् ज्ञानाचे आपण आता सत्ताधारी बनलो आहोत या अहंगंडानं ही मंडळी वागू लागतात. पोथ्यापुराणांचं पठण करून परमेश्वर मिळत असता तर प्रत्येक पढीक विद्वानाला ईश्वरी साक्षात्कार झाला असता. ग्रांथिक ज्ञानातून ईश्वराची भेट होत नाही. दैवी साक्षात्कारासाठी शास्त्रग्रंथांचं पठन-पाठन आवश्यक असतं तर नामदेव- तुकाराम, चोखामेळा आणि गोरा कुंभार, सोयराबाई आणि जनाबाई यांना विठ्ठलाचं सान्निध्य कधीच लाभलं नसतं. सावता माळ्याच्या शेतात विठ्ठल नांदत होता. चोखोबाच्या झोपडीत तो वास्तव्य करायचा. चिखल तुडवताना आणि मातीचे घट तयार करताना गोरा कुंभाराला तो पांडुरंग सहाय्य करायचा. हे सारेच भक्त ग्रंथपांडित्यापासून कितीतरी दूर होते. पण आपल्या भावबळावर पांडुरंगाला भेटत होते. त्याच्याशी संवाद करीत होते. उत्कट भक्तीनं परमेश्वर मिळतो. तर्कशास्त्रानं किंवा पोथ्या-पुराणं घोकून तो कधीच मिळत नाही. 'वेडेवाकुडे गायिन, परि तुझाच म्हणवीन' या शब्दांतला भावार्थ महत्त्वाचा आहे. माझ्या गाण्याला ताल-सूर नसेल, ते वेडंवाकडं असेल पण त्या गाण्यात परमेश्वरा, तुझ्याविषयीचं प्रेम आणि श्रद्धा असेल. ईश्वरप्राप्तीसाठी एवढं भांडवल पुरेसं आहे. नाना प्रकारच्या ग्रंथांचं चर्वितचर्वण करीत बसलेल्या प्रकांड पंडितांना विठ्ठलाचं नखही दिसत नाही. पण चोखोबांना मात्र आपल्या झोपडीतच पांडुरंग दर्शन देतो. म्हणूनच संत-कबीर म्हणतात,

पोथी पढि पढि जगमुआ, पंडित भया न कोय ।
ढाई आच्छर प्रेमका पढे सो पंडित होय ।।

भक्तिप्रेमातूनच ईश्वर साकार होतो. हीच साऱ्या संतांची अनुभूती आहे. या अभंगात संत चोखोबा म्हणतात, 'तर्कज्ञानी उदंड शहाणे होऊ द्यात. उदंड वाचन

करू द्यात. पण त्यांना ईश्वरी महिमा कळणार नाही. ते ब्रह्मज्ञान सांगतील पण अनुभवाच्या नावानं सारं शून्य असेल. संताचं सोंग घेतील पण वासनेचा त्याग मात्र त्यांना करता येणार नाही. चोखा म्हणे हे तो पोटाचे बांधिले। म्हणौनि पांगिले घरोघरी' ॥ शिकल्या शब्दाचं ज्ञान सांगणारे हे पोटभरू पंडित घरोघर पाहायला मिळतात. पण आपल्या प्रामाणिक भक्तीनं आणि अतूट श्रद्धेनं परमेश्वराला भेटीला बोलावणारे भक्त फार थोडे आहेत. शास्त्रज्ञानाच्या कक्षेत न येणारा ईश्वर शबरीच्या प्रेमानं बांधला जातो. मीरेच्या ममतेनं तो तिच्याभोवती प्रदक्षिणा घालतो. पुंडलिकाच्या सेवेनं विटेवर उभा राहतो. चोखामेळ्याच्या अश्रूंनी भिजून जातो. आणि त्याच्या झोपडीतच निवास करतो. आपल्या कंठातला हार त्याच्या गळ्यात घालतो. देव भावाचा भुकेला असतो. पांडित्याच्या वितंडवादात त्याला रस नाही. तो नामदेवाच्या कीर्तनात नाचतो. तुकोबांच्या भजनात रंगून जातो. जो कोणी अंतःकरणापासून साद घालील त्याला तो प्रतिसाद देतो. शुद्ध निरपेक्ष भक्ती आणि उत्कट प्रेम हेच परमेश्वराला जिंकण्याचे मार्ग आहेत. अर्जुन कृष्णावर प्रेम करीत होता म्हणून कृष्ण त्याच्या रथाचा सारथी झाला. भाव आणि देव दोन्ही एकरूप आहेत हेच सत्य संत चोखोबांनी इथं विवरून सांगितलं आहे. त्यांच्या अनुभवाला आलेलं हे रूप खरोखरच अर्थपूर्ण आहे.

सातशे वर्षांपूर्वी एका तथाकथित अज्ञानी संतानं पढीक पांडित्यावर चढवलेला हा हल्ला भेदक स्वरूपाचा आहे. आजही हेच चित्र समाजात दिसतं. चार पुस्तकं पढला की आता अवघं ज्ञानाचं क्षेत्र आपल्या हातात आलं असं समजणारे मूर्ख लोक अनेक ज्ञानपीठाचे अधिकारी होऊन बसलेले दिसतात. लिहिणं, वाचणं आणि ज्ञानवंत होणं यात जमीन अस्मानाचं अंतर आहे. चोखोबा कोणत्याही शाळेत गेले नव्हते. अस्पृश्यांना शिक्षणाचा अधिकारच नव्हता. पण अनुभवाच्या शाळेत ते शिकत गेले. ज्ञानदेव- नामदेवांसारखे कुलगुरू त्यांना आयुष्याच्या गुरुकुलात भेटले. चोखोबा त्यामुळं आत्मज्ञानी झाले. अध्यात्मातली उंच पायरी ते चढू शकले. संताचं सोंग घेणारे ढोंगी लोक उदंड ब्रह्मज्ञान सांगतात. पण अनुभवानं मात्र कोरडेच असतात. चोखोबांचं ज्ञान हे घामातून, श्रमातून आणि त्यापेक्षाही ते डोळ्यांतल्या अश्रूतून व हृद्‌यातल्या भक्तीतून आलेलं होतं. म्हणूनच त्यांना पोकळ पांडित्यावर आणि निव्वळ शब्दज्ञानावर हल्ला चढवण्याचा नैतिक अधिकार होता. पोट भरण्याच्या विद्येपेक्षा अंतःकरणाला शांती देणारं आत्मज्ञान चोखोबांनी आपल्या तपस्येतून मिळवलं. आणि उच्च कुलीन लोकांचेही ते मार्गदर्शक होऊ शकले. हेच महत्त्वाचं आहे.

●●●

**स्त्री पुत्र धन कोणाचे हे कोण । याचा अभिमान धरती प्राणी ।।**
**देवांचा हा देव तया ठकविती । बापुड्या पूजिती मायराण्या ।।**
**आगाडे बगाडे करिती नवस । ते काय आस पुरविती ।।**
**चोखा म्हणे ऐसे आहे जन । नाशिवंत धन मागताती ।।**

या अभंगात संत चोखामेळा यांनी एक मूलभूत प्रश्न उपस्थित केला आहे. आपण ही माझी स्त्री, हा माझा पुत्र आणि ही माझी संपत्ती असं म्हणून त्याचा विलक्षण अभिमान बाळगतो. पण खरं पाहता कोणी कोणाचा असतो का ? ममत्वामुळं हे सारं आपल्याला जवळचं वाटतं. पण खरोखरच ते जवळचं आहे का ? या प्रश्नाचा शोध मात्र आपण घेत नाही. ममत्वाचं कारण अज्ञान हेच असतं. लहान मूल एखाद्या खेळण्याबरोबर थोडावेळ खेळतं. ते खेळणं त्याला जीव की प्राण वाटतं. पण थोड्याच वेळात ते मोडून जातं. मोडलेल्या खेळण्याची काही वेळ आठवण मनात राहते, नंतर ती बुजून जाते. स्त्री, पुत्र, धन यांची अवस्था देखील अशीच नाही काय ? फुटून जाणाऱ्या बुडबुड्यांचा अभिमान मनात ठेवणं हे अज्ञानाचं लक्षण आहे. आपल्याबरोबर परलोकात कोणी येत नाही. स्त्री आणि पुत्र फार तर स्मशानापर्यंत येतात. धनाचा प्रश्नच उद्भवत नाही. आजच्या स्नेहशून्य वातावरणात स्त्री-पुत्रदेखील मनुष्याला फारशी साथ करीत नाहीत असा अनुभव येतो.

एका बड्या अधिकाऱ्याची वृद्धाश्रमात राहत असलेली आई मरण पावली. हा वरच्या श्रेणीचा अधिकारी अत्यंत आत्मकेंद्रित होता. आपण आणि आपल्या अधिकाराचं वर्तुळ यापलीकडं तो काहीच पाहू शकत नव्हता. मृत आईचं अंत्यदर्शन घेण्याचीही इच्छा त्याला झाली नाही. कुणी विचारलं तेव्हा त्यानं उत्तर दिले, कामाची फाईल मला आईपेक्षा अधिक महत्त्वाची वाटते. इतकी भावनाशून्यता असलेल्या या अधिकाऱ्याची सत्ता हा देखील एक फुटून जाणारा बुडबुडाच होता. संत चोखोबांच्या शब्दांत म्हटले पाहिजे.

स्त्री पुत्र धन कोणाचे हे कोण । याचा अभिमान धरती प्राणी । प्रेम अभिमान या चांगल्या गोष्टी आहेत. पण उत्कट प्रेम त्या परमेश्वरावर करावं. अभिमान त्याच्याविषयी वाटावा हे माणसाला कळत नाही. नथ घडवणाऱ्या सोनाराची तो प्रशंसा करतो. नाक देणाऱ्या परमेश्वराला मात्र विसरून जातो. क्षुद्र दैवतांना नवस करणाऱ्या लोकांचाही चोखोबांनी इथं उपहास केला आहे. आगाडे बगाडे करिती नवस । ते काय आस पुरविती ? । देवाकडं काय मागावं तेही लोकांना कळत नाही.

अतिसामान्य क्षुद्र इच्छांची पूर्ती करून घेण्यासाठी सामान्य देवदेवतांना हास्यास्पद नवस करण्याची प्रवृत्ती आजही लोकांत आढळते. कोणी पगारवाढीसाठी, कोणी एखादं अधिकारपद मिळावं म्हणून, कोणी घेतलेल्या लॉटरी तिकिटाचा नंबर यावा म्हणून भाबड्या भावानं नवस बोलत असतात. चोखा म्हणे, 'ऐसे आहे जन, नाशिवंत धन मागताती.'

संत चोखोबांची या अभंगांतून व्यक्त झालेली विचारसरणी अत्यंत तर्कशुद्ध आहे. बुद्धिवादी आहे. जे नाशवंत आहे त्याची मागणी त्या चिरंतन परमेश्वराकडं कशासाठी करायची ? असं काही मागावं की ते आपल्या बरोबर अखंड सोबत करील. प्रेरणा देईल, ईश्वरा, तुझं नाम मला दे. तुझी भक्ती मला दे. तुझ्या ठायी असलेली लोककल्याणाची उर्मी दे. दुसऱ्याचं दुःख निवारण करण्याची शक्ती दे. तुझं पवित्रनाम माझ्या जिभेवर सदैव राहू दे, ही सर्वात सुंदर मागणी आहे. ही मागणी पूर्ण झाली म्हणजे जीवनाचं सार्थक झालं. पण अशी मागणी करण्यासाठी अहंकार आणि अज्ञान नष्ट केले पाहिजेत. संत चोखामेळा एक ज्ञानी निरहंकारी संत होते. म्हणूनच त्यांनी नामस्मरणात आपल्या आयुष्याचं सार्थक केलं.

जीवनाच्या वास्तव स्वरूपाचं वर्णन इथं करण्यात आलं आहे. ज्या जीवनावर आपण प्रेम करतो ते अतिचंचल आणि निरर्थक आहे हा विरक्तीपूर्ण विचार चोखोबा सांगत आहेत. खरोखरच जीवनाची नश्वरता आपल्या अनुभवाला येत असूनही मोह आणि ममता यामुळं जीवितातले सारे भोग आपल्याला चिरकाल मिळणार आहेत असं वाटत असतं. भोगांचा उपभोग आपण घेत नसून हे भोग आपल्याला भोगत असतात. अज्ञानामुळं हे कळत नाही. स्त्री, पुत्र, आप्तस्वकीय आणि संपत्ती यातलं खऱ्या अर्थानं आपलं काहीच नसतं. जे मुळात आपलं नाही त्याच्या मागं उरी फुटेपर्यंत धावायचं कशाला ? हा प्रश्न प्रत्येक संतानं आणि तत्त्ववेत्त्यानं विचारला आहे. या प्रश्नात सत्यशोधनाची भूमिका आहे. चोखामेळा यानं ईश्वर तेवढा सत्य आहे पण त्याच्याकडं काय मागावं हे अज्ञानी लोकांना कळत नाही असं भाष्य केलं आहे. जे मागायचं ते चिरतंन महत्त्वाचं काहीतरी मागावं असा उपदेश ते करतात. जे क्षणभंगुर आहे त्यासाठी नवससायास करणं हा वेडेपणा आहे. 'निवडणुकीत निवडून आलो तर तुळजापूरच्या मंदिरापर्यंत साष्टांग दंडवत घालीत जाईन.' असला नवस करणाऱ्या भक्ताला भक्त तरी म्हणता येईल का ? चोखोबांनी उपस्थित केलेले प्रश्न नीट समजून घेतले पाहिजेत.

●●●

**नामाचे सामर्थ्य विष ते अमृत । ऐसी हे प्रचीत आहे जीवा ।।**
**ते नाम सोपे विठ्ठल विठ्ठल । नको काळ वेळ जपे आधी ।।**
**नेम धर्म काही न लगे साधन । सुखे नारायण जप करी ।।**
**चोखा म्हणे मज भरवसा नामाचा । येणे कळिकाळाचा भेव नाही ।।**

सर्वच संतांनी नामस्मरण आणि नामसंकीर्तन यांची महती पुन्हा पुन्हा विशद केली आहे. परमेश्वराच्या नावात सारं सामर्थ्य साठवलेलं आहे असं संत म्हणतात. खरं तर राम, कृष्ण, शिव, विठ्ठल हे केवळ शब्द आहेत. ईश्वराच्या नावाचे हे वाचक शब्द समर्थ कसे असतील हा प्रश्न उपस्थित करता येतो. नाव परमेश्वराचं असलं तरी त्याच्या केवळ उच्चारणानं भक्ताला सुखशांती मिळू शकते हे म्हणणं तर्कदृष्ट्या सुसंगत आहे का ? तुकारामांनी म्हटलं आहे,

नाम घेता मन निवे । जिव्हे अमृतची स्रवे ।।
नाम आहे जयापाशी । जेथे राहे तेथेचि काशी ।।
नाम जाणे तुका । नाही संसाराचा धोका ।।

संत चोखोबा म्हणतात,

अखंड नामाचे चिंतन सर्वकाळ । तेणे सफळ संसार होय जना ।

संतांच्या जीवनाला नामसंकीर्तनामुळं सौंदर्य आणि सामर्थ्य लाभतं हा त्यांचा अनुभव आहे. हा अनुभव सामान्य माणसालाही येऊ शकतो. राम आणि कृष्ण, शंकर आणि विठ्ठल या शब्दांच्या भोवती महनीय व्यक्तित्वाचं प्रकाशमान वलय आहे. रामाचं स्मरण म्हणजे केवळ नामोच्चार नव्हे. राम हा शब्द सत्य, त्याग, निष्ठा प्रजापालन आणि पराक्रम यांचं प्रतीक बनलेलं आहे. कृष्ण हे नाम कर्मयोगाचं प्रतीक. ईश्वरी नामात ईश्वराच्या अपार सामर्थ्याचं सार सामावलेलं असतं. 'नावात काय आहे' 'गुलाबाला निवडुंग म्हटलं म्हणून त्याचा सुगंध कमी होणार आहे काय ?' असा प्रश्न विचारणाऱ्या शंकेखोरांना उत्तर देता येईल की आईला आपल्या अपत्याचं नाव प्रिय असतं. प्रियकराला प्रेयसीचं नाव महत्त्वाचं वाटतं. वसंतसेनेला चारुदत्ताचं नाव प्राणाहून अधिक प्रिय होतं. कारण ते तिच्या प्रेमसर्वस्वाचं निदर्शक होतं. कृष्णाच्या केवळ नामोच्चारणानं मीरा अंतर्बाह्य रोमांचित होत होती. नाव हे नावापुरतं नसतं, ते जीवनाला सौंदर्याचा आणि शक्तीचा आधार देऊ शकतं. म्हणूनच संत चोखोबांनी या अभंगात उत्कटतेनं म्हटलं आहे. परमेश्वराचं नाव विषाचं अमृतात रूपांतर करू शकतं. 'ऐसी हे प्रचीत आहे जीवा' म्हणजे ही मला प्रतीती आली आहे.

म्हणून त्यांचं म्हणणं आहे, विठ्ठलनामाचा जप करण्यासाठी काळवेळ पाहण्याची जरूर नाही. हे सुलभ सुंदर नाव केव्हाही आणि कुठंही आठवावं. ते उच्चारण्यासाठी कोणत्या नियमाची किंवा व्रताची आवश्यकता नाही. चोखा म्हणे मज भरवसा नामाचा । येणे कळिकाळाचा भेव नाही । नामजपावर माझा संपूर्ण विश्वास आहे. कळिकाळाची भीती मला नाही. संत चोखोबांचा हा आत्मप्रत्यय खरोखरच मौलिक आहे. नाहीतरी कुठेतरी अभद्र शब्द उच्चारीत बसण्यापेक्षा ज्या शब्दांभोवती परमेश्वरी सामर्थ्याचं आणि पावित्र्याचं वलय आहे असे शब्द उच्चारताना आपल्याही अंतःकरणाला पावित्र्याचा स्पर्श होऊ शकतो. नामस्मरण हे जीवनशुद्धीचं अपूर्व रसायन आहे. ईश्वरी नाम हा जड शब्द नसून ते आयुष्याला अर्थ प्राप्त करून देणारं अमृत आहे, हे संतांचं मत मला मुळीच अतिशयोक्तीपूर्ण वाटत नाही. मनात चिंतेचं काहूर दाटलं, दुःखाची ज्वाला भडकली की परमेश्वरी नावावर ध्यान केंद्रित केलं तर चिंता आणि दुःख निरसून जातं. एका अपूर्व मानसिक शांतीचा अनुभव येऊ शकतो. म्हणूनच संत परमेश्वराला म्हणतात,

गोड तुझे नाम । गोड तुझे रूप ॥

नामाचा महिमा विचारवंताला कळतो. निर्बुद्धाला मात्र तो कळणार नाही. संत चोखोबांच्या शब्दात मी म्हणतो, 'ते नाम सोपे विठ्ठल विठ्ठल । नको काळवेळ जपे आधी ॥'

नामभक्तीचं माहात्म्य स्पष्ट करणारा हा अभंग चोखोबांच्या जीवनावर प्रकाश टाकतो. माझा केवळ नामावर विश्वास आहे. परमेश्वरी नाम जवळ असलं की मग कळिकाळाचीही भीती नाही. ही नामभक्ती भक्तीच्या क्षेत्रात सर्वत्र चालू आहे. परमेश्वर एकच असला तरी त्याची अनेक नावं आहेत. भिन्न भिन्न देशात वेगवेगळ्या नावांचा महिमा असतो. चोखोबांना विठ्ठल या नावात आपल्या समग्र जीवनाचं सार्थक झालं असं वाटतं. संतांनी नामसंकीर्तनाची महती आपल्या वाङ्मयातून गायिली आहे. भक्त आणि विठ्ठलनाम यांचं साहचर्य चिरंतन असतं. सूर्यापासून सूर्याचे किरण वेगळे काढता येत नाहीत, त्याप्रमाणं उत्कट भक्ताच्या मनातलं विठ्ठलाचं नाव वेगळं करता येत नाही. नाम हेच जीवन. नाम हाच त्याचा श्वासोच्छ्वास. 'तू कृष्णाचं नाव घेऊ नकोस तुला अपरंपार संपत्ती देईन.' असं कुणी राधेला सांगितलं असतं तर ती म्हणाली असती, ' कृष्णनाम हीच माझी संपत्ती. याहून वेगळी संपत्ती असणं शक्य नाही. हे नाव सोडून देण्यापेक्षा मी मरण पत्करीन. ' या उत्तरातच नामसंकीर्तनाचं महत्त्व स्पष्ट होतं.

●●●

**लिहिले संचितीं न चुके कल्पांती । वायां कुंथाकुंथी करूनी काय ॥**
**जन्ममरण सुखदुःखाचे गाठोडे । हे तो मागेपुढे बांधिलेसे ॥**
**निढळीची अक्षरे साच तेचि खरे । आता वोरबार करील कोण ॥**
**चोखा म्हणे आमुची जैशी का वासना । तैशाच भावना होत जात ॥**

संत चोखोबा यांचं समग्र आयुष्य म्हणजे दुःखनिराशेनं ओथंबलेली एक करुणकथा आहे. मनुष्य आपल्या पुरुषार्थानं आपलं व्यक्तित्व आणि जीवन घडवू शकतो हे विधान सर्वस्वी खरं आहे असं म्हणता येत नाही. कर्तृत्व असूनही कार्य घडत नाही. दृष्टी असूनही वाट दिसत नाही. औषध मिळूनही रोग हटत नाही. 'ओस जाल्या दिशा, मज वाटे भिंगुळवाणे' ही अवस्था भल्याभल्यांची होऊ शकते. याची कारणमीमांसा करताना 'प्रारब्ध', 'विधिलिखित' किंवा 'नियती' अथवा 'ईश्वराची इच्छा' असे शब्द निरुपायानं स्वीकारावे लागतात. 'दैव' नावाचा एक जबरदस्त घटक माणसाच्या आयुष्यात आपल्या लहरीप्रमाणं उत्पात घडवीत असतो. त्याला कितीही आग्रहानं आणि निग्रहानं प्रतिबंध केला तरी दैव पराभूत होत नाही. संत चोखामेळा हे त्याचं एक ढळढळीत उदाहरण आहे. त्यांच्यापाशी देवभक्ती होती, कवीची प्रतिमा होती. निढळाचा घाम गाळून कुटुंबाचा निर्वाह करण्याची शक्ती होती. माणुसकी आणि प्रेम हे सद्‌गुण होते. प्रत्येक माणसात विठ्ठल पाहण्याची दृष्टी होती. पण हे सारं असून त्यांचं प्राक्तन मात्र सर्वस्वी प्रतिकूल होतं. या भक्तकवीच्या ओंजळीत दैवानं फुलं टाकली नाहीत. जळते निखारे मात्र उदारतेनं टाकले. चोखोबांनी 'लिहिले संचितीं न चुके कल्पांती' असं म्हणून जन्ममरण हे सुखदुःखाचं गाठोडं आमच्या मागंपुढं बांधलं आहे. व्यर्थ तक्रार करण्यात काहीच लाभ नाही. असे अतिशय वैफल्यानं काजळलेले उद्‌गार काढले तर त्यात काही आश्चर्य नाही. आपल्या करंट्या नशीबाला त्यांनी दोष दिला आहे.

या संताच्या कपाळावर अस्पृश्यतेची जळती मुद्रा दैवानं उमटवली होती. कितीही घाम गाळला तरी आणि अश्रू गाळले तरी ही मुद्रा पुसली जात नव्हती. त्यामुळं या भक्ताला तो पतितपावन पांडुरंग कधीही, कधीही डोळ्यांनी दिसला नाही. अनन्य भक्ताला मंदिरातच प्रवेश असू नये यासारखा दुष्ट आघात त्यांच्यावर परंपरेनं केला. अस्पृश्य कुळात जन्मणं हे त्यांचं संचित होतं. गावकुसाबाहेर एका भिकार झोपडीत हा विठ्ठलाचा लाडका प्रतिभावंत जन्मभर अश्रू गाळीत बसतो ही केवढी विलक्षण वंचना आहे. हे त्यांच्याच वाट्याला का यावं ? या प्रश्नाला उत्तर नाही.

काही प्रश्नांना कोणतीही उत्तरं नसतात. म्हणूनच चोखोबा म्हणतात,

आम्ही कितीही इच्छा केली तरी आमचा ललाटलेख कल्पांतीसुद्धा बदलता येणार नाही. विषमतामूलक जातिव्यवस्थेत आणि सामाजिक परिस्थितीत लक्षावधी माणसांच्या कर्तृत्वाचा अक्षरशः कचरा झाला याची उदाहरणं महाभारतात असून आधुनिक भारतापर्यंत वाटेल तितकी मिळतील. केवळ शूद्र कुळातला असल्यामुळं चोखोबांना पांडुरंगाचं दर्शन घडलं नाही. तुकोबांच्या काव्याला जलसमाधी देण्यात आली. उच्चकुलीन सोडले तर बाकी यच्चयावत् लोक शूद्र आणि अतिशूद्र मानले गेले ही आमच्या देशाची दारूण शोकांतिका ठरली. आता संतांच्या आणि क्रांतिकारकांच्या विचारप्रबोधनामुळं जात आणि वर्ण यांच्या जुनाट भिंती कोसळू लागल्या आहेत हे सुचिन्ह आहे. आजचा चोखामेळा विठ्ठलाच्या पायावर मस्तक टेकवू शकेल, त्याला अडवणारी कुंपणं दुसऱ्या एका पांडुरंगानं मोडून काढली आहेत. आजचा चोखामेळा आपलं आयुष्य स्वतःच्या कर्तृत्वातून घडवू शकेल. तो निराश होणार नाही, त्याची आंतरिक प्रेरणा त्याला मार्ग दाखवीत राहील.

संतांच्या काव्यावर एक आक्षेप नेहमी घेण्यात येतो. 'संतांनी प्रारब्धवादाचं तुणतुणं आपल्या कवितेतून सारखं वाजवलं आहे' या आक्षेपात सत्य आहे. पण चोखामेळ्यासारख्या भक्तानं आपल्या आयुष्याची आणि व्यक्तित्वाची सर्व बाजूंनी शिकार होत असताना दैववादी होऊ नये तर काय करावं ? आपल्या चिंतनाचा, अनुभवाचा, प्रतिभेचा आविष्कार असलेली आपली अभंगगाथा आपल्या डोळ्यांदेखत इंद्रायणी नदीत बुडविली जावी, अशावेळी तुकारामांनी 'नियतीची इच्छा' असं म्हणू नये तर काय करावं ? पुरुषार्थ श्रेष्ठ आहे. पण त्यालाही वेढा घालणारं दैव कित्येक वेळा अतिप्रबल असतं. सारा जन्म कंगाल झोपडीत काढणाऱ्या चोखामेळ्याला देवदर्शनाचीही बंदी असावी. दर्शनाचंही सुख त्याच्या फाटलेल्या मनाला मिळू नये त्या चोखोबानं नशीबाचं तुणतुणं वाजवू नये तर त्यानं काय करावं ? कपाळीची अक्षरं कशी पुसून टाकायची हा प्रश्न असंख्य लोकांना जन्मभर छळत राहतो, त्यांनी दैवाचंच रडगाणं गावं कारण याशिवाय त्यांच्या हाती काहीच उरलेलं नसतं. अवतारी पुरुषांना देखील प्रारब्धानं छळलं. तिथं चोखामेळ्याची काय कथा ? 'लिहिले संचितीं न चुके कल्पांती ' हा दाहक अनुभव या भक्तानं घेतला. पण या दैववादी कवीनं विठ्ठलभक्ती आणि आपली कविता मरेपर्यंत सोडली नाही. हाच त्याचा 'पुरुषार्थ' होता. 'चोखामेळा संत भला ' हेच खरे !

●●●

**वाया हाव भरी नका घालू मन । चिंतावे चरण विठोबाचे ।।**
**हेचि साधन साराचे पै सार । येणे भवपार उतरती ।।**
**न करी आळस नामाचा क्षणभरी । काम क्रोध दुरी पळे येणे ।।**
**दया क्षमा शांती संतांची संगती । यापरी विश्रांती दुजी नाही ।।**
**चोखा म्हणे दृढ धरावा विश्वास । नामाचा निजध्यास सर्वकाळ ।।**

ईश्वराच्या परमभक्ताचे जीवनविषयक तत्त्वज्ञान निखळ भक्तीशवाय दुसरं काय असणार ? विठ्ठलाची भक्ती हीच संतांची मानसिक शांती असते. भक्तीला कोणी भाबडेपणा म्हटलं तरी ही भक्ती जीवन बदलणारी, जीवनाला नवा आशय देणारी अशी असते. अतूट श्रद्धा हे या भक्तीचं स्वरूप असतं. आपल्या आराध्य दैवताचं स्मरण करावं, त्याच्या नावाचं भजन-कीर्तन करावं, त्याच्या गुणरूपाशी समरस होण्याचा प्रयत्न करावा, त्याची मूर्ती आपल्या हृदयाच्या गाभाऱ्यात स्थापन करावी यात भक्ताला विलक्षण सुखाचा आणि आनंदाचा अनुभव येत असतो. जीवनातली भौतिक दुःखांची टोचणी त्यामुळं ओसरून जाते. घरात धान्याचा कण नसला तरी भक्ताच्या मनात मात्र तृप्तीचा सोहळा चालू असतो. म्हणूनच प्रत्येक भक्ताला केवळ परमेश्वराचं सान्निध्य मिळावं, त्याच्या स्वरूपात आणि सामर्थ्यात आपलं मन गुंतून राहावं इतकीच मागणी केली आहे. मला सत्ता हवी, धनसंपत्ती पाहिजे. राजप्रासादात निवास पाहिजे. अशी मागणी कोणत्याही संतानं परमात्म्याकडं केली नाही. केली तर त्याला संत म्हणता येणार नाही. असल्या क्षुद्र, क्षणभंगुर गोष्टी परमेश्वराकडं मागण्याचा अव्यवहारीपणा कोणताही संत करू शकणार नाही. आपणच परमेश्वरूप व्हावं, त्याच्या व्यक्तिमत्त्वात मिसळून जावं यापरती भक्ताची इच्छा असत नाही. संत तुकारामांनी तर एका अभंगात म्हटलं आहे,

'न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो ।।
विटंबो शरीर होत का विपत्ति । परि राहो चित्ती नारायण ।।

ईश्वरभक्तीची ही अतिशय उत्कट परिणती म्हणावी लागेल. नारायणाची कृपा आणि चित्तात राहिलेला पांडुरंग यातच संतांच्या समग्र जीवनाची सार्थकता असते. संत चोखोबा हेही रात्रंदिवस आपल्या हृदयस्थ नारायणाच्या चरणांवर नतमस्तक झाले आहेत. विठ्ठल हेच त्यांचं सुखनिधान. तेच त्यांचं सर्वस्व. माझी तू माऊली म्हणत ते विठ्ठलाच्या संगतीचा सतत लोभ धरीत आहेत. ते उपदेश करताना म्हणतात, 'वाया हावभरी नका घालू मन । चिंतावे चरण विठोबाचे ।' नाना प्रकारच्या व्यर्थ आशा आकांक्षांच्या

मागं मनाला धावू देऊ नका. विठ्ठलाच्या पाऊलांचं चिंतन करा. साराचं हे सार आहे. याच्यामुळंच तुम्ही भवपार व्हाल. काम आणि क्रोध यांचं निरसन करण्याची शक्ती विठ्ठलनामात आहे म्हणून आळस न करता ते पवित्र नाव चित्तात स्थिर होऊ द्या. विश्रांतीचं सुख पाहिजे असेल तर संतांच्या संगतीत राहा. कारण दया- क्षमा आणि शांती हेच संतांचं सारसर्वस्व असतं. काम आणि क्रोध कितीही आक्रमक झाले तरी ईश्वराचं नामस्मरण आणि संतांचा सहवास या वातावरणात असाल तर कामक्रोध तुमच्या वाटेलाही जाणार नाहीत.

'चोखा म्हणे, दृढ धरावा विश्वास । नामाचा निजध्यास सर्वकाळी ॥'

हे साधं, सुलभ, सुंदर असं जीवितविषयक तत्त्वज्ञान संतांचं असतं. चोखोबांनी या अभंगातून आपल्या जीवनाचा अनुभव समग्रपणानं सांगितला आहे. विठ्ठलाची अनन्य भावानं अखंड उपासना करीत असताना त्यांना ज्ञानदेव आणि नामदेव यांसारख्या श्रेष्ठ संतांचा सहवासही लाभला. मनाच्या मंदिरात देव होता. आणि आयुष्याच्या अंगणात संत होते. चोखोबांचं जीवन त्यांच्या दृष्टीनं सुखमय झालं यात शंका नाही. काम, क्रोध आणि लोभ तृप्ती देत नाहीत. त्यांच्यामुळं मनाची वखवख थांबत नाही. भौतिक सुखांच्या पाठीमागं धावता-धावता माणूस मोडून पडतो. सुखाचे कांचनमृग हाती लागत नाही. म्हणूनच आनंदाचा डोह असलेला परमेश्वर हृदयात धारण करावा हे चोखोबांच्या उपदेशाचं सार आहे.

संत चोखोबांचा हा अभंग त्यांच्या शांत आणि विचारशील मनाचा द्योतक आहे. लोभ आणि मोह, स्वैर भोगाची लालसा, हावरेपणा हे माणसाचे मोठे शत्रू आहेत. लोभ-मोहाची लाट साधुसंन्याशालासुद्धा वाहवत नेते. म्हणूनच संयमानं जीवन जगण्याचा मार्ग चोखोबा सांगतात. वासनेच्या चक्रव्यूहात सापडलेल्या माणसाचा विवेक नष्ट होतो. विवेकभ्रष्टांचा अधःपात शतमुखांनी होतो. हा पारंपारिक उपदेश कोणत्याही काळात मनुष्याला आवश्यक आहे. आपल्या गरजा वाढल्या किंवा वाढवल्या की दुःख यातना आपल्याला घेरतात. कमीत कमी गरजा असणं हेच सुखशांतीचं लक्षण आहे. पण गरजा वाढवण्याचं तत्त्वज्ञान अलीकडं प्रतिष्ठित बनलं आहे. यातून अनेक दुःखांची मालिका निर्माण होऊ शकते. संतांच्या सहवासात जी शांती आणि आनंद मिळतो त्यातच जीवनाची सार्थकता आहे. विठ्ठलाचं नामस्मरण हीच चोखोबांच्या दृष्टीनं सुखशांतीची खरी अनुभूती आहे.

●●●

**नीचाचे संगती देवो विटाळला। पाणीये प्रक्षाळोनि सोवळा केला ॥**
**मुळीच सोवळा कोठे तो ओवळा। पाहाता पाहणे डोळा जयापरी ॥**
**सोवळ्यांचे ठायी सोवळा आहे। वोवळ्या ठायी वोवळा का न राहे ॥**
**चोखा म्हणे देव दोहीच्या वेगळा। तोचि म्यां देखिला दृष्टीभरी ॥**

रूढी आणि परंपरा यांच्यावर आत्यंतिक श्रद्धा ठेवणारे असंख्य लोक आहेत. अमुक एखादी गोष्ट प्राचीन काळापासून रूढ आहे म्हणून ती तर्कशुद्ध आणि सदैव आचरणीय आहे असा अंधविश्वास लोकमनात दृढ झालेला असतो. त्यासंदर्भात सारासार विचार करून निर्णय करावा हे बहुसंख्य लोकांना पटत नाही. विचार न करता श्रद्धा ठेवणं म्हणजे अंधश्रद्धा. आपल्या संस्कृतीतल्या, आचारविचारातल्या कित्येक गोष्टींची जाणीवपूर्वक चिकित्सा केली पाहिजे. अतार्किक आणि अशास्त्रीय गोष्टी, रूढी आणि संकेत फेकून दिले पाहिजेत. पण हे करण्याचं लोकमनात धैर्य नसतं. त्यामुळं कित्येक लोकभ्रमांना वज्रलेप असं स्वरूप आलेलं असतं. संत चोखोबांनी अशाच एका लोकसंकेतावर या अभंगात बोट ठेवलेलं आहे. ते म्हणतात,

'नीचाच्या संगतीनं, स्पर्शानं देव विटाळतो. मग तो पाण्यानं धुवून सोवळा म्हणजे शुद्ध केला जातो. खरं तर जो मूळचाच सोवळा आहे तो ओवळा कसा होतो ? हे पाहिलं पाहिजे. हा प्रश्न चोखोबांच्या मनात उद्भवणं अगदी साहजिक होतं. ते शूद्र होते. शूद्राच्या सान्निध्यात प्रत्यक्ष देवसुद्धा विटाळतो. ही हास्यास्पद, अज्ञानी कल्पना लोकमानसात खोलवर गेली होती. त्यामुळंच शूद्रांना मंदिरात प्रवेश नव्हता. त्यांनी मंदिराच्या कळसाचं दुरून दर्शन घ्यावं असा दंडक होता. देवाचं प्रत्यक्ष दर्शन घेतलं तर त्याची शुद्धता नष्ट होऊन तो भ्रष्ट म्हणजे ओवळा होईल ही समजूत काळ्या दगडावरच्या रेघेसारखी अमिट बनली होती. शूद्रांना देवदर्शनापासून कायमचं वंचित करणारी चुकीची शास्त्राज्ञा समाजानं शेकडो वर्षं प्रमाण मानली. शूद्र समजल्या जाणाऱ्या भक्तांच्या कित्येक पिढ्यांवर हा अन्याय होत राहिला.

देव म्हणजे शुद्धतेचं, पावित्र्याचं आणि सामर्थ्याचं निखळ प्रतीक आहे. त्याच्या दर्शनानं आणि चिंतनानं साऱ्या पातकांचा उपशम होतो. पतितांना पावन करून घेण्याची शक्ती देवात असते. इतकं ज्याचं माहात्म्य तो देवच. शूद्राच्या स्पर्शानं अशुद्ध किंवा ओवळा कसा होईल ? प्रकाश अंधाराला नष्ट करतो. मग अंधारच उजेडाचा नाश कसा करू शकेल ? अनंत सामर्थ्याचा; प्रेमाचा आणि क्षमेचा, करुणेचा आणि शांतीचा अखंड वाहणारा झरा म्हणजे देवत्व असेल तर ते शूद्राच्या स्पर्शानं कलुषित

होईल असं समजणं ही अज्ञानाची परमावधी नव्हे काय ? संत चोखोबांनी हा प्रश्न उपस्थित करून तथाकथित पुराणांना आणि शास्त्री-पंडितांना निरुत्तर केलं आहे. देव हे त्यांच्या हिशेबी निरुपाधिक मंगलतेचं रूप आहे. त्याची आराधना ते जन्मभर करीत होते. आपल्या सर्व प्रकारच्या दुःखांवर मात करण्याची शक्ती या चिरंतन महन्मंगल, परमकारुणिक देवाकडून ते मिळवीत होते. म्हणूनच ते विचारतात 'सोवळ्यांचे ठायी देव सोवळाच असतो' ज्यांना शुद्ध दृष्टीनं पाहता येत नाही त्यांना देव ओवळा दिसतो त्याला काय करायचं ? सोवळेपणा आणि ओवळेपणा या सीमांच्या पलीकडं देवपण आहे. जो मुळातच निर्मलत्वाचं निधान आहे तो तसाच असणार आहे. त्याच्या तेजोमय दर्शनानं मनाचा आणि जीवनाचा मलिनपणा संपून जातो. दुर्गंध निरसून जातो. शुद्धता आणि सुगंध यांची वाट दिसू लागते. मी त्या सदैव शुद्ध असलेल्या ईश्वराकडं पाहू शकतो. माझा विठ्ठल मूलतःच सोवळा आहे. ओवळेपणाचा लेशमात्रही लेप त्याला लागू शकत नाही. चोखोबा हे स्वतः चोख म्हणजे शुद्ध होते. अंतर्बाह्य शुद्ध असलेल्या या भक्ताच्या शुद्ध देवकल्पनेचं हे तर्कशुद्ध विश्लेषण त्यांनी या अभंगात संक्षेपानं पण परिपूर्णतेनं केलं आहे.

शूद्राच्या स्पर्शानं मंदिर आणि मूर्ती अपवित्र होते ही अत्यंत मूर्खपणाची कल्पना आजच्या शास्त्रीय युगातही काही कर्मठांच्या डोक्यात ठाण मांडून बसली आहे. पंढरपूरचं मंदिर सानेगुरूजींच्या उपोषणानं अस्पृश्यांना खुलं करण्यात आलं तेव्हा या दुराराध्य पुराणवादी लोकांनी एकच हाकाटी केली. 'आम्ही विठ्ठलाच्या मूर्तीतलं तेज काढून घेतलं आहे.' असा भंपक युक्तिवाद काही सनातन्यांनी केला. विठ्ठलातलं तेज काढून घेण्याची शक्ती असलेले हे लोक स्वतःला विठ्ठलापेक्षाही श्रेष्ठ समजत होते. माणसांच्या स्पर्शानं माणूसही जिथं विटाळत नाही तिथं देव विटाळतो ही कल्पना करणं हे वैचारिक दिवाळखोरीचं उत्कृष्ट उदाहरण आहे. देव हे शुद्धतेचं आणि असीम मंगलतेचं माहेरघर असतं. त्याच्या दर्शनानं स्पृश्य असो की तथाकथित अस्पृश्य असो तो शुद्ध होतो. मुळातच अस्पृश्यता ही एक घाणेरडी कल्पना विकृत विचारातून उद्भवलेली आहे. अस्पृश्यानं देव विटाळता तर पाण्यानं धुतला म्हणजे तो पुन्हा सोवळा होतो हा विचार देवाचाच अपमान करणारा आहे. सोवळेपण आणि ओवळेपण या माणसाच्या डोक्यातल्या करंट्या कल्पना आहेत. देव या दोन्ही कल्पनांच्या पलीकडे आहे, हा बुद्धिवादी विचार चोखामेळा मांडतात. सोवळ्या ओवळ्यावर त्यांनी केलेलं भाष्य तर्ककठोर आहे, ते स्वीकारलंच पाहिजे.

●●●

**माकडाचे परि हालविती मान । दावी थोरपण जगामध्ये ।।**
**स्वहिता मुकले स्वहिता मुकले । बळे झाकी डोळे नाक धरी ।।**
**माळा आणि मुद्रा दाविताती सोंग । डोलविती अंग रंग नाही ।।**
**पोटाचा पोसणा विटंबना करी ।। भीक दारोदारी मागतसे ।।**
**चोखा म्हणे जगामध्ये भोंदू । तया कोण साधु म्हणे देवा ।।**

संत दीपस्तंभासारखे असतात यात काहीच शंका नाही. प्रत्येकाच्याच जीवनमार्गावर खाचखळगे असतात. काटेकुटे असतात. वेडीवाकडी धोक्याची वळणं असतात. आणि हा रस्ता पुष्कळ वेळा अंधारात बुडालेला असतो. प्रवास करणाऱ्या पथिकाला पायाखालची वाट नीट दिसत नाही. तो अज्ञानानं आणि मोहानं दिशा चुकतो. वेगळ्याच वळणाला जाऊन मिळतो. याचा परिणाम अटळ आहे. अंधारात अर्थशून्य भ्रमंती करीत एखाद्या खळग्यात पडणं हाच अशा प्रवासाचा इत्यर्थ असतो. पण हे टाळायचं असेल तर संत नावाच्या दीपस्तंभाचा प्रकाश त्या पथिकानं आदरपूर्वक स्वीकारला पाहिजे. प्रकाशाकडं पाठ फिरवून अंधाऱ्या वाटेनं चालणं याला मूर्खपणा याशिवाय दुसरी संज्ञा नाही. पण बहुसंख्य माणसं मोहवश होऊन उजेडाला पाठमोरे होतात. आणि सर्वनाशाची वाट चालतात. संत चोखामेळा या लोकांना मार्गदर्शन करीत आहेत. खरा साधू कोण ? आणि साधूचा केवळ वेष घेतलेला दांभिक कोण यावर ते प्रकाश टाकतात. प्रकाश देणारे साधू आणि अंधारात ढकलणारे स्वार्थसाधू ओळखता आले पाहिजेत म्हणून चोखोबांनी दांभिकांच्या स्वरूपावर या अभंगातून मर्मभेदक टीका केली आहे. चोखोबांच्या मनातला क्षोभ आणि क्रोधही त्यांच्या शब्दांतून इथं व्यक्त झाला आहे. ढोंगी साधूंना त्यांनी 'माकड' म्हटले आहे. आणि त्यांच्या करणीचं वास्तव चित्र रेखाटलं आहे. कसे असतात हे ढोंगी संत ?

माकडाचे परि हालविती मान । दावी थोरपण जगामध्ये

आपल्या थोरपणाचा जगात हे डांगोरा पिटतात. देखावा उभा करतात. डोळे मिटण्याचं ढोंग करून नाक धरतात. माळा आणि मुद्रा यांचं प्रदर्शन करतात. अंग डोलवतात. मान हलवतात. पण हे सारे पोट भरण्याचे धंदे आहेत. या भोंदू लोकांना कोण बरं साधू म्हणेल ? चोखोबांचं निरीक्षण मार्मिक आहे. अध्यात्माच्या क्षेत्रातही फार पूर्वीपासून सोंगढोंगाला स्थान मिळालेलं आहे. साधूचं सोंग घेतलं की पोटाची चिंता संपते. चार स्वार्थी स्तुतिपाठक गोळा करायचे आणि संतत्वाची जाहिरात करून घ्यायची म्हणजे मग धंदा उत्तम चालतो. अशा स्वार्थी मर्कटांचा चोखोबांसारख्या

निखळ संताला संताप यावा यात आश्चर्य नाही. लोक देखाव्याला फसतात. अंगावरच्या भगव्या कपड्यांना आणि माळामुद्रांना भुलतात. त्याची खरी परीक्षा ते करू शकत नाहीत. या आपत्तीवर चोखोबांनी नेमकं बोट ठेवलं आहे. पाखंडी लोकांचं खंडन करणं आणि सत्याचा प्रकाश पाडणं हे खऱ्या संताचं कार्य चोखोबा करीत आहेत. त्यांचा हा अभंग 'साधू कोणाला म्हणू नये' याचं रहस्य उलगडून दाखवणारा आहे. चोखोबांचं जीवन हे एका आदर्श संताचं सत्त्वसुंदर आणि भक्तीनं विकसित झालेलं जीवन होतं. त्यामुळंच त्यांना दांभिक साधूवर कठोर टीका करण्याचा नैतिक अधिकार होता. ज्ञानदेव-नामदेवांसारखी संत व्यक्तित्वाची उत्तुंग शिखरं त्यांनी दीर्घकाळ पाहिली होती. त्यातून स्फूर्ती घेतली होती. ज्यानं असे महनीय संत पाहिले त्यानं दांभिकांचा उद्धार 'माकडाचे परि हालविती मान' या शब्दांनी करावा हे अत्यंत सयुक्तिक आहे. अस्सल आणि नक्कल स्वतः पारखून लोकांना मार्गदर्शन करणे हे संतकार्य चोखोबांनी केलं आहे. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारे' हे तुकोबांनी सांगितलेलं संतलक्षण चोखोबांच्या व्यक्तित्वाचं प्रमुख अंग आहे. ते केवळ आपल्याच दुःखाची कहाणी सांगण्यात रंगले नाहीत तर त्यांनी लोकांना योग्य दिशेनं नेण्याचा प्रयत्न केला. यात त्यांच्या संतत्वाची थोरवी आहे.

आपल्याच दुःखी आयुष्याची करुणकहाणी सांगण्यात चोखोबा गुंतून पडले नाहीत. आत्मकथनाप्रमाणंच त्यांनी लोकोपदेशाकडंही लक्ष दिलं. ढोंगी साधू-संन्यासी अज्ञानी जनतेचं शोषण करतात. आपल्या नसलेल्या थोरपणाचं जगात प्रदर्शन करतात. असे भोंदू संन्यासी पोट भरण्यासाठी दारोदार भटकतात. ते संत नसतात. या दांभिकांवर चोखोबांनी या अभंगातून अत्यंत कठोर प्रहार केले आहेत. त्या दांभिकांचा 'माकड' म्हणून त्यांनी उपहास केला आहे. दंभ आणि अनीती यांच्यावर मर्मभेदक प्रहार करणं हा संताचा धर्मच असतो. साधुत्वाचा आणि शुद्धत्वाचा उपासक असलेला संत अनीती, विसंगती व अधार्मिकता कधीच सहन करणार नाही. आपल्या धार्मिक आयुष्यात त्यांनी अनेक ढोंगी, पोटभरू जोगी पाहिले होते. त्यांच्यापासून भोळ्याभाविकाला संरक्षण देणं हे चोखोबांनी आपलं कर्तव्य समजून कार्य केलं आहे. चोखोबांच्या अभंगात बहुधा भक्ती, नम्रता, सहिष्णुता, आणि आपल्या दुःखाची कथा सांगण्याची प्रवृत्ती आढळते. पण या अभंगात मात्र त्यांनी 'सोंगी- ढोंगी' लोकांवर आसूडाचे कोरडे ओढले आहेत. जो अंतर्बाह्य शुद्ध असतो, चोख असतो, त्याला समाजजीवनातलं ढोंग आणि अनीती मुळीच खपत नाही. चांगल्या कारणासाठी संतालाही संताप येतो. संताचा संताप नवनिर्मितीला पोषक ठरतो.

●●●

**वोखटे गोमटे असोत नर नारी । दोचि अक्षरे पावन होती ।।**
**न लगे अधिकार वर्णावर्ण धर्म । नाम परब्रह्म येचि अर्थी ।।**
**योगायोगादि जपतप कोटी । एक नाम होटी घडे तेचि ।।**
**चोखा म्हणे ऐसा आहे शिष्टाचार । नाम परिकर श्रीरामाचे ।।**

वारकरी संप्रदायानं आध्यात्मिक क्षेत्रात समतेची घोषणा केली. ज्याच्या हृदयात भक्ती आहे त्याला मुक्तीचा अधिकार आहे. जात, कुळ आणि वर्ण हे घटक भक्तीच्या दालनात अनावश्यक आणि अप्रस्तुत आहेत. जातीय उच्चनीचतेचा भक्तीशी कोणताही संबंध नाही. जात कोणतीही असो. वर्ण कुठलाही असो भक्ती हीच प्रमाण मानली गेली. अन्यथा जातीचा आणि वर्णाचा अनावश्यक, निरर्थक बडिवार पिढ्यान् पिढ्या धर्मक्षेत्रात माजवून ठेवला होता. जो उच्चकुलीन आहे त्यालाच भजनपूजनाचा आणि मुक्तीचा अधिकार आहे अशी समजूत रूढ झालेली होती. पण वारकरी संप्रदायानं भक्तिसंपन्न हृदयाला महत्त्व देऊन बाकीचे सर्व गौण घटक पुसून टाकले. सर्व जातीच्या लोकांना, विशेषतः समाजाच्या खालच्या स्तरातल्या स्त्रीपुरुषांना भक्तीची सनद मिळाली आणि त्यांच्या मुक्तीच्या मार्गातला अडसर दूर झाला. भक्तिपंथानं समाजाच्या भिन्न भिन्न स्तरातली लक्षावधी माणसं भक्तीच्या सूत्रानं एकत्र जोडली. हे क्रांतिकारक स्वरूपाचं कार्य आहे. नाना प्रकारची कुंपणं उभारणं, भिंती बुलंद करणं आणि माणूस माणसापासून विभक्त करणं हे अधार्मिक कार्य आहे. जोडणाऱ्या विचाराला धर्म म्हणतात. विभक्त करणारा, तोडणारा विचार समाजाची रचना करू शकत नाही. परमेश्वराच्या दरबारात ब्राह्मणांपासून शूद्राति-शूद्रांपर्यंत आणि ज्ञानवंतांपासून अज्ञान्यांपर्यंत सारे समान आहेत. तिथं उच्चनीचत्वाला अवसरच नाही. तिथं देव आहे. देव जातीकडं पाहत नाही, वर्णाचा विचार करीत नाही, ही ग्वाही जेव्हा वारकरी पंथानं फिरवली तेव्हा विलक्षण चमत्कार घडला. कुंभार, सुतार, सोनार, माळी, शिंपी, न्हावी अशी भिन्न भिन्न थरांतली माणसं जागृत झाली. आणि आपल्या खांद्यावर विठ्ठलनामाची पताका घेऊन आनंदानं नाचू लागली. हाच उत्कट आनंद संत चोखोबांनी आपल्या अभंगातून व्यक्त केला आहे. ते म्हणतात,

न लगे अधिकार वर्णावर्ण धर्म । नाम परब्रह्म येचि अर्थी

रामाचं नाव घेण्यासाठी आणि पावन होण्यासाठी जातीचा आणि वर्णाचा अधिकार लागत नाही. सर्व नरनारींना मग ते 'वोखटे' असोत की 'गोमटे' असोत. राम ही दोन अक्षरं त्यांना परब्रह्माचा साक्षात्कार घडवतील. योग याग नको, जप,तप

नको ओठांवर फक्त राम नाम पाहिजे.

ज्ञानेश्वरांनी या संदर्भात म्हटले आहे,

म्हणौनि कुळ जाति वर्ण हे आघवेचि गा अकारण ।
एथ अर्जुना माझेपण सार्थक एक ।।

जो माझा भक्त आहे त्याच्या कुळजातीशी मला कर्तव्य नाही. अंतः करणातली भक्तीची भावना अनन्य असली की तो माझ्यात मिसळून जातो. तो माझा आणि मी त्याचा होतो. या भक्तीसाठी केवळ उत्कट-जिवंत मनाची जरूर आहे. यज्ञयाग, जपमाळा आणि पांडित्य या सर्वांपेक्षा नामभक्ती श्रेष्ठ. संत चोखोबांसारख्या बहिष्कृत समजल्या गेलेल्या भक्ताच्या आर्त भावनेला समतेच्या आणि ममतेच्या या विचारानं आनंदाचं उधाण यावं यात आश्चर्य नाही. वारकरी पंथ घराघरांत गेला. झोपडी-झोपडीत पसरला याचं कारण या पंथानं सर्वांना आपल्यात सामावून घेतलं. अवघियांपुरते वोसंडले पात्र. भक्तीरूपी नदीचं हे पात्र दुथडी भरून वाहत आहे. कुणीही यावं आणि यात स्नान करून शुचिर्भूत व्हावं. मग तो ज्ञानदेव असो, चांगदेव असो, नामदेव असो की तुकाराम असो. ती कान्होपात्रा असेल किंवा जनाबाई असेल. भक्तीनं समता निर्माण केली यात शंका नाही. 'चोखा म्हणे ऐसा आहे शिष्टाचार'

विठ्ठलाचा नामघोष करण्यासाठी आणि त्याच्या भक्तीविषयक धारांत स्नान करण्यासाठी वर्ण आणि जात अशी कुठलीही अट वारकरी पंथानं घातलेली नाही. भक्तीची सनद सर्वांना मिळाली आहे. भक्तीचा अधिकार जन्मसिद्ध आहे. त्याचा कुळाशी आणि वंशाशी दुरून देखील संबंध येत नाही. तुकोबांनीही हाच विचार अधिक सडेतोडपणानं मांडला आहे. ते म्हणतात, 'अभक्त ब्राह्मणाचे तोंड जळो, वैष्णव चांभाराचं कुळ माझ्या दृष्टीनं धन्य आहे.' परमेश्वराचं स्मरण करताना, दर्शन घेताना जातीपातीचा विचार करणारे लोक मूर्तिमंत अज्ञानी होते. कितीतरी भ्रष्ट ब्राह्मण जातीच्या बळावर मंदिरात जात होते. देवाच्या गाभाऱ्यात देखील प्रवेश करीत होते. पण चोखोबांसारख्या शुद्ध चारित्र्याच्या प्रामाणिक भक्तालाही त्याच्या महारपणामुळं मंदिराची पायरी चढता येत नव्हती. याचा अर्थ आमचं धर्मशास्त्र आणि समाजशास्त्र जुनाट, तर्कदुष्ट आणि शिळपट व अन्यायी बनलं होतं हेच यातून सिद्ध होतं. श्रीरामाचं नाव ज्याच्या मुखी आहे, ज्याच्या मनी आहे तोच शुद्ध, तोच उच्च आणि उदात्त आहे. ज्याच्या मुखी राम नाम नाही, हृदयी भक्ती नाही तोच खरा पातकी आणि पतित आहे.

●●●

आता याचा अर्थ पुरे पुरे देवा । येऊ द्या कळवळा तुम्हांलागी ॥
गुंतलेसे काढा यातोनी बाहेरी । माझे तो हरी काही न चाले ॥
वारंवार करुणा करितो देवराया । का न ये कळवळा तुम्हांलागी ॥
चोखा म्हणे आता न करा उदास ।पुरवावी आस मायबाप ॥

प्रपंच म्हणजे दुःखाचं आणि संकटांचं एक जंजाळ आहे. त्यातून सुटण्याचा कितीही प्रयत्न केला तरी आपण त्यात अधिकाधिक गुंतत जातो हा सर्वांचाच अनुभव आहे. संत चोखामेळा यांचं आयुष्य ठिकठिकाणी फाटून गेलेलं होतं. नियतीनं त्यांच्या फाटक्या पदरात काहीच टाकलेलं नव्हतं. गावकुसाच्या बाहेर एका जीर्ण झोपडीत बायका-मुलांबरोबर रात्रंदिवस प्रपंचाचे कष्ट उपशीत राहिलेला हा विठ्ठलभक्त कसाबसा जगत होता. शूद्रातिशूद्र जातीत जन्मल्यामुळं सवर्ण लोक त्याची सावलीसुद्धा आपल्या अंगावर पडू देत नव्हते. पोटासाठी घाम गाळावा तेव्हा चार घास तेही कदन्नाचे पाहायला मिळायचे. ज्या विठ्ठलाचं नाव जन्मभर त्याच्या मुखी घोळत होतं त्या विठ्ठलाच्या मंदिरात या संताचा कधीही प्रवेश होऊ शकला नाही. अशा अवस्थेत जगण्याला काय किंमत होती ? पण या संतांच्या घरात विठ्ठलाचं भजन कीर्तन व्हायचं. चोखोबा, त्यांची पत्नी सोयराबाई मुलगा कर्ममेळा सारेच कवी होते. आपल्या सुखदुःखाची करुण कहाणी आपल्या शब्दांतून ते व्यक्त करीत होते. एवढाच काय तो दिलासा त्यांना मिळत होता. या तिघांच्याही भावोत्कट कवितांना मराठी काव्यात मानाचं स्थान आहे. आपल्या वेदनेची आणि पावलोपावली होणाऱ्या मानसिक कोंडमाऱ्याची आर्त कथा चोखोबा आणि त्यांच्या कुटुंबातील सर्वांनी सांगितली आहे. ती वाचताना ७०० वर्षांपूर्वीचं समाजजीवन आणि व्यवस्था किती अन्यायी होती याची कल्पना येते. आजचाही एखादा दलित कवी आपल्या दुःखांचा काव्यातून आविष्कार करतो. तेराव्या शतकातला संत चोखामेळा पदोपदी अन्यायाचा बळी ठरत होता. 'मज दूर दूर हो म्हणती' या शब्दांतून आपल्या मानसिक पीडेचं त्यानं दर्शन घडवलं. आहे. ' आता याचा अर्थ पुरे पुरे देवा' हा अभंग चोखोबांच्या अंतःकरणात मुरलेलं आर्त घेऊन प्रकट झाला आहे. तो वाचताना वाचकाचे डोळे आणि मन भरून आल्याशिवाय राहत नाही.

संत चोखोबा म्हणतात, 'देवा, किती वेळा तुझी करुणा भाकतो पण तुला अजूनही माझा कळवळा येत नाही. या साऱ्या जंजाळातून मला बाहेर काढ. आता या यातना असह्य झाल्या आहेत. मी पूर्णपणे पराभूत झालो आहे. वंचनेच्या

वेरोळ्यातून, अर्थशून्य असलेल्या दुःखपूर्ण प्रपंचातून मला मुक्त करा एवढीच मागणी आहे.'

परमेश्वराचा भक्त असूनही त्याचं सारं आयुष्य काट्याकुट्यांनी भरलेलं असावं याचं आश्चर्य वाटतं. अभक्तांच्या आणि दुर्जनांच्या घरात बऱ्याच वेळा सुखसमृद्धीची लयलूट असते. आणि भक्त मात्र भाकरीच्या घासालाही महाग होतो. प्रेमाचा शब्द त्याला मिळत नाही. अपेक्षा आणि अपमान, तिरस्कार आणि घृणा यांचीच वाट चोखोबांसारख्या महनीय भक्ताला चालावी लागते. त्यामुळं या संताला जीवनाचा उबग यावा हे स्वाभाविकच आहे. पण अशाही हीनदीन अवस्थेत राहून चोखोबांनी मौलिक काव्यरचनाकेली. आणि तत्कालीन वातावरणात विठ्ठलभक्तीचा समाजात प्रसार केला. हे त्यांचं कार्य ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचं आहे. ते नुसतीच आपल्या दुःखाची गाणी गात बसले नाहीत. त्यांनी गायिलेली ईश्वरप्रेमाची गाणीही महत्त्वपूर्ण आहेत. दुःखदैन्याच्या जळत्या परिस्थितीतही चोखोबांची काव्यप्रतिभा फुलून येत होती. ही घटना फार महत्त्वाची आहे. संतालाच हे शक्य असते.

संत चोखामेळा यांनी आपल्या अखेरच्या दिवसांत हा कळवळ्याचा अभंग लिहिला असावा. परमेश्वराला उद्देशून या भक्तानं करुणा भाकली आहे. अवघा जन्म दुःख, उपेक्षा, अपमान आणि तिरस्कार यांच्या अनेक वावटळी अंगावर घेतल्यानंतर हुंदके देत चोखोबा विठ्ठलाला आळवीत आहेत. 'देवा, तुम्हाला माझा कळवळा का येऊ नये ? जन्मभर प्रार्थना करतो. पण माझ्या कपाळी पुन्हापुन्हा वंचना आणि निराशा येते.' आता हे सर्व अतिरेकी टोकाला गेलं आहे. चोखोबांना प्रत्यक्ष परमेश्वर खरोखरच भेटला किंवा काय याबद्दल शंका आहे. तो विठ्ठल कटीवर कर ठेवून तटस्थपणे उभा आहे. चोखोबांच्या काव्यात तो त्यांना भेटल्याचं वर्णन काही ठिकाणी आलं आहे. कवीच्या मनाला तसा भास होत असेल. कल्पना आणि आभास, इच्छा आणि स्वप्न यातूनच कविता उत्पन्न होते. चोखोबांच्या कवितेत आनंदाचा थोडा रंग आहे. पण तो रंग त्यांच्या डोळ्यांतल्या अश्रूंनी धुवून गेला आहे. इच्छापूर्तीचा आनंद चोखोबांना केवळ स्वप्नातच मिळत होता. वास्तवात त्यांच्या पदरात दुःखाचे निखारे पडत होते. म्हणूनच ते म्हणतात.

'आता याचा अर्थ पुरे पुरे देवा!'

●●●

धाव घाली विठू आता चालू नको मंद ।
बडवे मज मारिती ऐसा काहीतरी अपराध ॥
विठोबाचा हार तुझे कंठी कैसा आला ।
शिव्या देती मजला म्हणती देव बाटविला ॥
अहोजी महाराज तुमचे द्वारीचा कुतरा ।
नकाजी मोकलू चक्रपाणी जिमे दारा ॥
जोडूनिया कर चोखा विनवितो देवा । बोलिलो उत्तरे परी राग नसावा ॥

या अभंगात संत चोखोबांनी आपलं एक विलक्षण दुःख अत्यंत आर्तपणानं व्यक्त केलं आहे. विठ्ठलाचा हार चोखोबांच्या गळ्यात कसा आला ? ही शंका मंदिरातल्या बडव्यांना म्हणजे पुजाऱ्यांना आली. आणि ते तू देवाला स्पर्श करून विटाळलंस म्हणून चोखोबांना मारू लागले. शिव्या देऊ लागले. आपला असह्य छळ होत आहे हे पाहून चोखोबा विठ्ठलाची करुणा भाकू लागले.

'धाव घाली विठू आता चालू नको मंद । बडवे मजमारिती ऐसा काहीतरी अपराध ।

विठ्ठलाच्या गळ्यात असलेला पुष्पहार संत चोखोबांच्या गळ्यात दिसल्यामुळं त्यांनी मंदिरात शिरून देवाच्या गळ्यातून तो हार काढून घेतला असावा अशी शंका पुजाऱ्यांना आली. एका शूद्रानं मंदिरात यावं आणि देवाचा हार घ्यावा हा सातशे वर्षांपूर्वी भयंकर गुन्हा समजला जावा अशी परिस्थिती होती. मुळात शूद्र असणं हाच मोठा अपराध समजला जायचा. शूद्रासाठी धर्माचे, संस्कृतीचे, शिक्षणाचे, प्रतिष्ठित व्यवसायाचे सारे दरवाजे बंद केलेले होते. अस्पृश्याची सावलीसुद्धा सवर्णाच्या अंगावर पडली तर त्या सवर्णाला अशुद्धता प्राप्त व्हायची. शुद्ध होण्यासाठी त्याला सचैल म्हणजे कपड्यांसह स्नान करावं लागत असे. जिथं अस्पृश्याची छाया देखील अमंगळ मानली जायची तिथं चोखोबांच्या स्पर्शानं देव विटाळल्याशिवाय कसा राहील ? हे अजब तर्कशास्त्र होतं. विठ्ठलाचा हार ज्याअर्थी चोखोबांच्या गळ्यात आहे त्याअर्थी यानं विठ्ठलमूर्ती निश्चित अशुद्ध केली. म्हणून ती पुजारी मंडळी संतप्त होऊन चोखोबांना मारहाण करू लागली. कदाचित एखाद्या सवर्ण भक्तानं विठ्ठलाच्या कंठातली फुलमाळ काढून मंदिराबाहेर भजनरंगात रंगलेल्या चोखोबांच्या कंठात ती घातली असेल. किंवा एक आख्यायिका अशी की, चोखोबांच्या भक्तिप्रेमामुळं संतुष्ट झालेल्या विठ्ठलानंच आपल्या गळ्यातला हार चोखोबांच्या गळ्यात टाकला असावा. पण या घटनेचा विपर्यास झाला. खरं तर संत चोखामेळा यांनी उभ्या आयुष्यात

विठ्ठलमंदिरात प्रवेश केलेला नव्हता. दर्शन तर दूर राहिलं. तत्कालीन रूढीचे साखळदंड इतके बळकट होते की त्या रूढीचं उल्लंघन कुणालाही करणं शक्य नव्हतं. चोखोबा हे तर विठ्ठलाचे हळवे भक्त होते. त्यांच्या ध्यानी, मनी आणि श्वास निःश्वासात विठ्ठलच सामावला होता. आपल्या हृदयाच्या देव्हाऱ्यात त्यांनी त्याची प्रतिष्ठना केली होती.

याप्रसंगी पांडुरंगाला उद्देशून चोखोबा प्रार्थना करतात, अहो जी महाराज। तुमचे द्वारीचा कुतरा। नका जी मोकलू चक्रपाणी जिमेदारा। संत चोखोबा येथे पांडुरंगाची क्षमा मागून त्याला विनवीत आहेत, 'हे चक्रपाणी, मला टाकून जाऊ नकोस. मी तुझ्या दारात इमानानं, निष्ठेनं उभा आहे. माझ्यावर राग धरू नये. वस्तुतः चोखोबांचा काहीच अपराध नव्हता. कोणत्यातरी अनाकलनीय योगायोगानं विठ्ठलाच्या गळ्यातली पुष्पमाळा चोखोबांच्या कंठी आली आणि त्यामुळं देवळातल्या पुजाऱ्यांनी त्यांना मारहाण केली. अतिशय कळवळ्यानं ते विठ्ठलाला सांगतात, 'तू आता धावत धावत ये. या संकटातून मला सोडव. चोरीचा आरोप आलेल्या चोखोबांचा हा अभंग अत्यंत हृदयस्पर्शी आहे. त्यातला प्रत्येक शब्द जणू त्यांनी आपल्या अश्रूंनी लिहिला आहे. एका दुःखी, अन्यायाच्या विळख्यात सापडलेल्या विठ्ठलभक्ताची ही आर्त हाक ऐकताना आपलंही अंतःकरण गलबलून येतं. चोखोबांच्या सहनशीलतेला, त्यांच्या आर्त भक्तीला आमचंही वंदन असो !

'धाव घाली विठू आता चालू नको मंद ' ही प्रार्थना पिढ्या न् पिढ्या अस्पृश्य भक्तांनी केली होती. वर्णव्यवस्थेत शूद्रांची घोर अडवणूक होत होती. सगळे दरवाजे त्यांच्यासाठी प्राचीन परंपरेनं बंद करून ठेवले होते. बंद असलेले हे लोखंडी दरवाजे प्रार्थनेच्या शब्दांनी कधीच उघडले गेले नाहीत. प्राचीन ग्रंथांनी, मनुस्मृतीसारख्या स्मृतींनी आणि अन्य अनेक पोथ्या-पुराणांनी ही दारं घट्ट लावून घेतली होती. परमेश्वरालाही ही दारं उघडता आली नाहीत. पण ती त्यानंच बंद करायला लावली असा आक्षेप त्याच्यावर काही धर्मग्रंथांनी घेतला. शतकानुशतकं ही दारं उघडली जावीत म्हणून परमेश्वराची प्रार्थना लक्षावधी, कोट्यवधी शूद्रातिशूद्रांनी केली. त्यावेळी चोखोबांचे हेच उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर निघाले असतील 'हे विठ्ठला, आता तू धावून ये. मंद चालू नकोस. या परंपरेच्या ठेकेदारांनी आमचा शेकडो वर्षं चालवलेला भयानक छळ तू शांतपणानं पाहतोस याचं आश्चर्य वाटतं. या अन्यायावर घणाचे घाव घाल. आमच्यासाठी बंद असलेले दरवाजे मोडून-तोडून टाक. तुझ्या दर्शनाची आस रात्रंदिवस आमच्या हृदयात आहे. कित्येक शतकं निराशेत गेली. आता ही कळवळ्याची प्रार्थना आहे. ती आम्ही कोटीकोटी मुखांनी करीत आहोत. नुसता उभा राहू नकोस.

●●●

**संतांचा अनुभव संतचि जाणती । येर ते हासती अभाविक ।।**
**नामाचा प्रताप प्रल्हादचि जाणे । जन्म मरण येणे हटविले ।।**
**सेवेचा प्रकार जाणे हनुमंत । तेणे सीताकांत सुखी केला ।।**
**सख्यत्वे पूर्णता अर्जुना बाणली । ऐक्य रूपे चाले मिरवली ।।**
**चोखा म्हणे ऐसा आहे श्रेष्ठाचार । तेथे मी पामर काय वानू ।।**

संतांचे अनुभव केवळ संतच जाणू शकतात. सामान्य माणसाला त्या अनुभवाचं आकलन होणं शक्य नाही. संत चोखामेळा यांचं हे मत सयुक्तिकच आहे. संत भक्तीच्या मार्गानं परमेश्वराची अखंड उपासना करीत असतात. भौतिक सुख आणि संपत्ती यांच्याकडं त्यांनी पाठ फिरवलेली असते. परमात्म्याच्या स्वरूपाचं ते सतत चिंतन करीत असतात. सामान्य माणूस ज्या षड्विकारात गुरफटून गेलेला असतो ते विकार त्यांनी सतत प्रयत्नानं आणि संयमानं जिंकलेले असतात. सामान्य मनुष्य विकार वासनांच्या भोवऱ्यात फिरत असतो. पण संतांची मनःसमाधी एक प्रकारच्या अपूर्व शांतीनं साधलेली असते. हा समाधीचा अनुभव साधारण माणसाला कसा कळणार ? तुकोबांनी 'आनंदाचे डोही' उचंबळत असलेले आनंदतरंग पाहिले होते. अनुभवले होते. हा आनंदाचा डोह आपल्याच मनात आणि आत्म्यात सामावलेला आहे ही विलक्षण अनुभूती तुकारामांना आली होती. असा अनुभव ज्ञानेश्वरांनाही, नामदेव-एकनाथांनाही आला असेल. चोखोबांनाही ही अनुभूती आली असेल. केवळ संतांनाच येणारी ही मानसिक अनुभूती केवळ संतच जाणू शकतात. आपण सामान्य माणसं त्या अनुभूतीला स्पर्श करू शकत नाही. संत चोखोबांना मंदिरात प्रवेश नसला तरी तो विठ्ठल त्यांना आपल्या झोपडीत येऊन दर्शन देत आहे ही इंद्रियातीत स्वरूपाची अनुभूती येत होती. हाच अनुभव संत सावतामाळी, संत जनाबाई यांनीही घेतला. तसे उल्लेख त्यांच्या काव्यात आढळतात. सामान्य माणसाला मात्र हा कल्पनेचा विलास वाटतो. आपला मुद्दा स्पष्ट करताना या अभंगात चोखोबांनी तीन दृष्टान्त दिले आहेत. ते म्हणतात,

ईश्वरनामाचा काय प्रभाव आहे हे प्रल्हादच जाणू शकतो, त्या नामःस्मरणानं त्यानं जन्ममरण या उपाधी दूर केल्या. सेवेचं महत्त्व हनुमंतानंच जाणलं होतं. रामचंद्रावर त्याची प्रगाढ निष्ठा होती. राम-सीतेची सेवा करण्यातच त्यानं आपलं सारं आयुष्य व्यतीत केलं. सेवेतला आनंद त्यानं भरभरून घेतला. असा आनंद इतरांना मिळणारही नाही. आणि समजणारही नाही. तो केवळ प्रभूच्या सेवकालाच म्हणजे संतालाच

समजेल. तिसरा दृष्टांत चोखोबांनी अर्जुनाचा दिला आहे. श्रीकृष्णाशी गाढ मैत्रीच्या भावनेनं तो एकरूप झाला होता. 'कृष्णार्जुन' असा सामाजिक शब्द बनलेला आहे. अर्जुनाविषयीच्या स्नेहामुळं कृष्ण त्याच्या रथाचा सारथी झाला. अर्जुनाच्या मनाचा घोडा रणांगणातून संन्यासवादाकडं उधळत आहे हे पाहिल्यावर कृष्णानं त्याचा लगाम खेचून त्याला लढण्याची प्रेरणा दिली. आपल्या हृदयातलं ज्ञान त्याच्या मनात ओतलं. केवढी विलक्षण अद्भुत अनुभूती अर्जुनाला आली ती परमेश्वराशी समरस झालेल्या संतालाच समजू शकेल. सामान्य माणसाला नव्हे.

**चोखा म्हणे, ऐसा आहे श्रेष्ठाचार।**
**तेथे मी पामर काय वानू? ।**

संतजीवनातले गूढ असे अपूर्व आनंदाचे अनुभव जो संत असेल त्यालाच कळतात. इतरांना ते कळू शकत नाहीत. एक गोष्ट मात्र खरी की, संतांचे अनुभव मनोमय असतात. ते इंद्रियजन्य नसतात. ज्ञानेश्वरांची अनुभूती तुम्हा आम्हाला कशी येईल ? त्यांच्या पातळीवर गेल्याशिवाय त्या अनुभवाचं भव्यत्व आणि दिव्यत्व आपल्याला कळणं शक्य नाही. संत चोखामेळा यांचे हे विचार खरोखरच अर्थपूर्ण आहेत. त्यांचं चिंतन आणि मनन केलं पाहिजे.

आधुनिक काळातही रामकृष्ण परमहंसांनी स्वामी विवेकानंदांना एक नवी जागृती प्राप्त करून दिली. आत्मानुभवी संतांचं सामर्थ्य त्यांच्या पायरीवर जाऊ शकणाऱ्या अधिकारी संतालाच समजतं. रामकृष्ण परमहंसांचं चिंतन आणि त्यांचा अनुभव किती खोल आहे याची जाणीव विवेकानंदांना होती. संतांचा अनुभव संतांनाच जाणून घेता येतो. सामान्य मनुष्य 'जेवढं इंद्रियांना कळतं तेवढंच काय ते सत्य इतर मात्र असत्य' असा समज करून घेतो. प्रल्हाद, हनुमंत, आणि अर्जुन आपल्या सेवाबुद्धीनं ईश्वरी हृदयाशी संवाद करू शकले असं सांगून चोखोबांनी गूढ अनुभवांचं वर्णन केलं आहे. चोखाबांवरही त्याकाळी टीकेचे व निंदेचे प्रहार लोकांनी केले होते. पण विठ्ठलरूपीचा प्रकाश ते अनुभवीत होते. त्यांची आध्यात्मिक उंची ज्ञानेश्वर-नामदेवांसारखीच उत्तुंग होती. उत्कट भक्तीनं भिजलेल्या त्यांच्या हृदयातले शब्द सुंदर कविता बनून आकार घेत होते. साक्षात्काराचा अतींद्रिय, दिव्य अनुभव त्यांनी घेतला होता असं त्यांच्या काव्यावरून वाटतं. समकालीन लोकांनी चोखोबांचा उपहास केला असेल पण त्याकडं दुर्लक्ष करून आपल्या आत्म्याशी संवाद करीत राहिलेला हा संत परमात्म्याशीही कसा समरस झाला त्याची कहाणी या काव्यातून प्रकट झाली आहे. चोखोबांचं काव्य हे त्यांचं आत्मचरित्र आहे.

●●●

**अखंड नामाचे चिंतन सर्वकाळ । तेणे सफळ संसार होय जना ॥**
**सर्व हे मायीक नाशिवंत साचे । काय सुख याचे मानितसां ॥**
**निर्वाणीं तारक विठोबाचे नाम । येणे अवश्रम दूर होय ॥**
**चोखा म्हणे नाम जपे दिननिशी । येणे सदासुखी होसी जना ॥**

संत चोखामेळा यांचं जीवन लौकिक दृष्टीनं दुःखपूर्ण आणि दैन्यवाणं होतं. अस्पृश्यतेचा जळता शाप मस्तकी घेऊन हा विठ्ठलाचा उपासक जन्मभर खाचखळग्यातून, काट्याकुट्यांतून चालत राहिला. या संताशी आपुलकीनं तर सोडाच पण साध्या सहानुभूतीनं सुद्धा कोणी बोलत नव्हतं. 'मज दूर दूर हो म्हणती' हे आपलं दुःख त्यानं अनेक अभंगांतून सांगितलं आहे. जात आणि कुळ यांच्या कारणांवरून माणसानं माणसांचा तिरस्कार करावा ही गोष्ट खऱ्या धर्मनीतीला लाजिरवाणी आहे. उरी फुटेपर्यंत कष्ट आणि जन्माचं दारिद्र्य या अवस्थेत चोखोबांचं सारं कुटुंब कसंबसं जगत होतं. पण तरीही चोखोबा सुखी होते असं म्हणता येईल. सर्वकाळ परमेश्वराचं नाव मनात ठेवून आणि त्या नावाचं अखंड चिंतन करीत चोखोबांनी जीवन व्यतीत केलं. विठ्ठलनाम त्यांच्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूत मुरलेलं होतं.चोखोबांच्या हाडीमासी विठ्ठल सामावला होता. इतका की संत नामदेवानं चोखोबांच्या अपघाती मृत्युनंतर त्यांच्या अस्थी गोळा करताना ज्या हाडातून 'विठ्ठल विठ्ठल' अशा घोष ऐकू येईल ती हाडं संत चोखाबांचीच हे ओळखलं. यातला भावार्थ इतकाच की, विठ्ठलाचं नाम आणि चोखामेळा दोन्ही एकरूप झाले होते.

आपल्या प्रस्तुत अभंगात हा संत म्हणतो,

'अखंड नामाचे चिंतन सर्वकाळ । तेणे सफळ संसार होय जना ।
चोखा म्हणे नाम जपे दिननिशी । येणे सदासुखी होसी जना ।'

सुखाची ही भूमिका केवळ भक्तालाच मान्य होण्यासारखी आहे. आपण स्वार्थव्यवहारात गुंतलेली सामान्य माणसं. धन-धान्य, प्रतिष्ठा, सत्ता यात सुख मानतो. पण परमेश्वराचं नामस्मरण आणि चिंतन करणाऱ्या भक्ताला अपूर्व अशी मानसिक तृप्ती लाभत असते. त्या तृप्तीची तुलना भौतिक संपत्तीशी कधीच करता येणार नाही. धनदौलतीपेक्षा विठ्ठलनामाची दौलत त्याला म्हणजे भक्ताला अधिक महत्त्वाची वाटते. सुख आणि शांती या अवस्था मनाशी आणि आत्म्याशी निगडित असतात. सगळ्यात कनिष्ठ सुख हे शरीराचं असतं. आणि त्यानंतर सर्वोच्च सुख हे मनाचं, आत्म्याचं

असतं. झोपडीत राहणाऱ्या चोखोबांच्या मनात विश्वाचा निर्माता परमेश्वर अखंड वास करीत होता. आता आणखी वेगळ्या सुखाची या संताला आवश्यकता नव्हती. म्हणूनच चोखोबांनी संसार सफल होण्यासाठी 'विठ्ठलनामाचीच' महती स्पष्ट केली आहे. बाकीची सगळी सुखसाधनं नाशवंत आहेत. मायावी आहेत असं सांगून ते म्हणतात,

'निर्वाणीं तारक विठोबाचे नाम' चोखोबांच्या समग्र जीवनाला आणि काव्याला हे विठ्ठलनामच तारक झालं. सातशे वर्षांपूर्वी हा श्रेष्ठ संत घाम गाळताना, कष्ट करताना, संसारातला व्यवहार करताना विठ्ठलनामाचा आधार घेऊन आपलं कार्य करीत होता. फाटक्या तुटक्या कपड्यातला हा संत अंतर्यामी श्रीमंत होता. विठ्ठलनामाची रत्नं आणि अमाप संपत्ती त्याच्यापाशी असल्यामुळं तो सुखी झाला. सुखाचा मार्ग दाखवून परमेश्वराच्या स्वरूपात विलीन झाला. पण जाता जाता मराठी साहित्याला समृद्धी देऊन गेला. महाराष्ट्राला विठ्ठलनामाची देणगी देऊन गेला. जात आणि वर्ण या गोष्टीपेक्षा माणूस आणि त्याची भक्ती श्रेष्ठ असते हे सांगून गेला. आम्हाला चोखमेळ्याच्या रूपानं जणू विठ्ठलाचंच दर्शन घडलं. त्याला आमचं कृतज्ञ वंदन.

मराठी काव्यसाहित्यात चोखामेळ्यांच्या कवितेला एक महत्त्वाचं स्थान आहे. हिंदुसमाजातल्या सर्वात कनिष्ठ स्तरातला एक सामान्य कष्टकरी विठ्ठलभक्तीची सुंदर कविता लिहितो. हा सातशे वर्षांपूर्वीचा एक चमत्कार मानावा लागेल. चोखामेळा केवळ 'विठ्ठल विठ्ठल' करीत स्वस्थ बसून राहिलेला भोळा-भाबडा, निष्क्रिय भक्त नव्हता. तो श्रमजीवी होता. अस्पृश्य असल्यामुळं पदोपदी होणारा कोंडमारा सहन करीत होता. स्वतःला उच्चवर्णीय समजणारे धर्मपंडितही कसे मानवताविरोधी आहेत हे पाहत होता, अनुभवीत होता, आपला होणारा सामाजिक छळ सोसत होता. पण विठ्ठलभक्तीतलं सौंदर्य आणि सामर्थ्य आपल्या अभंगातून जगाला सांगत होता. अश्रूंनी भिजलेल्या या संतकवितेत चोखोबांची आत्मकहाणी आली आहे. प्रत्येक अभंग त्या आत्मकथेचं एकेक पान आहे. चोखामेळा नावाच्या वृक्षाला फुटलेलं हे प्रत्येक पान सातशे वर्षानंतरही हिरवंगार राहिलं आहे. मराठी साहित्यातला हा पहिला दलित समाजातून उदयाला आलेला प्रतिभासंपन्न कवी आहे. चोखोबांचे उष्ण अश्रू या कवितेत जतन करून ठेवले आहेत. ही अश्रूंची कविता एका कर्मयोगी अस्पृश्य संताची आणि सात शतकांपूर्वीच्या इतिहासाची मालमत्ता आहे. मराठी भाषेचं आणि साहित्याचं हे बहुमोल धन आहे यात संदेह नाही.

●●●

**देवा नाही रूप देवा नाही नाम । देव हा निष्काम सर्वांठायी ।।**
**डोळियाचा डोळा दृष्टीच भासला। देव प्रकाशला आदि अंती ।।**
**नवल वाटले नवल वाटले । देव कोंदाटले मागे पुढे ।।**
**चोखा म्हणे माझा संदेह फिटला। देव प्रगटला देहामाजी ।।**

संत चोखामेळा यांचा देवविषयक विचार विशद करणारा हा तात्त्विक अभंग आहे. सगुणाकडून निर्गुणाकडं चोखोबांचा वैचारिक प्रवास झालेला होता. ते प्रश्न उपस्थित करतात. आणि उत्तर देतात. देवाला रूप नाही. नाव नाही. तो सर्वांच्या ठायी सामावलेला आहे. याचा अर्थ अरूप देवाला भक्तानं कोणत्याही रूपात पाहावं. अनाम असलेल्या देवाला कोणत्याही नामानं संबोधावं. जे नामरूपात्मक आहे त्यातही देवत्व आहे. देव नामरूपालाही अतीत आहे. तो अजन्मा आहे. त्याचा कधी जन्मच झाला नाही. पण हा अजन्मा देव भक्ताच्या हृदयात जन्म घेतो. देवत्वाचा प्रकाश अवघ्या जगात भरून उरला आहे. तो चराचरांतून ओसंडत आहे.

'चोखा म्हणे माझा संदेश फिटला' देवस्वरूपाचं हे अमोलिक ज्ञान चोखामेळ्यांनी आपल्या चिंतनातून, व्यापक दृष्टीतून मिळवलं आहे. हे दुर्मिळ ज्ञान पंडित-पुरोहितांनाही जन्मभर ग्रंथ वाचून आणि घोकून मिळत नाही. ते ज्ञान वेशीबाहेर राहणाऱ्या झोपडीतल्या अस्पृश्याला अनुभवातून मिळालं हा पांडित्याचा भक्तीनं केलेला पराभव आहे.

चोखोबा म्हणतात, 'देव प्रगटला देहामाजी' माझ्या देहातच देव आहे ही अनुभूती घेणारा भक्त खरं तर देवाच्याच योग्यतेचा होऊ शकतो. आपल्या देहातच तो विश्वचालक विठ्ठल आहे असं म्हटल्यावर याच्या दर्शनासाठी मंदिरात जाण्याची काहीच आवश्यकता नाही. देवळाचे दरवाजे बंद करून विठ्ठलाला कोंडून टाकणाऱ्या मूर्ख परंपरावाद्यांना चोखामेळ्याच्या देहाचं मंदिर बनलं आहे हे अज्ञानानं कळलंच नाही. दगडविटांचं मंदिर आणि त्यात राहणारा पाषाणांचा देव यापेक्षा चोखोबांच्या मनदेहाचं मंदिर आणि त्यातला भावमय विठ्ठल अधिक सुंदर व संपन्न आहे. म्हटलं तर त्याला नाव आहे. म्हटलं तर याला नावही नाही. गावही नाही. भक्ताचं मन हेच त्याचं कायमचं घर अशा परिस्थितीत चोखोबा आध्यात्मिक अनुभवाच्या एका उन्नत पातळीवर विहार करीत होते यात काय संशय ?

त्यांच्या बाबतीत एक आख्यायिका सांगितली जाते. स्वर्गातलं अमृत एकदा

नासलं, काही केल्या ते शुद्ध होईना. विष्णूनं सांगितलं, नासलेलं अमृत शुद्ध करण्याची शक्ती संत चोखामेळ्यात आहे. त्याच्याकडं जा. आणि अमृत शुद्ध करून घ्या. स्वर्गीय अमृताला शुद्धता आणि स्वच्छता अर्पण करण्याची किमया चोखामेळ्याच्या शुद्ध भक्तीत होती. अशा आख्यायिका लोकांत प्रसृत होतात. याचं कारण काही व्यक्ती अशा चमत्कारकथांचे नायक होण्याच्या योग्यतेचे असतात.

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, जनाबाई यांच्या मालिकेत संत चोखामेळ्यांचा उल्लेख व्हावा याचा अर्थ त्यांचं लोकमानसातलं श्रेष्ठ स्थान किती वंदनीय होतं हे लक्षात येतं. सवर्ण संतांना चोखोबांच्या तुलनेत परिस्थिती अधिक अनुकूल होती. चोखोबांना माणुसकीचे सर्वसाधारण हक्कही मिळाले नाहीत. पण तरीही आपल्या अंगीकृत कार्यापासून आणि निष्ठेपासून ते कधीही विचलित झाले नाहीत. विठ्ठलाविषयीची त्यांची श्रद्धा नानाप्रकारच्या संकटांतसुद्धा अभंग राहिली. आपलं दुःख गिळून ते लोकप्रबोधन करीत राहिले. त्यांच्या काव्यात दुःखवेदना आहे. काही ठिकाणी संताप आहे. पण देवधर्माला त्यांनी आक्रमकपणे निंदिलं नाही. सहिष्णुता हा त्यांच्या स्वभावातला एक गुण होता. म्हणूनच त्यांच्या लेखनात मानसिक वेदना प्रकट होऊनही ते प्रक्षुब्ध होऊन संस्कृतीवर घाव घालीत आहेत असं दृश्य फारसं दिसत नाही. सातशे वर्षांपूर्वीच्या काळात पाखंडी आवेगानं देवधर्मावर हल्ला चढवणं कुणालाही कठीण होतं. चोखोबांच्या काव्यात त्यांची दुःखी मनःस्थिती स्पष्टपणानं चित्रित झाली आहे.

या संतकवीनं आपल्या उंच व्यक्तित्वाला शोभेल असं उच्च दर्जाचं काव्य लिहिलं. म्हणूनच 'चोखामेळा संत भला' असं आम्ही म्हणतो.

●●●

**माझा तो समय निकट दिसे आला । लेख तो लेखिला तैसे झाले ॥**
**जन्मोनी पोसणा तुमचाच दास । आता निकट सहवासी अंतरलो ॥**
**उच्छिष्टाची आस सरलीसे दिसे । प्रारब्धासरसे वोढवले ॥**
**चोखा म्हणे माझा दंडवत पायी । करी आता साई कृपेची तू ॥**

संत चोखोबांचा हा अभंग वाचताना मनात कालवाकालव होते. यात त्यांनी निरवानिरवीची भाषा केली आहे. जगाचा निरोप घेण्याची वेळ आता अगदी जवळ आली आहे. आता इथून तुझ्या निकट सहवासाला मी अंतरणार. उच्छिष्टाची आशा संपली. प्रारब्धाच्या लेखात जे लिहिलं आहे तसंच आता घडणार आहे. 'केधवा सुटेन ऐसे जाले जीवा । आता झडकरि धावे लवकरी । आला असे काळ निकट दिसे ॥'असं इतर अभंगांतूनही त्यांनी म्हटलं आहे. हे अभंग वाचताना संत तुकोबांच्या 'आम्ही जातो आमच्या गावा । आमचा रामराम घ्यावा' या अभंगाची आठवण होते.

मंगळवेढ्याचं गावकुसु बांधण्यासाठी जे मजूर वेठीला धरले होते त्यात चोखोबांचाही समावेश होता. त्यांना पंढरपूर सोडायचं नव्हतं. पंढरीच्या वाऱ्यात विठ्ठलाच्या पवित्र सान्निध्याचा गंध मिसळला होता. त्याचा मोह त्यांना पडलेला होता. याच पंढरीतल्या चंद्रभागेच्या प्रवाहात नामदेवाच्या भजनकीर्तनाचे नाद मिसळलेले त्यांनी पाहिले होते. विठ्ठलभक्तीचं गीत गात गात वाहणारी चंद्रभागा त्यांच्या जीवनाचा एक जिवलग घटक बनलेली होती. मंदिराचं शिखर ते दररोज पाहत होते. मंदिरात चाललेलं विठ्ठलाचं नामसंकीर्तन त्यांच्या कानात घुमत होतं. हे सगळं सोडून मंगळवेढ्याला जाणं त्यांना मान्य नव्हतं. पण जाणं तर भाग होतं. आता आपण पुन्हा पंढरीला येऊ शकणार नाही याची आर्त जाणीव या भक्ताला झाली. जगाचा निरोप घेण्याचा समय जवळ जवळ येत आहे ही सूचना त्यांचं अंतर्मन त्यांना देत होतं. या अभंगात त्या दुःखाची आणि येत असलेल्या काळाची सावली पडलेली दिसते.

'माऊली विठ्ठला तू, का बा धाडियेले मंगळवेढ्या ?' असा हुंदका देणारे चोखोबा या कवितेतून आपल्या समोर उभे राहतात. संत असो, किंवा सम्राट असो. त्याला आपल्या प्रारब्धाचा लेख पुसता येत नाही. चोखोबांना तरी ते कसं शक्य होणार ?' 'चोखा म्हणे माझा दंडवत पायी' असं म्हणून त्यांनी अभंगाचा समारोप केला आहे.

संत चोखामेळ्यांचं जीवन दुःखाश्रूंनी चिंब भिजलेलं आहे. मध्ययुगात माणूस हा केवळ जातीवरून आणि वर्णावरून ओळखला जायचा. 'माणूस' म्हणून त्याला अस्तित्व नसायचं, गावकुसाबाहेर राहणारा हा चोखामेळा मंगळवेढ्याचं गावकुस बांधताना कोसळलेल्या बांधकामाखाली चिरडला गेला. गाडला गेला. त्याला आलेला मृत्यू फारच निष्ठुरपणाचा होता. कित्येक मजूर दगडविटांच्या खाली मरण पावले. अंगावर भिंत कोसळल्यानंतर चोखोबांच्या तोंडून 'विठ्ठला ऽऽ' अशी आर्त भेदक किंकाळी उमटली असेल. सारं आयुष्य सवर्णांच्या तिरस्काराला तोंड देत काढणाऱ्या या भक्ताचा स्वीकार विठ्ठलानं अशा रीतीनं केला. त्यानंही चोखोबांच्या पदरात न्याय टाकला नाही. अन्यायाचं आभाळच चोखोबांवर तुटून पडलं होतं. चोखोबा गेले. विशुद्ध भक्तीचं एक तेज मावळलं. संतसंस्कृतीचा नंदादीप विझला. प्रेम आणि सहिष्णुता यांचा सुगंध लोपला.

चोखोबा गेले तरी आपल्या प्रतिभेनं गंधित झालेलं काव्य महाराष्ट्राला त्यांनी अर्पण केलं. मराठी भाषेची आणि सारस्वताची त्यांनी सेवा केली. भक्तिकाव्यात लक्षणीय भर टाकली. 'चोखा असे डोंगा' असं त्यांनी स्वतःसंबंधी म्हटलं असलं तरी ते सरळ आणि शुद्ध होते. त्यांच्या आजूबाजूचं जग डोंगं होतं. समाजव्यवस्था वेडीवाकडी होती. तिनं मात्र चोखोबांच्या संपूर्ण जीवनाचं शोषण केलं. त्याचा इतिहास चोखोबांच्या काव्यातून प्रकट झाला आहे.

●●●

## डॉ. निर्मलकुमार फड़कुले
## यांचे प्रकाशित साहित्य

लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व
साहित्यवेध
संतकवी तुकाराम : एक चिंतन
काही रंग काही रेषा
हिरव्या वाटा
आनंदाची डहाळी
संत चोखामेळा आणि समकालीन संतांच्या रचना
जगायचं कशासाठी ?
रंग एकेकाचे
संत सहवास
संतांचिया भेटी
अमृतकण कोवळे
संतवीणेचा झंकार
समाजपरिवर्तनाची चळवळ : काल आणि आज
सुखाचा परिमळ
संत तुकारामांचा जीवनविचार
मन पाखरू पाखरू
साहित्यातील प्रकाशधारा
संत चोखामेळा : अश्रूंची कहाणी
प्रिय आणि अप्रिय
चिंतनाच्या वाटा
दीपमाळ
अजून जग जिवंत आहे !

### संपादित

ज्ञानेश्वरी : अध्याय पहिला
चिपळूणकरांचे तीन निबंध
प्रबोधनातील पाऊलखुणा
निवडक लोकहितवादी
रत्नकरंड श्रावकाचार
यात्रिक
कल्लोळ अमृताचे

संतकवी चोखामेळा यांची अभंगवाणी ही त्यांच्या जन्मभर गाळलेल्या अश्रूंची करुण कहाणी आहे. गावकुसाबाहेर उपेक्षित आणि अपमानित अवस्थेत राहूनही या कवीची प्रतिभा फुलत राहिली. संतसाहित्याचे प्रसिद्ध समीक्षक डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी संत चोखामेळा यांच्या काव्यातील उत्कट, आर्त भावनांचं सौंदर्य उलगडून दाखवलं आहे. ज्या अन्यायी समाजव्यवस्थेनं या संताचा छळ केला त्या व्यवस्थेवर श्री. फडकुले यांनी मर्मभेदक प्रहार केले आहेत. चोखामेळा यांच्या अश्रूंचा अन्वयार्थ सांगताना ते त्या अश्रूंशी सहकंप पावले आहेत. रसपूर्ण शैलीतलं हे पुस्तक वाचकांच्या मनांत संत चोखामेळा यांची हृदयस्पर्शी प्रतिमा उभी करील. वाचकांना अस्वस्थ आणि अंतर्मुख करणाऱ्या चोखोबांच्या काव्याला सात शतकानंतरही जो सुखदुःखांचा सुगंध येत आहे तो अनुभवला पाहिजे.

सुविद्या प्रकाशन/सोलापूर